सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, १० फेब्रुवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३१६ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# एसटी कर्मचाऱ्यांनी प्रवासी सेवा हिचं ईश्वर सेवा समजून काम करावे : एकनाथ शिंदे

ठाणे, ९ फेब्रुवारी : एसटीच्या पुनरुत्थानासाठी एसटी कर्मचाऱ्यांनी प्रवासी सेवा हीच ईश्वर सेवा! समजून काम केले पाहिजे. त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यास आमच्या शासन सक्षम आहे. असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांनी केले. ते खोपट बसस्थानकावरील नुतनीकरण करण्यात आलेल्या वातानुकूलित चालक -वाहक विश्रांतीगृहाच्या लोकार्पण सोहळयाच्या वेळी बोलत होते. या कार्यक्रमाला राज्याचे परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक आरोग्यमंत्री श्री.प्रकाश आबिटकर अर्थ व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्यासह एस. टी. महामंडळाचे प्रभारी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विवेक भीमनराव हे उपस्थित होते.

यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, एसटीचा चेहरा -मोहरा बदलून फाईव्ह स्टार परिवहन सेवा निर्माण करणे हे आपल्या शासनासमोरील प्रमुख ध्येय असून प्रवाशांना एअरपोर्ट सारखी बसपोर्ट उपलब्ध



करून देण्यासाठी खाजगी- सार्वजनिक भागीदारीतून नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यावर एसटी महामंडळाने भर दिला पाहिजे. मागील वर्षी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (चखऊ) माध्यमातून ५०० कोटी रुपये खर्चून एसटीच्या १९१ बसस्थानक परिसराचे काँक्रिटीकरण करण्याचे काम आपण हाती घेतल्या असून खड्डेमुक्त बसस्थानक हा आपला संकल्प असल्याचे त्यांनी सांगितले.

एसटीच्या चालक वाहकांना आपले कर्तव्य करून आल्यानंतर ताण-तणाव मुक्त झोप मिळावी यासाठी प्रत्येक आगारांमध्ये वातानुकूलित, स्वच्छ व टापटीप असे विश्रांतीगृह निर्माण करण्यात यावे असे निर्देश त्यांनी यावेळी एस टी प्रशासनाला दिले. खोपट बसस्थानकावरील नुतनीकरण केलेल्या विश्रांतीगृहाबाबत समाधान व्यक्त करून हे रोल मॉडेल संपूर्ण राज्यभर राबवण्याच्या सूचना देखील त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी बोलताना राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, एसटी कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी यापुढे राज्यभरात सार्वजनिक -खाजगी भागीदारीतून निर्माण होणाऱ्या प्रकल्पामध्ये आगार तेथे १०० खाटांचे कॅशलेस रुग्णालय उभारण्याच्या संकल्प असून माननीय मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसा दिनी या योजनेचा आम्ही शुभारंभ करीत आहोत. भविष्यात या रुग्णालयांमध्ये शासनाच्या महात्मा फुले जन आरोग्य योजनेबरोबर विविध वैद्यकीय सेवा सुविधा मोफत एसटीच्या कर्मचाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार असून त्याचा फायदा त्या परिसरातील प्रवासी व सर्वसामान्य जनतेला देखील मिळणार आहे.

यावेळी मोठ्या संख्येने एसटी कर्मचारी व प्रवासी उपस्थित होते.

## कोणाचा नातेवाईक पाहून कारवाई होत नसते : मुख्यमंत्री

मुंबई : जालना जिल्ह्यात वाळू माफिया आणि गुन्हेगारांवर प्रशासनाने तडीपीरीची कारवाई केली आहे. जालना प्रशासनाने नऊ जणांविरोधात कारवाई केली, यामध्ये मराठा आंदोलक मनोज जरांगे यांचा मेहुणा विलास खेडकर याचाही समावेश आहे. तसेच जरांगे यांच्या आंदोलनातील ५ जणांचा समावेश आहेत. या कारवाईवरुन जरांगेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केला आहे. यानंतर आता पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत आपली प्रतिक्रिया दिली.मनोज जरांगे पाटील यांचे मेहुणे विलास खेडकर यांच्यावरील कारवाई संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना माध्यमांनी प्रतिक्रिया विचारली. यावर बोलताना फडणवीस म्हणाले की, कोणाचा साला आहे, कोणाचा नातेवाईक आहे, यावरून कारवाई होत नसते. जर काही गुन्हे केले असतील तर अटक होत असते. या प्रकरणाची माझ्याकडे माहिती नाही, योग्य ती माहिती घेऊन मी तुम्हाला सांगेन, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टपणे सांगितले.

## छत्तीसगडमधील कामगिरी नक्षलवादमुक्त करण्याच्या दिशेने मोठे यश : अमित शहा

नवी दिल्ली, ९ फेब्रुवारी : छत्तीसगडमधील बीजापूर इथे झालेल्या चकमकीत सुरक्षा दलांनी ३१ नक्षलवाद्यांना कंठस्नान घातले. सुरक्षा दलांची ही कामगिरी म्हणजे भारताला नक्षलवादमुक्त करण्याच्या दिशेने मोठे यश असल्याचे केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शहा यांनी म्हटले आहे.



यासंदर्भात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी एक्स या समाज माध्यमावर आपली प्रतिक्रिया सामायिक केली आहे. सुरक्षा दलांनी भारताला नक्षलवादमुक्त करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांमधले मोठे यश मिळवले आहे. त्यांनी या कारवाईत ३१ नक्षलवादी ठार केले, तसेच मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि स्फोटकांचा साठाही जप्त केल्याची माहिती गृहमंत्र्यांनी दिली.

आज मानवतेविरोधातील नक्षलवादाचा नायनाट करत असताना आपण दोन शूर जवान गमावले असल्याची माहितीही शहा यांनी दिली. देश या वीरांचा सदैव ऋणी राहील अशा शब्दांत त्यांनी या वीरांना आदरांजली वाहिली आहे. अमित शहा यांनी शहीद जवानांच्या कुटुंबीयांप्रती आपल्या शोक भावना व्यक्त केल्या असून त्यांचे सांत्वनही केले आहे.

३१ मार्च २०२६ पूर्वी देशातून नक्षलवादाचे समूळ उच्चाटन केले जाईल आणि नक्षलवादामुळे कोणत्याही नागरिकाला आपला जीव गमवावा लागणार नाही याची सुनिश्चिती केली जाईल, असा ठाम निर्धारही अमित शहा यांनी व्यक्त केला आहे.

## रेशन कार्डचं ई-केवायसी करण्यासाठी उरले 'इतके' दिवस!

अमरावती : राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत सर्वसामान्यांना रेशनधान्याचा पुरवठा केला जातो. त्या योजनेचा लाभ घेणाऱ्या शिधापत्रिकाधारकांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. राज्यभरातील बोगस रेशनकार्ड धारकांचा शोधा घेण्यासाठी केंद्र सरकारने ई-केवायसी करण्याची अट घातली आहे. यासाठी पुरवठा विभागाने पुन्हा मुदतवाढ केली आहे.

अन्नधान्य वितरणाची प्रक्रिया पारदर्शक व्हावी व लाभार्थ्यांनाच रेशन धान्याचा लाभ मिळावा, यासाठी रेशनकार्डमधील प्रत्येक लाभार्थ्यांची ई-केवायसी करणे महत्त्वाचे आहे. यासाठी पुरवठा विभागाने २८ फेब्रुवारीपर्यंत चौथ्यांदा मुदतवाढ दिली आहे. या अवधीत ई-केवायसी न केल्यास संबंधित रेशनकार्डधारकांचे नाव शिधापत्रिकेतून कमी करण्यात येऊन त्यांचा रेशन पुरवठा बंद होणार आहे.

का केली जाते ई-केवायसी ?

शिधापत्रिक आधार क्रमांकासह संलग्न केल्यानंतर संबंधित कार्डधारकांचा अधार क्रमांक अचूक आणि तोच आहे, याची पडताळणी (सत्यापन) या प्रक्रियेद्वारे केली जाते. ओळख व पत्ता यासाठीदेखील ई-केवायसीची प्रक्रिया महत्त्वाची आहे.

शिधापत्रिकेतील सर्व व्यक्तींचे सत्यापण

शिधापत्रिकेत नमूद सर्वच व्यक्तींचे आधार कार्ड घेऊन सत्यापण करणे सक्तीचे करण्यात आलेले आहे. ज्या व्यक्तीचे सत्यापण होणार नाही, त्याचे नाव शिधापत्रिकेमधून वगळले गेल्यास व परिणामी त्यांचे शिधाजिन्नस बंद झाल्यास सर्वस्वी जबाबदारी राहील.

३३ टक्के शिधापत्रिकाधारकांनी फिरविली पाठ

रेशन दुकानात ई-केवायसी करण्यासाठी फक्त अधार कार्ड व शिधापत्रिका याच दोन गोष्टी आवश्यक आहेत. तरीही लाभार्थ्यांद्वारा टाळाटाळ करण्यात येत आहे.

## शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारते, तेव्हाच देशाची परिस्थिती सुधारते : उपराष्ट्रपती

नवी दिल्ली, ९ फेब्रुवारी (हिं.स.) : शेतकरी हे अन्नदाते आहेत, त्यांनी कोणाच्याही मदतीवर अवलंबून राहू नये, असे प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केले. ते आज चित्तोडगड येथे अखिल मेवाड प्रदेश जाट महासभेला संबोधित करत होते. जेव्हा शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारते तेव्हाच देशाची परिस्थिती सुधारते. कारण, शेतकरी हेच अन्नदाते आहेत. त्यामुळे त्यांनी कोणाकडेही पाहू नये किंवा मदतीसाठी कोणावरही अवलंबून राहू नये. शेतकऱ्यांच्या मजबूत हातात राजकीय ताकद आणि आर्थिक क्षमता आहे. असे उपराष्ट्रपती म्हणाले.

कितीही आव्हाने, कितीही अडथळे आले तरी, भारताच्या विकासाच्या प्रवासात शेतकऱ्यांची भूमिका कोणीही कमी करू शकत नाही. आजची शासन व्यवस्था शेतकऱ्यांसमोर नतमस्तक आहे, असे त्यांनी अधोरेखित केले.

शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी ७३० हून अधिक कृषी विज्ञान केंद्रे कार्यरत आहेत, असे म्हणाले. शेतकऱ्यांना कृषी



विज्ञान केंद्रांचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहित करताना उपराष्ट्रपती म्हणाले , शेतकऱ्यांनी या केंद्रात जाऊन विचारावे की - 'तुम्ही आम्हाला कोणत्या सेवा द्याल?' शेतकऱ्यांनी नवीन तंत्रज्ञान आणि सरकारी धोरणांबद्दल जाणून घ्यावे. म्हणजे शेतकऱ्यांना कळेल की सरकारने तुमच्यासाठी एक खजिना उघडला आहे, ज्याची तुम्हाला कदाचित माहिती नसेल. सहकारी संस्था काय करू शकतात हे देखील तुम्हाला माहिती नसेल. असेही ते म्हणाले. उपराष्ट्रपतींनी शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादनांच्या व्यापारात आणि मूल्यवर्धनात सहभागावर भर दिला.

उपराष्ट्रपती म्हणाले, माझे शेतकऱ्यांना आणि शेतकऱ्यांच्या मुलांना आणि मुलींना आवाहन आहे. कृषी उत्पादन हा जगातील सर्वात मोठा आणि सर्वात मौल्यवान व्यापार आहे. माझी नम्र विनंती आहे की - अधिकाधिक शेतकऱ्यांनी सहकारी संस्थांचा फायदा घ्यावा, असे आवाहन त्यांनी तरुणांना कृषी व्यवसायात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करताना केले. शेतकऱ्यांच्या मुलांनी इतर व्यवसायांमध्ये सहभागी व्हावे आणि कृषी उत्पादन व्यवसायात परिश्रमपूर्वक काम करावे, असेही ते म्हणाले. यातून दीर्घकालीन सकारात्मक आर्थिक परिणाम मिळतील, हे त्यांनी अधोरेखित केले.

## मेक्सिकोत ट्रक-बसच्या धडकेत बसला भीषण आग; ४१ जणांचा होरपळून मृत्यू

मेक्सिको : दक्षिण मेक्सिकोमध्ये रस्ते ट्रकची बसला जोरात धडक लागून भीषण अपघात घडला. या धडकेत बसला आग लागली. या आगीत तब्बल ४१ प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला असल्याचे सांगण्यात येत आहे.ही दुर्घटना शनिवारी मेक्सिकोमधील दक्षिणेकडील राज्य असलेल्या तबास्को येथे घडली.

मिळालेल्या माहितीनुसार ४८ प्रवाशांना घेऊन जाणारी बस एका ट्रकला धडकली. बस कॅनकुनहून तबास्कोला येत होती. या अपघातात बसमधील ३८ प्रवासी आणि दोन चालकांचा मृत्यू झाला असल्याचे म्हटले आहे. ट्रक चालकाचाही यामध्ये मृत्यू झाला. या अपघाताची काही छायाचित्रे प्रसिद्ध करण्यात आली आहे, ज्यात स्पष्ट दिसून येतंय कि टक्कर झाल्यानंतर बस आगीच्या भक्ष्यस्थानी पडली आणि पूर्णपणे जळून खाक झाली.

## छत्तीसगडमध्ये ३१ नक्षलवाद्यांना कंठस्नान!

छत्तीसगड : छत्तीसगडमध्ये आज रविवारी सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये मोठी चकमक झाली. बिजापूरच्या राष्ट्रीय उद्यान परिसरात नक्षलवादी आणि सुरक्षा दलाच्या जवानांमध्ये ही चकमक झाली. या चकमकीत ३१ नक्षलवादी ठार झाले आहेत. तर दोन सैनिक शहीद झाले आहेत आणि २ जखमी झाले. सध्या परिसरात शोधमोहीम सुरू आहे.

बिजापूर परिसरात नक्षलवादी लपून बसल्याची माहिती सुरक्षा दलाच्या जवानांना मिळाली होती. यानंतर शोध मोहीम सुरू असताना नक्षलवाद्यांनी अचानक गोळीबार करण्यास सुरुवात केली.



मिळालेल्या माहितीनुसार, बिजापूरच्या फरेसगड पोलीस स्टेशनच्या अंतर्गत येणाऱ्या राष्ट्रीय उद्यान परिसरात महाराष्ट्र आणि छत्तीसगडच्या सीमेवर आज सकाळपासूनच ही चकमक सुरू आहे. सकाळी ८ वाजल्यापासून डीआरजी बिजापूर, एसटीएफ, सी ६० जवानांसोबत चकमक सुरू असल्याची माहिती समोर आली आहे.

या चकमकीत अनेक नक्षलवादी मारले गेले असून आतापर्यंत ३१ नक्षलवाद्यांचे मृतदेह हाती लागले आहेत. यासध्या इतर नक्षलवाद्यांना पकडण्यासाठी शोध मोहीम सुरू आहे. या परिसरात शोध मोहीम राबवल्यावर ठार झालेल्या नक्षलवाद्यांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## घर, प्लॉटवर १ एप्रिलपासून लागणार १० टक्के

अमरावती, ९ फेब्रुवारी : राज्य सरकारने १ एप्रिलपासून रेडिरेकनर दरात १० टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. कोणत्याही मालमतेची म्हणजेच प्रॉपर्टीची ठरविण्यात आलेली मूळ किंमत म्हणजेच रेडिरेकनर दर होय. हे दर आता वाढविले जाणार असल्यामुळे घर, प्लॉट अथवा इतर मालमत्ता खरेदी करावयाच्या विचारात असाल तर एप्रिलपूर्वी व्यवहार केल्यास फायद्याचे ठरू शकते. रेडिरेकनर हे घराच्या, जमिनीच्या किंवा व्यावसायिक वापरासाठीच्या जागांचे प्रमाण दर असतात. हे दर तिथल्या परिसरानुसार आणि राहणीमानानुसार वेगवेगळे असतात. अर्थव्यवस्था, मागणी व पुरवठा यांची स्थिती पाहून दर ठरविले जातात. राज्य सरकारने ठरवून दिलेल्या रेडिरेकनर दरापेक्षा कमी दरात घर, जमीन व इतर मालमत्ता खरेदी केली तरी सरकारी दरानुसारच नोंदणी शुल्क आकारले जाते. त्याशिवाय आपला दस्त रजिस्टर होत नाही. त्यामुळे नियमानुसारच खरेदी करण्याची गरज असते. रेडिरेकनरचे दर वाढल्यास मालमत्ता खरेदी करताना मुद्रांक शुल्कासाठी अधिकचे पैसे मोजावे लागणार आहे. त्यामुळे घर खरेदी करण्याचे स्वप्न आणखी महागणार आहे.

### देवदुर्लभ कार्यकर्त्यांचा बिनीचा शिलेदार हरपला : विनायकराव डंबीर

## संघाचे प्रांत सहकार्यवाह कै. धनंजय घाटे यांना श्रद्धांजली

पुणे - कार्यकर्ता हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कामाचा आधार आहे. म्हणूनच शताब्दी वर्षातही संघ वर्धिष्णू आहे. अशा देवदुर्लभ कार्यकर्त्यांच्या मांदियाळीत अग्रेसर असलेला धनंजय सारखा कार्यकर्ता आज हरपला आहे, अशी भावना जनकल्याण समितीचे प्रांत कार्यकारणी सदस्य विनायकराव डंबीर यांनी व्यक्त केली. एक जबाबदार, निष्ठावंत, प्रांत स्तरावरील कार्यकर्ता अकाली जाणे संघ आणि समाजाच्या दृष्टीने दुर्दैवी आहे. कारण संघाचे दैनिक काम हा धनंजय यांचा श्वास होता, असेही ते म्हणाले.

संघाचे प्रांत सहकार्यवाह कै. धनंजय घाटे यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग शाळेत आयोजित सभेत विनायकराव डंबीर बोलत होते. प्रांत कार्यवाह डॉ. प्रवीण दबडघाव, पुणे महानगराचे संघचालक रविंद्र वंजारवाडकर, प्रांत प्रचारक यशोवर्धन वाळिंबे यावेळी उपस्थित होते.

समाजासाठी पूर्णकालिक कार्यकर्ते देणारे घाटे कुटुंब ही राष्ट्राची संपत्ती आहे असे मत डंबीर यांनी व्यक्त केले. धनंजय घाटे यांना श्रद्धांजली अर्पण करताना ते म्हणाले, एक स्वयंसेवक ते प्रांत सहकार्यवाह असा प्रवास असणारे धनंजय सहजतेने नव्या कार्यकर्त्यांना जोडत होते. संवाद कौशल्य आणि अंतरीच्या उमाळ्याने कार्यकर्त्याची चौकशी ते करत होते. शताब्दी वर्षात संघासमोरील आव्हाने बदलले आहे. अशा स्थितीत संघकार्यासाठी आपणही सातत्याने सक्रीय राहणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

मनापासून समर्पित भावनेने संघाच्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडणारा कार्यकर्ता गमावल्याची खंत डॉ. प्रवीण दबडघाव यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, कुटुंबवत्सल, समर्पित, मितभाषी, नेमके आणि उत्तम नियोजन हा धनंजय यांचा हातखंडा होता. प्रांतात संघ शिक्षित कार्यकर्त्यांची संख्या वाढावण्याचा चंग त्यांनी बांधला होता. त्यासाठी प्रांतभर प्रवास आणि संवाद त्यानी केले. अलिकडच्या काळात संघशिक्षा वर्गांच्या वाढलेल्या संख्येमागे धनंजय यांचा सक्रिय सहभाग होता.

लोकमान्य सायं शाखेतील घाटे यांचे बालमित्र डॉ. राहुल गोखले म्हणाले, आमच्या शाखेतील मितभाषी कार्यकर्ता अशी धनंजयची ओळख होती. प्रचारक राहिलेल्या धनंजय हा आयुष्यात कर्तरी नाही तर कर्मणी प्रयोग करत होता. एक ध्येयवादी समर्पित कार्यकर्ता आणि अंतरिच्या उमाळयाने बोलणाऱ्या मित्राला आम्ही पारखे झालो आहोत.

संघकाम कसे करायचे याची प्रेरणा बाबांकडून मिळाल्याची हृद्य भावना धनंजय यांचे चिरंजीव ज्ञानेश याने व्यक्त केली. तर धनंजय अवेळी, अकाली आणि त्याहीपेक्षा अकारण गेल्याचे दुःख असल्याची खंत प्रांताचे सेवाकार्य प्रमुख शैलेंद्र बोरकर यांनी व्यक्त केली. धनंजय यांचे कार्य पुढे नेऊ अशा शब्दांत अक्षय खांडेकर आणि नरेंद्र कुकडे यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

## विद्यार्थिनीचा अपहरणाचा प्रयत्न फसला

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ९ फेब्रुवारी : पैठण तालुक्यातील बिडकीन येथे सात किमी अंतरावरून शालेय शिक्षण घेण्यासाठी वय १४ वर्षे इयत्ता नववी राहणार तोंडोळी तालुका पैठण जिल्हा संभाजीनगर ही विद्यार्थिनी श्री सरस्वती भुवन विद्यालय , बिडकीन येथे शिकत असून दि ७ शुक्रवार रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास शाळा सुत्यानंतर पायी तोंडोळी येथे घरी जात असताना ( शाळा ते घर अंतर ७ किलोमीटर ) अज्ञात व्यक्तीने तिच्या वडिलांची ओळख सांगून तिला गाडीवर बसण्यासाठी सांगितले असता तिने समयसूचकता दाखवून अज्ञात व्यक्तीला प्रतिप्रश्न केले व



अपहरणाचा प्रयत्न हाणून पाडला. मुलीने दाखवलेल्या धाडसाबद्दल दि.८ शनिवार रोजी सकाळी शाळेमध्ये उपस्थित विद्यार्थी सर्व शिक्षक यांनी तिचे व बिडकीन येथील सहायक निरीक्षक निलेश शेळके यांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. अशीच समय सूचकता इतर दाखवावी, तसेच जागरूक राहणेबाबत आवाहन छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस दलातर्फे करण्यात आले. त्यावेळी शाळेचे मुख्याध्यापक वाय बी येवले तसेच विद्यार्थिनी हिनेदेखील पोलीस दलातर्फे वेळोवेळी घेण्यात आलेल्या जागरूकता कार्यक्रमामुळेच हे शक्य झाले असल्याबाबतची कृतज्ञता शाळेमध्ये बोलतांना व्यक्त केली.

# मानवी संवेदनांची व्याख्या ही बाबा आमटे यांच्या कार्यातून दिसून येते - मुख्यमंत्री

चंद्रपूर, ९ फेब्रुवारी : मानवी संवेदनांची व्याख्या ही बाबा आमटे यांच्या कार्यातून दिसून येते. खऱ्या अर्थाने ज्यावेळी बाबांनी हे कार्य सुरू केले. त्यावेळी हे कार्य अतिशय कठीण होते, शिवाय कुष्ठरोग्याबद्दल समाजात तिरस्काराची भावना होती. मात्र आज या प्रकल्पासोबत स्वतः ला जोडल्या गेल्याचे समाधान वाटतेय. चंद्रपूर सारख्या मागास, आदिवासी बहुल भागात हे कार्य ७५ वर्षापूर्वी हातात घेतलं आणि आज हे कार्य विविध क्षेत्रामध्ये मोठं आणि बहुमोल स्वरूपाचे झाले आहे असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे बोलताना व्यक्त केले . बाबा आमटे आणि साधनाताई आमटे यांनी स्थापन केलेल्या महारोगी सेवा समितीच्या ७५ व्या वर्षपुर्ती निमित्त आयोजित आनंदवनात दोन दिवसीय 'योगदानाचा -कृतज्ञतेचा- सद्भावनेचा- मित्र मेळावा सोहळ्यात ते बोलत होते.

यावेळी राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके, उद्योगमंत्री उदय सामंत, माजी राज्यपाल राम नाईक, आमदार किशोर जोरगेवार, करण देवतळे, महारोगी सेवा समितीचे सचिव डॉ. विकास आमटे, डॉ. प्रकाश आमटे, डॉ. भारती आमटे, डॉ. मंदाकिनी आमटे, कौस्तुभ आमटे व मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

अतिशय कठीण काळात बाबा आमटेंनी महारोगी सेवा समितीच्या माध्यमातून समाजसेवेचे काम सुरू केले. समाजामध्ये ज्या कामाला मान्यता नव्हती, तिरस्कार होत होता, अशा काळात बाबा आमटे यांनी कुष्ठरोग्यांच्या सेवेचे व्रत हाती घेतले. आज ७५ वर्षानंतर अनेक प्रतिष्ठित लोक या संस्थेची जुळले आहेत. या सर्व लोकांना आनंदवनातून आत्मिक समाधान मिळत असते. त्यामुळेच आनंदवन हे ख-या अर्थाने मानवतेचे मंदीर आहे, अशा भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केल्या.

कुष्ठरोग मुक्त भारत करण्याचा पंतप्रधानांचा संकल्प : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा २०२७ पर्यंत कुष्ठरोग मुक्त भारत करण्याचा संकल्प आहे. या कामासाठी शासनाला आनंदवन सारख्या संस्थांची मोलाची मदत घ्यावी लागणार आहे. सन २०१५ मध्ये भारतात प्रति लक्ष ९.७३ कुष्ठरुग्ण सापडायचे. आज प्रती लक्ष ५.५२ रुग्ण आढळतात. त्यामुळे आपल्याला मोठे काम करावे लागेल. यात आनंदवनचा मोठा सहभाग राहील.

आनंदवनच्या अनुदानात वाढ : आनंदवन येथे कौशल्य विकास केंद्र उभे राहत आहे. तसेच निवासी ५०० लोकांचे केंद्र सुद्धा येथे सुरू होणार आहे. सन २०१२ पासून आनंदवनला देण्यात येणाऱ्या अनुदानात आता बदल करण्यात येत असून प्रति रुग्ण २२०० ऐवजी आता ६ हजार रुपये तर पुनर्वसन अनुदान अंतर्गत प्रति रुग्ण २ हजार वरून ६ हजार रुपये देण्यात येणर आहे. आनंदवनला १० कोटी रुपये कॉर्पस फंड लगेच देण्यात येईल. उर्वरित ६५ कोटी रुपये कॉर्पस फंड देण्याकरीता नक्कीच प्रयत्न करणार असून शासन म्हणून आम्ही यासाठी पुढाकार घेऊ. आनंदवन ही समाजाची संस्था आहे. सकारात्मक संस्थेच्या मागे उभे राहणे ही शासनाची जबाबदारी आहे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

आनंदवन येथील सेवाभाव जगाच्या पातळीवर उल्लेखनीय : उद्योगमंत्री उदय सामंत

यावेळी उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले, आनंदवन येथील महारोगी सेवा समितीच्या ७५ व्या वर्षपुर्तीनिमित्त या कार्यक्रमाला उपस्थित राहता आले, हे मी माझे भाग्य समजतो. आनंदवन येथे दिव्यांगांसाठी कौशल्य विकास केंद्र सुरू होत असून उद्योगांशी त्याचा समन्वय करून देण्यात आला आहे. या केंद्राच्या माध्यमातून दिव्यांगांना नोकरी मिळण्यास मदत होईल. शासन म्हणून आनंदवनला पाठबळ देण्याची आमची जबाबदारी आहे. आनंदवन येथील किमान २ टक्के काम, इतर ठिकाणी करू शकलो, तर ती बाबा आमटे यांना खरी श्रद्धांजली ठरेल. सकारात्मक पध्दतीने राज्य चालविणारे आनंदवनला कोणतीही मदत कमी पडू देणार नाही. आनंदवनची उर्जा प्रेरणादायी आहे. येथील सेवाभाव जगाच्या पातळीवर उल्लेखनीय आहे, असे सामंत म्हणाले.

विविध बाबींचे ऑनलाईन उद्घाटन : बाबा आमटे यांच्या जीवनावर मराठी आणि इंग्रजीमध्ये भाषेवर आधारीत चित्रपटाचे ऑनलाईन पध्दतीने मुख्यमंत्री यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याशिवाय एस्ट्याब्लिशींग एम.एम. एस. (महारोगी सेवा समिती) ज हेल्थ कॅपिटल, सोमनाथ येथील श्रमतीर्थ, आनंदवनला डब्ल्यूसीएल कडून मिळालेल्या सोलर पॉवर जनरेशन प्रोजेक्ट, एस्ट्याब्लिशींग एम.एम.एस. ज स्कील डेव्हलपमेंट कॅपिटल आदींचे ऑनलाईन उद्घाटन करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अधिक उत्पादन आणि कमी खर्चातकांदा शेतीत 'महाधन क्रॉपटेक'ची क्रांती

छत्रपती संभाजीनगर : महाधन अॅग्रीटेक लिमिटेडने विकसित केलेले 'क्रॉपटेक'हे क्रांतिकारी व नवीनपूर्णा खत सुरू झाल्यापासूनवर्षभरातच ते भारतभरातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी विश्वासार्ह सहकारी म्हणून प्रस्थापितझाले आहे. 'क्रॉपटेक' आपल्या अनोख्या न्यूट्रिएंट अनलॉक तंत्रज्ञानाद्वारे शेतकऱ्यांना१५ ते २० टक्क्यांपर्यंत अधिक उत्पादन मिळविण्यास मदत करत आहे आणि खतांच्या खर्चातसुमारे २० टक्के पर्यंत बचत करीत आहे.सिद्ध फायदेक्रॉपटेकचे नाविन्यपूर्णएकल-ग्रॅन्युल सूत्र सल्फर, मॅग्नेशियम सारख्या दुय्यम अन्नद्रव्यांसह एनपीकेचे सर्वसमावेशकमिश्रण प्रदान करून झिंक (नप), बोरॉन (इ) आणि फेरस (ऋश) सारख्या महत्त्वपूर्ण सूक्ष्मपोषक द्रव्यांचे वितरण करते. कांदा पिकासाठी शास्त्रोक्त पद्धतीने तयार केलेले क्रॉपटेक८:२१:२१ खतामुळे संतुलीत अन्नद्रव्यांचा पुरवठा करते, अपव्यय कमी आणि निरोगी जमीन सुनिश्चितहोते, ज्यामुळे शेती अधिक शाश्वत आणि फायदेशीर बनते.

## विश्लेषण चाचणीत टाटा सॉल्ट ठरले सर्वोत्तम

मुंबई : भारताच्या आयोडीनयुक्त मीठ क्षेत्रातील आणि बाजारपेठेतील अग्रणी टाटा सॉल्टने १९८३ पासून आपल्या उत्पादनांमध्ये अतुलनीय शुद्धता आणि परिष्करणाची परंपरा कायम ठेवली आहे. प्रयोगशाळेतील चाचणीद्वारे सिद्ध झाले आहे की टाटा सॉल्ट हे देशभरातील १०० मीठांपैकी सर्वाधिक शुद्ध आहे. या उपक्रमामुळे टाटा सॉल्ट केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात शुद्धतेचा आणि प्रामाणिक अस्सलतेचा मापदंड ठरले आहे. टाटा सॉल्ट हे उत्कृष्टतेच्या बांधिलकीने प्रेरित, मीठ उद्योगातील सर्वोच्चतेचे प्रतीक आहे.

## 'बजाज फिनसर्व्ह मल्टी कॅप फंड' लॉँच

नाशिक : बजाज फिनसर्व एएमसीने 'बजाज फिनसर्व मल्टी कॅप फंड' लॉँच करण्याची घोषणा केली आहे. ही एक ओपन-एंडेड इक्विटी योजना असून ती लार्ज कॅप, मिड कॅप आणि स्मॉल कॅप स्टॉकमध्ये गुंतवणूक करणार आहे. सदस्यता (डींलीलीळींळेप)साठी हा फंड ६ फेब्रुवारी २०२५ रोजी सुरू होईल आणि २० फेब्रुवारी २०२५ रोजी बंद होईल. बजाज फिनसर्व्ह मल्टी कॅप फंड न वापरलेल्या आणि कमी मूल्यांकित संधी ओळखण्यासाठी लोकप्रिय भावनेच्या विरोधात जाऊन कन्ट्रेरियन धोरण वापरणार आहे. या धोरणात्मक दृष्टिकोनात अनुकूल नसलेल्या मालमत्ता खरेदी करणे किंवा लोकप्रिय मालमत्ता विकणे समाविष्ट असू शकते. फंड व्यवस्थापक बाजारातील ट्रेंड आणि गुंतवणूकदारांची भावना यांचे बारकाईने विश्लेषण करून मूल्यनिर्धारणातील विसंगती आणि गुंतवणुकीच्या संधी शोधतील. यामध्ये आर्थिक आणि व्यावसायिक चक्रे, तात्पुरते व्यावसायिक अडथळे, उलाढालीच्या गोष्टी आणि दुर्लक्षित वाढीचे घटक यांचा विचार केला जाईल.

## लठ्ठपणा असलेल्या ५ पैकी २ भारतीयांना उच्च रक्तदाब

पुणे : नोव्हो नॉर्डिस्कने केलेल्या अलिकडच्या अभ्यासात, लठ्ठपणा असलेल्या २००० हून अधिक लोक आणि ३०० वैद्य यांचा समावेश होता, आणि त्यामध्ये भारतातील लठ्ठपण असलेल्या व्यक्ती समोरील आव्हानांबद्दल महत्त्वपूर्ण अंतर्ज्ञान समोर आलं आहे. या अभ्यासात लठ्ठपणाबद्दल जागरूकता, समज आणि व्यवस्थापन यांच्यातील महत्त्वपूर्ण फरक अधोरेखित झाला, परिणामी उपचारांसाठी एकात्मिक, दीर्घकालीन दृष्टिकोनाची आवश्यकता ठळकपणे मांडण्यात आली. भारतात लठ्ठपणा व्यवस्थापनासाठी व्यापक दृष्टिकोनाची वाढती गरज देखील यातून दिसून येते. अभ्यासात असं आढळून आलं आहे की भारतातील लठ्ठपणा असलेल्या व्यक्तीं पैकी एक तृतीयांश वव्यक्तींना त्यांच्या स्थितीची तीव्रता माहिती नसते,

## ज्येष्ठ नागरिकांसाठी डिझाइन केलेले विशेष पॅकेज सादर

मुंबई - आयडीएफसी फर्स्ट बँकेने समाजातील वृद्ध सदस्यांच्या विशिष्ट आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी विशेषतः तयार केलेल्या बँकिंग उत्पादनांची आणि सेवांची एक विशेष आणि विशेष श्रेणी सादर केली आहे.या ऑफरमध्ये ज्येष्ठ नागरिक बचत खाते आणि ज्येष्ठ नागरिक मुदत ठेवींचा समावेश आहे, जे या महत्त्वाच्या ग्राहक वर्गासाठी उत्कृष्ट, सुरक्षित आणि सानुकूलित आर्थिक उपाय प्रदान करण्याच्या बँकेच्या वचनबद्धता दाखवते.या कार्यक्रमांतर्गत, बँकेने त्यांच्या मोबाइल बँकिंग अॅपवर 'सिनियर सिटीझन स्पेशल्स' नावाची एक समर्पित सुविधा सादर केली आहे. ही सुविधा ज्येष्ठ नागरिकांना देते.

## प्रिव्हेंटिव्ह ऑन्कोलॉजी क्लिनिकची सुरुवात

पुणे : कॅन्सरचा प्रतिबंध आणि लवकर निदान करण्याच्या दिशेने एक वेगवान पाऊल टाकत, बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटल तर्फे जागतिक कर्करोग दिनाचे औचित्य साधून प्रिव्हेंटिव्ह ऑन्कोलॉजी क्लिनिक ची सुरुवात केली आहे. या क्लिनिक च्या माध्यमातून लोकांना आता वेळेत स्क्रीनिंग, जीवनशैली विषयी मार्गदर्शन आणि धोक्याची गणना करुन लवकरच्या टप्प्यातील सुधारीत उपचार प्राप्त होऊ शकणार आहेत. या वर्षीचा विषय 'युनायटेड बाय युनिक' ला अनुसरुन या उपक्रमाच्या माध्यमातून वैयक्तिक, तंत्रज्ञानावर आधारीत उपचार हे प्रत्येक रुग्णाच्या गरजेनुसार तयार करण्यात येणार आहेत.

## 'बोर्ड परीक्षा स्मार्ट प्रेप सिरीज' सुरू

औरंगाबाद : ऑर्किड्स द इंटरनॅशनल स्कूलने विद्यार्थ्यांसाठी सीबीएसई बोर्ड परीक्षेच्या तयारीत क्रांती आणणारी 'बोर्ड परीक्षा स्मार्ट प्रेप सिरीज' सुरू केली आहे. २५ पेक्षा जास्त आयआयटीयन शिक्षकांनी घेतलेल्या या मालिकेत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, बीजगणित, भूमिती आणि इंग्रजी या विषयांवर सखोल मार्गदर्शन प्रदान केले आहे. यात परीक्षा-केंद्रित धोरणे आणि प्रभावी समस्या-सोडवण्याच्या पद्धतींचा समावेश आहे. या उपक्रमाविषयी बोलताना ऑर्किड्स द इंटरनॅशनल स्कूलच्या आडगाव परिसर प्रमुख ईरा शर्मा यांनी सांगितले की, बोर्ड परीक्षा हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा आहे आणि आम्हाला त्यांना उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी सर्वोत्तम साधने पुरवायची आहेत.

## टोयोटा किर्लोस्कर मोटरकडून 'आनंदी मार्ग एकत्र'

छत्रपती संभाजीनगर : टोयोटा किर्लोस्कर मोटरने ऑटो एक्स्पो - द मोटर शो, भारत मोबिलिटी ग्लोबल एक्स्पो २०२५ मध्ये आपल्या उत्पादनांची आणि प्रगत तंत्रज्ञानाची रोमांचक श्रेणी प्रदर्शित केली. ग्राहकांच्या विकसित होत असलेल्या गरजा आणि आकांक्षा पूर्ण करण्यासाठी खास या श्रेणींची रचना करण्यात आली आहे. टोयोटाने सादर केलेली ही श्रेणी 'सर्वांसाठी मोठ्या प्रमाणात आनंद' या वचनाची पूर्तता करणारी आहे. बहु-मार्ग दृष्टिकोनाद्वारे कार्बन तटस्थता साध्य करण्याच्या प्रयत्नात, टोयोटा पॅव्हेलियन आनंदी मार्गाचे एकत्रिकरण या बॅनरखाली भारतात त्यांची समग्र रणनीती प्रदर्शित करण्यात आली. जी कंपनीची शाश्वत वाढ आणि सामाजिक कल्याणासाठी जागतिक वचनबद्धतेशी सुसंगत आहे.

## एसएमएफजी इंडिया क्रेडिटकडून लघु आणि छोट्या उद्योगांच्या आर्थिक सुबत्तेसाठी नव्या सिनेमाचे अनावरण

अहमदनगर - एसएमएफजी या प्रसिद्ध कंपनीने नुकतेच आपल्या कार्याची महती सांगणा-या माहिती नव्या सिनेमाचे अनावरण केले. व्यवसायवृद्धीसाठी आशा, परिवर्तन तसेच अमर्यादित बाबी कितपत यशस्वी ठरतात यावर हा सिनेमा आधारलेला आहे. लघु तसेच छोटेखानी व्यवसायात गुंतलेल्या व्यावसायिकांना कर्जप्राप्तीची मदत मिळाल्यास त्यांच्या स्वप्नांना गरुडझेप मिळते, हा महत्त्वकांक्षी संदेश कंपनीने या सिनेमातून दिला आहे. रिटेल व्यवसाय करणा-या व्यावसियाकाची सिनेमात कथा मांडली आहे. हा व्यावसायिक आपला व्यवसाय मोठा करण्याची महत्त्वकांक्षा बाळगतो. लयबद्ध संगीत आणि मानवी भावभावनांच्या सुरेख मिलापातून सिनेमाची कथा उलगडते. आपला व्यवसाय वाढवण्यासाठी एसएमएफजी इंडिया क्रेडिट कंपनी व्यावसिकाला कर्ज स्वरुपात मदत करते. या आर्थिक मदतीमुळे व्यावसायिकाच्या संपूर्ण आयुष्यालाच कलाटणी मिळते. व्यावसियाकाची उत्तरोत्तर आर्थिक प्रगती होते. तो यशस्वी व्यावसायिक होतो. मोठी स्वप्ने उराशी बाळगणा-या व्यावसायिकाचे आर्थिक सबलीकरण कसे घडते ही मनोरंजक कथा सिनेमातील प्रत्येक टप्प्यावर मांडली आहे.

# एमजीएमच्या इतिप्रथम याने प्रजासत्ताक दिन शिबिर केले यशस्वीपणे पूर्ण

### सातत्य, मेहनत आणि जिद्दीने एमजीएमच्या इतिप्रथमने पूर्ण केला आरडीसी

छत्रपती संभाजीनगर दि. ९ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या फॉरेन्सिक सायन्स विभागात बीएस्सी तृतीय वर्षात शिकणाऱ्या इतिप्रथम प्रसन्ना याने सातत्य, मेहनत, जिद्द आणि अथक परिश्रम घेत 'रिपब्लिक डे कॅम्प' (आरडीसी) यशस्वीपणे पूर्ण केला आहे. त्याच्या या यशस्वी कामगिरीबद्दल सर्व स्तरातून त्याचे अभिनंदन होत आहे.

इतिप्रथम याने 'रिपब्लिक डे कॅम्प'साठी खडतर प्रकारचे प्रशिक्षण आणि विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत 'बेस्ट कॅडेट' या प्रकारामध्ये आपले स्थान निश्चित केले. त्याने अहमदनगर कॅन्टोन्मेंट येथे इंटर युनिट कम्पिटिशनसाठी १० दिवसांचे ४ कॅम्प, पुणे येथे इंटर ग्रुप कम्पिटिशन येथे एक कॅम्प, प्री आरडीसी १० दिवसांचे ४ कॅम्प आणि यातून निवड होत शेवटी 'रिपब्लिक डे कॅम्प' मध्ये सहभागी झाला. दिनांक २८ डिसेंबर २०२४ ते २९ जानेवारी २०२५ दरम्यान एक महिना दिल्ली येथे त्याने हा कॅम्प यशस्वीपणे पूर्ण केला.



'रिपब्लिक डे कॅम्प'च्या तयारीने माझे व्यक्तिमत्व पूर्णपणे बदलून गेले आहे. यासाठी मी सातत्यपूर्ण ३ महिने तयारी केली असून प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात मला सहभागी होण्याची संधी मिळाली, याचा मला मनस्वी आनंद आहे. या तयारीच्या दरम्यान मला एमजीएम विद्यापीठाने आणि माझ्या प्राध्यापकांनी पूर्णपणे सहकार्य आणि मार्गदर्शन केले. मला देशसाठी खूप काही करायचे असून त्या दृष्टीने माझी तयारी सुरू आहे.
- इतिप्रथम प्रसन्ना, विद्यार्थी

फ्लॅग एरिया ब्रिफर म्हणून जबाबदारी पार पाडत असताना इतिप्रथम याने देशाचे उपराष्ट्रपती जगदीप धनकड, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, चीफ ऑफ आर्मी स्टाफ उपेंद्र द्विवेदी यांना ब्रिफिंग केले. त्याला चीफ ऑफ आर्मी स्टाफ यांचेकडून 'बुकर प्राईज' देऊन सन्मानित करण्यात आले. 'रिपब्लिक डे कॅम्प' यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर महाराष्ट्राच्या सर्व एनसीसी कॅडेट्स यांना राजभवन येथे महामहीम राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांनी भेट घेऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

आपले शिक्षण शिकत असताना इतिप्रथम याने अभ्यासेतर उपक्रम म्हणून राष्ट्रीय छात्र सेनेची निवड केली. तो सध्या आपली एनसीसी ५० महाराष्ट्र बटालियन, औरंगाबाद येथून करत आहे. त्याने एनसीसीची 'बी' प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली असून आता तो सी'प्रमाणपत्र परीक्षा देणार आहे.

## अॅन्ड पिक्चर्स सादर करत आहेत 'औरों में कहां दम था'

मुंबई : या फेब्रुवारीमध्ये अॅन्ड पिक्चर्स वाहिनी भावना, निवडी आणि दुसऱ्या संधींची एक रोमांचक कहाणी घेऊन येत आहे अॅन्ड पिक्चर्सच्या शुक्रवार, ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता 'औरों में कहां दम था' च्या प्रीमियरसह. प्रेक्षकांना आपल्याशा वाटतील अशा कथांसाठी प्रसिद्ध असलेली अॅन्ड पिक्चर्स वाहिनी हा रोमँटिक थ्रिलर चित्रपट सादर करत आहेत जो प्रेम आणि त्याग एखाद्याचे नशीब कसे घडवू शकतात याचा शोध घेतो.

## न्यूरोबिऑनच्या 'सबसे बडा बी' मोहिमेत व्हिटॅमिन-बीचे फायदे स्पष्ट केले गेले आहेत

मुंबई : जवळपास निम्म्या भारतीय मोठ्या व्यक्तींना मुंग्या येणे, सुन्न होणे आणि अशक्तपणा या व्हिटॅमिन-बी च्या कमतरतेच्या१ लक्षणांपासून त्रास होत असतो. नसखराब असल्यामुळे हे उद्भवू शकते आणि ही स्थिती पेरिफेरल न्यूरोपॅथी म्हणून ओळखली जाते.विशेष म्हणजे, ही सूक्ष्म लक्षणे बऱ्याचदा ओळखली जात नाहीत, परिणामी लाखो लोकांना नस खराब होण्याचा त्रास होतो. याकडे दुर्लक्ष केले गेले, तर व्हिटॅमिन-बी च्या कमतरतेमुळे गंभीर परिणाम होऊन दैनंदिन जीवन, शारीरिक क्षमता आणि झोपेच्या गुणवत्तेवर लक्षणीय परिणाम होतो आणि परिणामी नस खराब झाल्याने अपंगत्व येते आणि हालचाल क्षमता बिघडते.न्यूरोबिऑन हा भारताचा १ नर्व्ह केअर ब्रँड आहे आणि त्याने निरोगी नस राखण्याच्या महत्त्वाबद्दल लोकांना शिक्षित करण्याचे उद्दीष्ट ठवलेले आहे आणि 'सबसे बडा बी'ही आपली नवीन मोहीम सुरू केली आहे. व्हिटॅमिन बी चे फायदे आणि नस खराब होण्याची सुरुवात होण्याच्या लक्षणांभोवती ज्ञानाची दरी भरून काढण्यासाठी प्रयत्ने सुरु आहेत आणि ही मोहीम त्यात एक पुढचे पाऊल आहे. प्रेमाने 'बिग-बी' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या महानायक श्री. अमिताभ बच्चन यांच्यासोबत या मोहिमेत सामान्य व्हिटॅमिन-बी गोळ्यांच्या तुलनेत न्यूरोबिऑनच्या ३पट व्हिटॅमिन-बी च्या सामर्थ्यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

## लघु आणि छोट्या उद्योगांच्या आर्थिक सुबत्तेसाठी नव्या सिनेमाचे अनावरण

नाशिक - एसएमएफजी या प्रसिद्ध कंपनीने नुकतेच आपल्या कार्याची महती सांगणा-या माहिती नव्या सिनेमाचे अनावरण केले. व्यवसायवृद्धीसाठी आशा, परिवर्तन तसेच अमर्यादित बाबी कितपत यशस्वी ठरतात यावर हा सिनेमा आधारलेला आहे. लघु तसेच छोटेखानी व्यवसायात गुंतलेल्या व्यावसायिकांना कर्जप्राप्तीची मदत मिळाल्यास त्यांच्या स्वप्नांना गरुडझेप मिळते, हा महत्त्वकांक्षी संदेश कंपनीने या सिनेमातून दिला आहे.रिटेल व्यवसाय करणा-या व्यावसियाकाची सिनेमात कथा मांडली आहे. हा व्यावसायिक आपला व्यवसाय मोठा करण्याची महत्त्वकांक्षा बाळगतो. लयबद्ध संगीत आणि मानवी भावभावनांच्या सुरेख मिलापातून सिनेमाची कथा उलगडते. आपला व्यवसाय वाढवण्यासाठी एसएमएफजी इंडिया क्रेडिट कंपनी व्यावसिकाला कर्ज स्वरुपात मदत करते. या आर्थिक मदतीमुळे व्यावसायिकाच्या संपूर्ण आयुष्यालाच कलाटणी मिळते. व्यावसियाकाची उत्तरोत्तर आर्थिक प्रगती होते. तो यशस्वी व्यावसायिक होतो. मोठी स्वप्ने उराशी बाळगणा-या व्यावसायिकाचे आर्थिक सबलीकरण कसे घडते ही मनोरंजक कथा सिनेमातील प्रत्येक टप्प्यावर मांडली आहे.

## सर्वसमावेशक हेल्थ इन्श्युरन्स प्लॅन 'हेरिज़ोन केअर' लॉँच

मुंबई : भारतातील अग्रगण्य प्रायव्हेट जनरल इन्श्युरर बजाज आलियान्झ जनरल इन्श्युरन्सने आज 'हेरिज़ोन केअर' सुरू करण्याची घोषणा केली आहे, जे विशेषत: महिलांच्या विकसित होत असलेल्या हेल्थकेअर गरजा पूर्ण करणारे विचारपूर्वक डिझाईन केलेले सर्वसमावेशक हेल्थ इन्श्युरन्स प्रॉडक्ट आहे. ही सर्वसमावेशक पॉलिसी गंभीर आजार, मातृत्व आणि प्रजनन आरोग्य, स्वास्थ्य आणि बऱ्याच गरजांची पूर्तता करते, महिलांना त्यांच्या आयुष्याच्या संपूर्ण टप्प्यात आर्थिक सुरक्षा प्रदान करते. हेरिज़ोन केअर हा भारतातील पहिला हेल्थ इन्श्युरन्स प्लॅन आहे जो एकाच पॉलिसीमध्ये एकाधिक विशेष कव्हर ऑफर करतो, जे महिलांच्या युनिक गरजांनुसार तयार केलेले समग्र संरक्षण प्रदान करते.

# अहिल्यादेवी धर्माधिष्ठीत सत्ताकारणाचा आदर्श : कॅप्टन मीरा दवे

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी अभिवादन समारोह

चौंडी (अहिल्यानगर), दिनांक ९ फेब्रुवारी : अहिल्याबाईंच्या रूपाने चौंडीच्या भूमितच ३०० वर्षांपूर्वी बलिदान, न्याय आणि धर्माचा वटवृक्ष रूजला होता. ज्यांनी माळवा प्रांतात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य साकारले होते. अहिल्यादेवींचे लोककल्याणकारी राज्य म्हणजे धर्माधिष्ठीत सत्ताकारणाचा आदर्श होय, असे प्रतिपादन भारतीय सैन्याच्या कॅप्टन मीरा दवे यांनी केले.



चौंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी अभिवादन समारोहाच्या समारोप कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी राष्ट्र सेविका समितीच्या केंद्रिय कार्यकारिणी सदस्य भाग्यश्री साठे, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्षा स्मिता कुलकर्णी, सचिव डॉ. पी. व्ही. शास्त्री उपस्थित होते.

मीरा दवे म्हणाल्या,लोकमाता अहिल्यादेवींची दृष्टी ही राष्ट्रव्यापी होती. मातृशक्तीने घरापर्यंत मर्यादित नसावे. घरातून झालेले संस्कार समाज घडवतात आणि समाजातून राष्ट्र निर्माण होते. त्यामुळे अहिल्याबाईंच्या कर्तृत्वातील एक अंश आपल्यातही रूजायला हवा.

तेजस्वी, धर्मनिष्ठ, न्यायप्रिय, लोकप्रशासक आणि सशक्त नेतृत्त्व असलेल्या अहिल्याबाईंना समाज जीवनात पोहोचवायला हवे असे आवाहन भाग्यश्री साठे यांनी केले. त्या म्हणाल्या, आपण कार्यरत असलेल्या क्षेत्रात अहिल्याबाईंचे जीवनचरित्र पोहचवावे. त्यासाठी संशोधन, व्याख्याने, नाटक, नृत्य, अशा आयामांचा वापर करायला हवा. अहिल्यादेवींच्या नावाने संपूर्ण देशात विमर्श उभा राहायला हवा.

सोहळ्याच्या उद्घाटन सत्रात विधानपरिषेदेचे सभापती व अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज राम शिंदे यांनी सांगितले की, व्यक्तिगत आयुष्यात अनेक दुःखे असताना अहिल्यादेवींनी राष्ट्रनिर्माणाचे आणि लोकसेवेचे कार्य अविरत चालू ठेवले. सामाजिक न्याय, महिला कल्याण, व्यापार, कृषी आणि न्यायव्यवस्थेत त्यांनी केलेले कार्य आज आपल्यासाठी दिशादर्शक आहे. संपूर्ण राष्ट्रासाठी अहिल्यादेवी एक प्रेरणास्त्रोत आहे.

तर आरोग्याच्या कारणास्तव अनुपस्थित राहिलेल्या दिल्लीस्थित जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. शांतीश्री पंडित यांनी ध्वनिचित्रफितीच्या माध्यमातून आपले मनोगत व्यक्त केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी ३०० वर्षांपूर्वी महिलाधारीत विकासकार्य केले. आज आत्मनिर्भर भारतासाठी अहिल्याबाईंचे लोकराज्य खऱ्या अर्थाने मार्गदर्शक आहे, असे मत डॉ. पंडित यांनी व्यक्त केले.

या उद्घाटन सत्रात प्रमुख पाहुण्या म्हणून लोकमाता अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी समारोह समितीच्या सचिव कॅप्टन मीरा दवे, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्षा स्मिता कुलकर्णी, सचिव डॉ. पी.व्ही.एस. शास्त्री, सरपंच मालनताई शिंदे, माजी मंत्री आणि चौंडी विकास प्रकल्पाचे निर्माते अण्णासाहेब डांगे उपस्थित होते. या प्रसंगी राज्याच्या महिला व बालकल्याण, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, माजी केंद्रीय मंत्री डॉ. भारती पवार, आमदार मोनिका राजळे उपस्थित होत्या.

कार्यक्रमात एकता मासिकाच्या अहिल्यादेवींवरील हिंदी विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच चिन्मयी मुळे लिखित आणि देविदास देशपांडे अनुवादित 'अदम्य चैतन्याची महाराणी' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. कलावर्धिनी नृत्य समूहाच्या अरुंधती पटवर्धन व त्यांच्या समूहाने अहिल्यादेवींचा जीवनपट उलगडून सांगणारी नृत्यनाटिका सादर केली.

# अहिल्यादेवींनी भारताच्या सांस्कृतिक एकतेची पुनर्स्थापना केली; परिसंवादात उमटला सूर

अहमदनगर : प्रशासनातील लोककल्याणकारी वैविध्यता, समाजहितकारक सर्वसमावेशकता आणि देशभर धर्म व एकात्मतेसाठी आध्यात्माची गुंफण अशा मौलिक गोष्टींचा वारसा अहिल्यादेवींनी दिला आहे. त्यांनी खऱ्या अर्थाने भारताच्या सांस्कृतिक एकात्मतेची पुनर्स्थापना केली, असा सूर चौंडी येथे आयोजित राष्ट्रीय परिसंवादात उमटला.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी अभिवादन कार्यक्रमात आयोजित परिसंवादात लोकमाता अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी समारोह समितीच्या सचिव डॉ. मालासिंह ठाकुर, नयना सहस्त्रबुद्धे, अभ्यासक डॉ. आदिती पासवान, लेखिका चिन्मयी मुळे उपस्थित होते. अहिल्याबाईंच्या लोककल्याणकारी राज्यावर प्रकाश टाकताना चिन्मयी मुळे म्हणाल्या,अहिल्यादेवींनी न्याय, निष्पक्षता आणि समाजकल्याणाला सर्वाधिक स्थान दिले.त्यांचे शासन सर्व वर्गासाठीचे होते. त्यांनी महिलांचा सैन्यात समावेश केला. विधवांना दत्तक घेण्याचा अधिकार दिला. राष्ट्रीयतेची वृत्ती समाजातील प्रत्येक घटकात उतरविण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

भारताच्या सांस्कृतिक एकतेची पुनर्स्थापना करण्याचे कार्य अहिल्याबाईंनी केले, असे मत डॉ. मालासिंह ठाकुर यांनी व्यक्त केले. त्या म्हणाल्या, अखंड भारतातील धार्मिक स्थळांचे केवळ पुनर्निर्माण केले नाही. तर त्यांना स्वावलंबी करण्याचे कार्य लोकमातेने केले. सांस्कृतिक राष्ट्रवादाचे एक उत्तम उदाहरण म्हणजे अहिल्यादेवी होय. समाजातील कर्मठ चालीरितींना त्यांनी धाडसाने मूठमाती दिली. एवढेच नव्हे तर त्यासोबत समरसतेचे कार्य देखील समाजाच्या सर्व घटकांपर्यंत कसे पाहोचेल असे त्यांनी पाहिले.

डॉ. आदिती पासवान म्हणाल्या, अहिल्याबाई केवळ प्रशासक नाही तर समाजसेवक होत्या. त्यांनी अनिष्ठ चालीरीतींना तिलांजली दिली. प्रगल्भ दूरदृष्टी असलेल्या अहिल्याबाईंनी आर्थिक विकासाचे मोठे कार्य केले, असे प्रतिपादन नयना सहस्त्रबुद्धे यांनी केले. त्या म्हणाल्या, सुशासनाचे वातावरण, कल्याणकारी कर आणि नितीपूर्ण संकलन ही अहिल्याबाईंच्या धर्मराज्याची वैशिष्ट्ये होते. उपभोग शुन्य राणी असलेल्या अहिल्याबाईंनी महिलांना केवळ अधिकार नाही तर कर्तव्याचीही जाणिव करून दिली. भारताला आर्थिक महासत्तेचे स्वप्न पाहायचे असेल तर महिलांच्या सहभागातून विकास साधायला हवा.

माधुरी खांबेटे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर स्मिता कुलकर्णी यांनी आभार मानले. वंदे मातरम्ने सोहळ्याची सांगता झाली.

**महिलांचे औक्षण** : भारतभरातून आलेल्या सुमारे ५०० महिलांनी अहिल्यादेवींचा वाडा, जन्मस्थान, गढी आणि ऐतिहासिक मंदिराला भेट दिली. यावेळी सर्व महिलांचे प्रथेनुसार हळदी-कुंकू आणि औक्षण करून स्वागत करण्यात आले. यावेळी रांगोळ्यांची सजावट आणि फुलांच्या पायघड्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. चौंडीतील स्वागतामुळे माहेरमेळ्याची अनुभूती आल्याची प्रतिक्रिया महिलांनी दिली. अहिल्यादेवींचा विचार समाजात सर्वदूर पोहचवू असा संकल्प त्यांनी यावेळी केला.

# श्रीगोंदा येथे शासकीय योजनांचा महामेळावा संपन्न

### समाजातील वंचित घटकांच्या विकासातूनच प्रगतशील आणि संपन्न राष्ट्र निर्माण होईल - न्यायमूर्ती विभा कंकणवाडी

अहिल्यानगर, दि. ७- देश स्वातंत्र्याच्या अनेक वर्षानंतरही संविधानाने दिलेले हक्क, अधिकारांबाबत समाजातील अनेक घटक अनभिज्ञ आहेत. शेवटच्या घटकापर्यंत त्यांचे हक्क, अधिकाराची माहिती पोहोचाविण्यासोबतच शासनाच्या विविध योजनांद्वारे समाजातील वंचित घटकांच्या विकासातूनच प्रगतशील व संपन्न राष्ट्र निर्माण होईल, असा विश्वास मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती श्रीमती विभा कंकणवाडी यांनी व्यक्त केला.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, तालुका विधी सेवा समिती व तालुका वकील संघ, श्रीगोंदा यांच्या संयुक्त विद्यमाने श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय श्रीगोंदा येथे शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा व प्रत्यक्ष लाभ वितरण कार्यक्रमाचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती श्रीमती विभा व. कंकणवाडी व न्यायमूर्ती संतोष चपळगावकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमास प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा श्रीमती अंजू शेंडे, जिल्हा न्यायाधीश तथा श्रीगोंदा तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष मुजीब शेख, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव भाग्यश्री पाटील, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लांगोरे,श्रीगोंदा तालुका वकील संघाचे अध्यक्ष अशोक वाळुंज आदी उपस्थित होते.

न्यायमूर्ती विभा कंकणवाडी म्हणाल्या, शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी निकषांची पूर्तता करत असला तरी केवळ योजनांच्या माहितीचा अभाव असल्यामुळे योजनांचा लाभ त्यांना घेता येत नाही. सर्वांच्या सहकार्यातून घेण्यात येत असलेले अशा प्रकारचे मेळावे शासनाच्या योजनांच्या सफलतेसाठी उपयुक्त ठरत आहेत. न्यायपालिका व प्रशासनाच्या पुढाकाराने एकाच छताखाली मेळाव्याचे आयोजन हा सामाजिक न्याय देणारा कार्यक्रम असल्याचेही त्या म्हणाल्या.



संविधानाने प्रत्येकाला दिलेल्या अधिकारांची, हक्कांची माहिती असणे आवश्यक आहे. समाजातील आदिवासी, दुर्बल,निरक्षरांना त्यांच्या हक्कांची माहिती नाही. त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन अनेक योजना राबवित असले तरी या योजना प्रत्येक गरजूपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी ही आपल्या प्रत्येकाची असल्याचेही त्या म्हणाल्या.

जिल्ह्यात शासनाच्या अनेक योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी केल्याबद्दल जिल्हाधिकारी श्री.सालीमठ तसेच प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचे कौतुक करत भूसंपादन प्रकरणामध्ये जमीनधारकाला तातडीने मोबदला देण्यासाठी निधी वेळेत उपलब्ध होण्यासाठी पाठपुरावा करण्याची सूचनाही त्यांनी यावेळी केली.

न्यायमूर्ती संतोष चपळगावकर म्हणाले, न्यायाची संकल्पना केवळ न्यायालयातून न्यायदान एवढीच न ठेवता त्याची व्याप्ती वाढवून संविधानाचे उद्दिष्ट लक्षात घेत कायद्यात बदल करून विधी सेवा प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली. विधी सेवा प्राधिकरण हे न्याय संस्थेचे एक अंग असून आर्थिक पाठबळ आणि कायद्याचे ज्ञान नसलेल्यांना मदतीचा हात देण्याचे काम हे प्राधिकरण करत आहे. न्यायाच्या कक्षा रुंदावल्या गेल्या आहेत. कार्यक्रमातून शासनाच्या योजनांच्या लाभाच्या वाटपावेळी लाभार्थ्यांच्या डोळ्यात दिसलेला आनंद हाच खरा न्याय असल्याचेही ते म्हणाले.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे म्हणाल्या, न्यायाची परिभाषा केवळ शब्दांमधून उतरवलेला न्यायनिर्णयाने न ठरता समाजातील प्रत्येकापर्यंत न्याय पोहोचून जगण्यासाठी बळ देण्याच्या संकल्पनेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शासनाच्या अनेक योजना आहेत. शासन आणि प्रशासन यांच्यातील दुवा म्हणून न्यायपालिका काम करत आहे. गतकाळात विधी प्राधिकरणामार्फत पॅनइंडिया कार्यक्रम घेण्यात आला.या माध्यमातून हेल्पलाईन, मनोन्याय, बालस्नेही, मनोधैर्य योजना यशस्वीपणे राबविण्यात आल्या. कायद्याच्या ज्ञानाबरोबरच शासकीय योजनांचा लाभ सामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम प्राधिकारणाच्यावतीने करण्यात येत असल्याचेही त्या म्हणाल्या.

जिल्हाधिकारी श्री. सालीमठ म्हणाले, शासन आपल्या दारी उपक्रमातून जिल्ह्यातील २५ लाखापेक्षाही अधिक लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देत जिल्हा राज्यात अग्रेसर ठरला. तसेच लाडकी बहिण योजनेंतर्गत १२ लाख महिला भगिनींना लाभ देण्यात आला. प्रधानमंत्री आवास योजना ( ग्रामीण) योजनेच्या पहिल्या टप्प्यात जिल्ह्याने उद्दिष्ट पूर्ण केले असून दुसऱ्या टप्प्यात सर्व मान्यता देण्यात आल्या आहेत. सेवा हमी कायद्यात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून सेवा देण्यावर भर देण्यात येत असल्याचेही ते म्हणाले.

प्रास्ताविकात भाग्यश्री पाटील म्हणाल्या, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या विविध योजनांचा लाभ पोहोचवून त्यांचे जीवनमान उंचावण्याच्यादृष्टीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमात शासनाच्या विविध विभागांच्या एकूण ४८ स्टॉलची उभारणी करण्यात आली आहे. हा कार्यक्रम केवळ एक दिवसापूरता न राहता तो अविरतपणे सुरू राहील. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्यावतीने तडजोडीने विविध प्रकरणे मिटवण्याचा प्रयत्न केला जातो. गतवर्षात प्राधिकरणाच्या माध्यमातून १२ हजार ७९ प्रकरणे तर मध्यस्थी केंद्राच्या माध्यमातून १ हजार १०३ प्रकरणे तडजोडीने मिटविण्यास यश आल्याचेही त्या म्हणाल्या.

# आव्हाने पेलणारी पोलादी पिढी उभी करणार

### क्रांती दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष मिसाळ यांचे प्रतिपादन



छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

लोकशाही मूल्ये सुरक्षित राहिली तरच देश सुरक्षित राहील. त्यासाठी आव्हाने पेलणारी आंबेडकरवादी पोलादी पिढी उभी करणार असल्याचा निर्णय भारतीय क्रांती दलाच्या चर्चासत्रात घेण्यात आला. नुकताच भाई शैलेंद्र मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली गांधी भवनमध्ये 'आंबेडकरी चळवळीसमोरील पुढील आव्हाने' या निर्णयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी भाई मिसाळ बोलत होते.

कार्यक्रमाचे उद्घाटनअंबादास दगडे यांनी केले. यावेळी सामाजिक विचार मंचचे सुभाष ठोकळ यांनी समाजाला शासनकर्ती जमात बनवण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी फळी उभी करण्याचे आव्हान केले. तसेच ज्येष्ठ पत्रकार स. सो. खंडाळकर, विलास कटारे, ड. रवींद्र साळवे यांनीही मार्गदर्शन केले.

सूत्रसंचालन रमेश साळवे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मच्छिंद्रनाथ ढेपे, रामदास मगरे, अजीम पटेल, सय्यद अहमद मिर्झा, शफिक बेग, नारायण साळवे, विक्रम जावळे, राजू त्रिभुवन, गणेश निंभोरे, गौतम पठारे, शफिक शेख, नजीर शेख, ज्ञानेश्वर गायकवाड, कृष्णा शिंदे, बाबा खान, चंद्रकांत मगरे, कडूबा मोकळे, पूजाताई चांदणे, अमोल निकाळजे, विलास भालेराव यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# ज्येष्ठ साहित्यिक रा. रं. बोराडे यांचा मसापतर्फे सत्कार

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य रा. रं. बोराडे यांना महाराष्ट्र शासनाचा विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार घोषित झाल्यानंतर मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने विद्यानिकेतन कॉलनीतील 'शिवार' निवासस्थानी त्यांचा सत्कार करण्यात आला. प्रकृती अस्वास्थ्यामुळे बोराडे यांच्या पत्नी श्रीमती सुलभा बोराडे यांनी सत्काराचा स्वीकार केला.

यावेळेस मसापचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले-पाटील, कार्यवाह डॉ. दादा गोरे, सहकार्यवाह डॉ. गणेश मोहिते कार्यकारिणीचे ज्येष्ठ सदस्य कुंडलिकराव अतकरे उपस्थित होते.

मसापने प्राचार्य बोराडे यांना जीवनगौरव पुरस्कार देण्याची शिफारस शासनाकडे केली होती. शासनाने त्याची तत्काळ दखल घेतली, याबद्दल मसापच्या पदाधिकाऱ्यांकडून आनंद व्यक्त करून शासनाचे आभार मानले.

मनस्वी आनंद : बोराडे

राज्य सरकारचा विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल मनस्वी आनंद झाल्याची प्रतिक्रिया प्राचार्य बोराडे यांनी व्यक्त केली. दरम्यान, विविध साहित्यिकांनी बोराडे यांची भेट घेऊन अभिनंदन केले. प्राचार्य बोराडे यांच्या 'पाचोळा' या गाजलेल्या कादंबरीचा सुवर्ण महोत्सव दोन वर्षांपूर्वी साजरा झाला.

## प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास भडजी येथे रथ यात्रेचे स्वागत




खुलताबाद प्रतिनिधी : घटक २.०अंतर्गत वॉटर शेड रथ यात्रा ग्रामपंचायत(पाणलोट समिती) भडजी या ठिकाणी शुभारंभ करून रथ यात्रेचे स्वागत करण्यात आले. वॉटर शेड रथ यात्रा मध्ये शपथ घेण्यात आली.निबंध,चित्रकला,रांगोळी स्पर्धेतील मुलांना /मुलींना प्रमाणपत्र देण्यात आले.त्यासोबत पाणलोट योद्धा,धरणीताई यांना प्रमाणपत्र देण्यात आले.वॉटर शेड रथ यात्रेचे महत्व सांगण्यात येऊन व्हिडिओ दाखविण्यात आले.या नंतर रथ यात्रा सोबत जनजागृती करून प्रभात फेरी काढण्यात आली.सिमेंट नाला बांध,शेततळे यांचे लोकार्पण करण्यात आले.फळबाग लागवड भूमिपूजन करण्यात आले. सदरील कार्यक्रमासाठी. प्रकाश वाकळे जिल्हा उपाध्यक्ष भाजपा छत्रपती संभाजीनगर , सरपंच बाबासाहेब वाकळे, उपसरपंच सोनाली राजु वाकळे,मंडळ कृषी अधिकारी किशोर पाडळे कृषी पर्यवेक्षक आर. पी. ढेंगळे ,कृषी सहायक पदमे मधुकर वाकळे प्रगतशील शेतकरी, गणेश वाकळे पाणलोट समिती सचिव,तालुका समन्वयक कल्याण कुलकर्णी,अवतार आरके,सुनील जगताप, पी टी ओ संस्था अब्दुल सलाम पठाण ग्रामीण विकास संस्था ,सचिव मुश्ताक पठाण ,संतोष ढोरे समन्वयक, पाणलोट समिती सचिव,सदस्य,ग्रामपंचायत सदस्य,पाणलोट योद्धा,धरणी ताई,बचतगटातील महिला,पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शालेय विद्यार्थ्यांकडून शिक्षकांनीच करून घेतले अमानुष काम

## कौशल्य विद्यामंदिर पाटेगांव शाळेचा प्रताप

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०९ :- पैठण शहरातील उद्यान रोड गॅस ऑफिस जवळ असलेल्या एका बिल्डिंगच्या दुसऱ्या मजल्यावरून पाटेगांव येथील कौशल्य विद्या मंदिर ज्युनिअर कॉलेज याठिकाणी नेण्यात येणारे वजनी लोखंडी बेंच ट्रॅक्टर मध्ये चढवण्यासाठी चक्क शिक्षकांनीच शालेय विद्यार्थ्यांकडून अमानुष पध्दतीने हमालीकाम करून घेतल्याच्या धक्कादायक प्रकार घडला असून याप्रकरणी शिक्षण विभाग संबंधित शाळेवर काय कार्यवाही करणार याकडे पालकांचे लक्ष लागले आहे.

पैठण जवळ असलेला पाटेगांव येथे कौशल्य विद्या मंदिर ज्युनियर कॉलेज असून याठिकाणी १ ले १२ वी पर्यंत शिक्षण दिले जाते. शुक्रवारी पैठणहुन या शाळेवर दोन ट्रॅक्टर भरून लोखंडी बेंज आणण्यात आले. परंतु दुर्दैव असे की शाळेतील शिक्षकांनीच ट्रॅक्टर मध्ये बेंच भरण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांकडून अमानुष काम करून घेतले. शालेय विद्यार्थ्यांनी चक्क दुसऱ्या मजल्यावरून डोक्यांवर अत्यक्त वजनी असलेले लोखंडी बेंच खाली आणत ते ट्रॅक्टर मध्ये चढवले यावेळी शिक्षक कमरेवर हात ठेऊन विद्यार्थ्यांना दम देऊन अमानुष काम करून घेत होते.



शालेय विद्यार्थ्यांना याप्रकारे अमानुष वागणूक दिली असेल तर नक्कीच या शाळेच्या विरोधात कार्यवाही करण्यात येईल..

जयश्री चव्हाण जिल्हा शिक्षण अधिकारी जि. प. छत्रपती संभाजीनगर.

शालेय मुलांसोबत घडलेला हा प्रकार संतापजनक आहे. शाळेतील शिक्षकच जर मुलांकडून असे काम करून घेत असतील तर हे खूप गंभीर आहे.याविषयी सविस्तर माहिती घेऊन कार्यवाही करू..

वाय एस पडियाल बालकामगार अधिकारी पैठण.

शालेय विद्यार्थ्यांकडून हमाली काम करून घेणे अत्यंत वाईट असून या दुर्दैवी प्रकरणावर कार्यवाही करण्यात येईल..

श्रीराम केदारे तालुका शिक्षण अधिकारी पंचायत समिती.

# बिडकीन येथे राज्यस्तरीय अखंड हरिनाम सप्ताह नियोजन जागेची पालकमंत्री संजय शिरसाट यांनी केले पाहणी

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ९ फेब्रुवारी : पैठण तालुक्यातील बिडकीन येथे श्री जगद्गुरु तुकाराम महाराज त्रिशतकोत्तर अमृत महोत्सवी ३७५ वा वैकुंठ गमन सोहळा निमित्ताने बिडकीन येथे राज्यस्तरीय अखंड हरिनाम सप्ताह भव्यदिव्य गाथा पारायण तथा संगीत रामकथा व किर्तन महोत्सव सोहळा दि ९ मार्च ते १६ मार्च ज्ञानेश्वरी उपासक ह भ प. एकनाथ महाराज जाधव गीता आश्रम श्री क्षेत्र लोहगाव यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे



या सप्ताहामध्ये कथा प्रवक्त रामायणाचार्य ह भ प रामरावजी महाराज ढोक नागपूर संगीतमय कथा वाचन करणार आहे,

या राज्यस्तरीय अखंड हरिनाम सप्ताहाचे स भु विद्यालय बिडकीन मैदानाची नियोजित जागा मैदानाची पाहणी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, माजी महापूर नंदकुमार घोडले, यांनी पाहणी करुन सांगितले की भव्य दिव्य गाथा पारायण साठी मदत करण्यासाठी मी तात्पर्य असून कोणतीही अडीअडचणी आल्यास मी मदत करण्यास तयार आहे, तसेच या कार्यक्रमासाठी मी महाराष्ट्र राज्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना येण्यासाठी आमंत्रित करीन असे पालकमंत्री यांनी सांगितले यावेळी राज्य स्तरीय अखंड हरिनाम सप्ताहाचे मार्गदर्शक ह भ प एकनाथ महाराज जाधव, सरपंच अशोक धर्मे,सागर फरताळे, पत्रकार नंदकुमार वैद्य, किसानलाल तोतला, ड सतीश हाडे,ज्ञानेश्वर कांबळे, रमेश शिंदे, काकासाहेब टेके, अनिल गव्हाणे, कांता डोळस, अंकुश धर्मे, राहुल ठाणगे,आदींची उपस्थिती होती.

# श्री मुक्तानंद महाविद्यालयात आज दोन दिवसीय उद्योजकता विकास कार्यशाळेचा समारोप

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.९: श्री मुक्तानंद महाविद्यालयात सुरू असलेल्या उद्योजकता विकास कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी पहिल्या सत्रामध्ये डॉ. अंकुश पाडळे यांनी कॅपिटल मार्केटवर मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी इंडोजर्मन टूल रूम चडचए-ऊत्र्ज चे मॅनेजर जयेश बागुल यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी इंडोजर्मन टूल रूम कसे काम करते, कुठल्या प्रकारे कौशल्य विकास घडविते, त्याच बरोबर उद्योजकांना कश्या प्रकारे मदत करते त्याबद्दल माहिती दिली. त्याच बरोबर विविध कोर्सेसची माहिती त्यांनी यावेळी दिली. याच सत्राचे मुख्य मार्गदर्शक म्हणुन असलेले उइऋ डढऊ चे संचालक राजेश चंचलानी यांनी विद्यार्थांना त्यांच्या जीवनाचे ध्येय काय आहे याबाबत आत्मपरीक्षण करायला लावले. तुम्ही एका विशेष ध्येयासाठी जगले पाहिजेत याची जाणीव करून दिली. त्याच बरोबर तुम्हाला स्पर्धेच्या युगात




जगायचे असेल तर तुम्ही काही विशेष स्किल्स मिळवल्या पाहिजेत तर आणि तरच तुम्ही टिकू शकताल. तुमच्यात कार्यक्षमता असायला हवी. जिथंला तरुण कार्यक्षम आणि सरकार प्रभावी असते तो देश प्रगती करतो. आपल्या देशाची लोकसंख्या पाहता. भविष्यात नोकरीच्या संधी खुप कमी होइल. देशातील कृषिवर वाढत्या लोकसंख्येचा विपरीत परिणाम आणि कमी होत चाललेले धारण क्षेत्र लक्षात घेता स्वयंरोजगारातून नोकऱ्यांची निर्मिती केली पाहिजेत. त्याच बरोबर त्यांनी मेहंदी, रांगोळी, लग्नसभारंभ, कृषि व कृषिविषयक स्वयंरोजगार इत्यादी संबंधीत रोजगार आणि अर्थव्यवस्था समजावून सांगितली. त्याच बरोबर सरकारच्या विविध योजना व त्यांचा लाभ कसा घ्यावा यावर मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थांकडून भविष्यात आम्ही आई वडिलांचे नाव मोठे करुत, नेगेटिव्हिटी काढून पॉझिटीव्हिटीने काम करून मोठे होऊन दाखवू याबद्दल हमी घेतली.

या दोन दिवसीय उद्योजकता विकास कार्यशाळेचे समन्वयक डॉ. प्रमोद शर्मा, संयोजक प्रा. डॉ. संदीप गायकवाड हे होते. तसेच कार्यक्रमचे सूत्रसंचालन डॉ. दिपक निकम तर आभार श्रीमती. शिल्पा कातुरे यांनी मानले.

याप्रसंगी इंडोजर्मन टूल रूमचे पुंड साहेब, ठोंबरीकर साहेब, उपप्राचार्य डॉ. वैशाली बागुल, उपप्राचार्य डॉ.बी.टी. पवार, उपप्राचार्य प्रा.विशाल साबणे, पर्यवेक्षक डॉ. हरिराम सातपुते तसेच विद्यार्थी, प्राध्यापक प्राध्यापक तसेच प्रशासकीय कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (३६) प्रार्थना (२)

प्रभो शक्तिमन् हिन्दुराष्ट्राङ्गभूता
इमे सादरं त्वां नमामो वयम्
त्वदीयाय कार्याय बद्धा कटीयं
शुभामाशषं देहि तत्पूर्तये। अजय्यां च विश्वस्य देहीश शक्तिम् सुशीलं जगद् येन नम्र भवेत् श्रुतं चैव यत् कण्टकाकीर्णमार्गं स्वयं स्वीकृतं नः सुगङ्कारयेत् २।

अर्थः- हे सर्व शक्तिमान परमेश्वरा हिंदू राष्ट्राचे आम्ही पुत्र तुला सादर प्रणाम करतो. तुझ्याच कार्यासाठी आम्ही कटिबद्ध झालो आहोत. या कार्याच्या पूर्ततेसाठी आम्हाला तू शुभाशीर्वाद दे. हे प्रभू आम्हाला अशी शक्ती दे की जिला आव्हान देण्याचे धैर्य जगातील अन्य कुण्या शक्तीला व्हावयाचे नाही. असे शुद्ध चारित्र्य दे की ज्या चारित्र्यामुळे संपूर्ण विश्व नतमस्तक होईल. आणि असे ज्ञान दे की ज्यामुळे आम्ही स्वतःहून पत्करलेला हा काट्याकुट्यांनी भरलेला मार्ग सुगम होईल.

।। भारत माता की जय ।। क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## कर्मवीर बी एस पाटील माध्यमिक विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ९ फेब्रुवारी : कर्मवीर बी एस पाटील माध्यमिक विद्यालय जडगाव ता.जि. छत्रपती संभाजीनगर शाळेत इयत्ता दहावी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभाचा कार्यक्रम दि ८ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात होता कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून अर्चना आगळे वनाधिकारी, गोंदिया तसेच समाजसेवक दत्तात्रय राठोड सर उपस्थित होते कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक हिवर्डे डि.के सूत्रसंचालन गुंठाळ एस डी वक्ता राठोड एस पी आभार गावंडे के यु अध्यक्षीय समारोप हिवर्डे डि.के यांनी केला. यावेळी प्रमुख मार्गदर्शक यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील करिअर बद्दल माहिती दिली व आजच्या युगात कोणती शाखा निवडावी यावरती मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमासाठी निकम एस एस , जाधव पि के , जगताप व्ही आर व जाधव यांनी नियोजन केले.

## सोयगाव शहरात छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समिती जाहीर

### अध्यक्षपदी हर्षल काळे,उपाध्यक्षपदी संदीप चौधरी तर कोषाध्यक्षपदी कदीर शहा

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.९ फेब्रुवारी





सोयगांव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समिती जाहीर श्री स्वामी समर्थ पेट्रोल पंप येथे झालेल्या बैठकीत छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समीतीचे कार्य अध्यक्ष रवींद्र काळे,विजय काळे यांच्या अध्यक्ष खाली झालेल्या बैठकीत कार्यकारणी जाहिर करण्यात आली.अध्यक्ष पदी हर्षल काळे नगरसेवक,उपाध्यक्ष पदी संदीप चौधरी तर कोषाध्यक्ष पदी कदीर शहा,विजय काळे,सचिव पदी ड.योगेश पाटील,राजेंद्र दुतोडें यांची निवड करण्यात आली.यावेळी पवन परदेशी,तेजस काळे,देवेंद्रं चौधरी,निखील पाटील,अंतुल चौधरी, हर्षल गव्हाडे,विपीन काळे,समाधान काळे,शुभम गाडेकर,जयेश गाडेकर, भाऊसाहेब काळे,साहील पाटील, सागर चौधरी,सचिन चौधरी तसेच सोयगाव शहरातील सर्व सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते.

## दिल्ली विधानसभेवर भाजपाची सत्ता सोयगांवात जल्लोष



सोयगांव,दि.९ फेब्रुवारी : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीचा भगवा झेंडा दिल्ली विधानसभेवर फडकला त्याबद्दल सोयगाव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे भारतीय जनता पार्टी तर्फे फटाक्यांची आतिषबाजी करून जल्लोष साजरा करण्यात आला.यावेळी जिल्हा सरचिटणीस वसंत बनकर,माजी नगराध्यक्ष कैलास काळे, माझी उपनगराध्यक्ष तथा भाजपा सोयगाव शहराध्यक्ष योगेश पाटील,मंगेश सोहनी,संजय चौधरी,शंकर कोथलकर, संजय मंडवे,अजय पाटील,संजय मोरे,संजय आगे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# छत्रपती संभाजीनगर मध्ये तुमच्या सर्वांचा आशीर्वाद घ्यायला आलो : विकी कौशल

### छावा चित्रपटाचे संभाजीनगर मध्ये जोरदार प्रमोशन

छत्रपती संभाजीनगर दि.९ : अष्टपैलू अभिनेता विकी कौशल आपला आगामी चित्रपट छावा च्या निमित्ताने छत्रपती संभाजीनगरातील प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. सकाळीच वेरूळ येथील जोतिर्लिंग श्री घृष्णेश्वराचे दर्शन घेऊन अभिषेक केला. त्यानंतर क्रांती चौकातील छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन करून आपल्या चाहत्यांशी त्यांनी संवाद साधला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज कि जय च्या घोषणांनी संपूर्ण क्रांती चौक परिसर दुमदुमला. यावेळी हजारो चाहत्यांनी विकी कौशल फोटो, व्हिडीओ घेण्यासाठी प्रचंड गर्दी केली होती. छत्रपती संभाजी नगरातील विविध ढोल पथकांनी विकी कौशल चे मराठमोळ्या पद्धतीने जोरदार स्वागत केले.




मराठी भाषेत पत्रकार परिषदेत पत्रकारांशी संवाद साधताना विकी कौशल म्हणाले कि, छत्रपती संभाजी नगर मध्ये तुमच्या सर्वांचा आशीर्वाद घ्यायला आलो आहे. ज्या शहरांचे नाव छत्रपती संभाजी नगर आहे याचा अभिमान आहे आणि हे नाव घेऊन मी संपूर्ण जगभरात फिरणार आणि सर्वाना सांगणार आहे कि, आपले छावा काय आहे ते. इथे मी आलो नसतो तर माझा दौरा पूर्ण झाला नसता. मराठा जेव्हा गर्जतो तेव्हा, तुफान नाही तर इतिहास बनतो आणि हा इतिहास दाखवण्यासाठी नवे गाणे तुफान रिलीज झाले आहे. ते सर्वांनी नक्की बघण्याचे आवाहन अभिनेते विकी कौशल यांनी केले. छत्रपती संभाजी महाराज यांची भूमिका साकारताना आलेले विविध अनुभव यावेळी विकी कौशल यांनी माध्यमांना सांगितले. दिग्दर्शक लक्ष्मण उत्तेकर हे मला या सिनेमाच्या पहिल्या दिवसापासूनच राजे म्हणायला लागले होते. त्याचबरोबर चित्रपटातील सर्व टीम मला राजे म्हणायचे म्हणून माझे कर्तव्य होते कि हे पात्र पूर्ण ताकदीने निभवायचे. मला त्यांनी अगोदरच सांगितले होते कि मला छावा मध्ये छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका करणारा शेर पाहिजे. आणि हि भूमिका निभावण्यासाठी मी प्रचंड मेहनत घेतली, अभ्यास केला.

# बाराशे धावपटूंनी दिला 'रन फॉर किडनी'चा संदेश

### 'सेवा भवन दौड़' आशुतोष पात्राने जिंकली

पुणे : 'सेवा भवन' या पुण्यातील रुग्णसेवा प्रकल्पातर्फे रविवारी आयोजित 'सेवा भवन दौड़'मध्ये उत्साहाने सहभागी होत बाराशे धावपटूंनी 'रन फॉर किडनी हेल्थ' हा संदेश दिला.'सेवा भवन दौड़'च्या दहा किलोमीटर गटात आशुतोष पात्रा विजेता ठरला. युवकांबरोबरच ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य ठरले.

'सेवा भवन दौड़'मधील दहा किलोमीटर गटाच्या शर्यतीचा प्रारंभ रविवारी सकाळी सव्वासहा वाजता महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेतून करण्यात आला.

उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील,खासदार प्रा डॉ मेधा कुलकर्णी, लेखक, दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर, 'गिरिप्रेमी'चे उमेश झिरपे,




### 'सेवा भवन दौड़'मधील विजेते

दहा किलोमीटर (पुरुष गट) - आशुतोष पात्रा - प्रथम, पंकज कश्यप - द्वितीय, अन्वय नेहरकर - तृतीय

दहा किलोमीटर (महिला गट) - अमृता मांडवे - प्रथम,अमृता सोनसळे -द्वितीय, उज्ज्वला मरगळे - तृतीय

दहा किलोमीटर (साठ वर्षांवरील गट) - जयंत पाठक - प्रथम, राजेंद्र गुजराथी - द्वितीय, प्रशांत वडके - तृतीय

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर,पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे कार्यवाह डॉ प्रवीण दबडघाव, पुणे महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर, 'सेवा भारती'चे पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघटनमंत्री श्रीपाद दाबक, 'आयर्न मॅन' निखिलेश पंत यांच्या प्रमुख उपस्थितीत 'सेवा भवन दौड़' हा उपक्रम झाला.

ही शर्यत आशुतोष पात्रा याने जिंकली.त्याने ही शर्यत ४० मिनिटे ४९ सेकंद या वेळेत पूर्ण केली. महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेतून सकाळी पावणेसात वाजता पाच किलोमीटरच्या शर्यतीचा प्रारंभ करण्यात आला. या शिवाय 'चॅरिटी रन' हा उपक्रमही आयोजित करण्यात आला होता.

'सेवा भवन दौड़' या उपक्रमापासून 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती'च्या आरोग्यविषयक जनजागृती मोहिमेचाही प्रारंभ करण्यात आल्याचे समितीचे कार्यवाह प्रमोद गोऱ्हे यांनी सांगितले. 'सेवा भवन' प्रकल्प समितीच्या अध्यक्षा डॉ स्वाती बेलसरे, कार्यवाह पलाश देवळणकर, सहकार्यवाह उमा जोशी,मुख्य कार्यकारी अधिकारी संदेश उभे यांनी संयोजन आणि सारंग भिडे यांनी सूत्रसंचालन केले.

### क्षणचित्रे

मार्गावर धावपटूंचे उत्साही स्वागत, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा स्वयंसेवक म्हणून सहभाग, 'एएफएमसी', पुणे मेट्रो मधील शंभर जणांचा सहभाग, आयटी कंपन्यांमधील अभियंत्यांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद

## रोखठोक

**दिनेश गुणे**

# चघळलेल्या विनोदाची नवी चिपाडे...

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत नवे मतदार कोठून आले, ते कसे आले, त्यांची नावे कशा प्रकारे समाविष्ट झाली, याची सर्व उत्तरे केंद्रीय निवडणूक आयोगाने अगोदरच दिलेली आहेत, आता पुन्हा राहुल गांधी यांनी जुनाच मुद्दा पुन्हा समोर आणून दिल्ली विधानसभेतील संभाव्य पराभवापासून पळ काढण्यासाठी त्यांचा प्रयत्न सुरू असून, दिल्लीमध्ये पक्षाचे अस्तित्वदेखील उरणार नसल्याचे लक्षात आल्याने नवा नॅरेटिव्ह तयार करण्याचा सराव त्यांनी सुरू केला आहे, अशा जोरदार शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी राहुल गांधी यांच्या पत्रकार परिषदेनंतर दिलेल्या प्रत्युत्तरामुळे, जुन्या विनोदाला नवा मुलामा देण्याच्या राहुल गांधी यांच्या प्रयत्नांचा एक प्रकारे पर्दाफाशच झाला आहे. एकच विनोद पुन्हा पुन्हा केला, तर त्यामधील गंमत निघून जाते, आणि वारंवार त्यावर हसूदेखील येत नाही हे फडणवीस यांचे म्हणणे शुक्रवारी अनेकांस अक्षरशः पटले असेल. काँग्रेसचे सर्वेसर्वा, लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसच्या नेतृत्वाची पालखी वारसा हक्काने खांद्यावर घेतलेले खासदार राहुल गांधी यांनी शुक्रवारी पत्रकार परिषद घेऊन पहिल्यांदाच गौप्यस्फोट केल्याच्या आवेशात काही जुनेच मुद्दे पुन्हा एकदा माध्यमांसमोर मांडले. फरक एवढाच होता, की या वेळी निवडणूक आयोगाशी अगोदर केलेल्या पत्रव्यवहाराबाबत आणि त्यासंदर्भात आयोगाकडून वेळोवेळी स्पष्ट झालेल्या खुलाशाबाबत त्यांनी बरेच बोलके मौन पाळलेले दिसत होते. त्याशिवाय, या पत्रकार परिषदेत त्यांनी शरद पवार गटाच्या राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष असलेल्या संसदरत्न खासदार सुप्रिया सुळे आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेना गटाचे प्रवक्ते, राज्यसभेचे सदस्य संजय राऊत यांनाही पत्रकार परिषदेत आपल्या शेजारी स्थानापन्न होण्याची संधी देऊन इंडिया आघाडीच्या संकुचित संघटितपणाचा पुरावादेखील माध्यमांसमोर मांडला. त्या पत्रकार परिषदेत राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगासमोर माध्यमांच्या साक्षीने उपस्थित केलेले काही सवाल पहिल्यांदाच उघड झाल्याप्रमाणे माध्यमांनीही त्यास जोरदार प्रसिद्धी दिली असली, तरी राहुल गांधी यांच्या मुखातून निघालेले जवळपास सारे सवाल महाराष्ट्रातील काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी पूर्वीच उपस्थित केले होते, याचा अनेक माध्यमांना विसर पडला. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीनंतर याच मुद्यावरून राज्यात गदारोळ माजविण्याचा प्रयत्न काँग्रेसच्या नेतृत्वाखालील इंडिया आघाडीने, विशेषतः काँग्रेसने करून पाहिला होता. त्यासंदर्भात काँग्रेसने निवडणूक आयोगाशी केलेल्या पत्रव्यवहाराचा तपशीलही त्या वेळी उघड झाला होता आणि आयोगाने त्या वेळी केलेल्या पत्रव्यवहाराद्वारे केलेला खुलासाही उघड झाला होता. इतकेच नव्हे, तर इंडिया आघाडीच्या व विशेषतः काँग्रेसच्या त्या आक्षेपांस बळ देण्यासाठी गेल्या वर्षी नोव्हेंबरच्या अखेरीस पुण्यातील वयोवृद्ध समाजसेवक बाबा आढाव यांनीही वयाच्या ९३ व्या वर्षी आत्मक्लेश उपोषणाचे अस्त्रदेखील उगारून काँग्रेसचेच आक्षेपाचे मुद्दे उपस्थित केले आणि लगोलग महाराष्ट्रातील महाविकास आघाडीच्या नेत्यांची आढाव यांच्या मनधरणीसाठी पुण्यात रीघही लागली होती. शुक्रवारच्या पत्रकार परिषदेतील राहुल गांधी यांच्या विवेचनाचा भर प्रामुख्याने निवडणूक आयोग, नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांतील महाविकास आघाडीच्या दारुण पराभवानंतरच्या आक्षेपांचा पुनरुच्चार, मतदानाची वाढलेली टक्केवारी व मतदारांची वाढलेली संख्या यांवरच होता. राहुल गांधी यांचे वक्तव्य म्हणजे जुन्याच विनोदाचा पुनरुच्चार असल्याचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले असले, किंवा अशा विनोदाची धार आता बोथट झाली असली तरी गांधी, राऊत आणि सुळे यांच्या संयुक्त पत्रकार परिषदेच्या निमित्ताने या आक्षेपांच्या इतिहासाकडे नव्याने पाहणे गरजेचे झाले आहे.

दिल्ली विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर होण्याच्या जेमतेम एक दिवस अगोदर राहुल गांधी यांनी घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेचे पडसाद एका दिवसापुरते माध्यमांतून उमटले. शनिवारी निवडणुकीची मतमोजणी सुरू झाली आणि देशाच्या राजधानीच्या या महानगरात काँग्रेसला मतदारांनी पराभव चाखण्यास भाग पाडल्याचे स्पष्ट होऊ लागले. पहिले काही कल उघड होत असताना, दिल्लीच्या ७० विधानसभा मतदारसंघांपैकी कोणत्याच मतदारसंघात काँग्रेसचे अस्तित्वदेखील उमटल्याचे दिसत नव्हते. त्यामुळे, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निकालाच्या एक दिवस अगोदर व्यक्त केलेल्या प्रतिक्रियेची आठवण होणे साहजिकच होते. दिल्ली विधानसभेत काँग्रेसचा दारुण पराभव होणार असल्याने तो पचविण्याचा पर्याय म्हणून राहुल गांधी यांनी जुन्या विनोदाला नवा मुलामा देण्याचा प्रयत्न करून नवा नॅरेटिव्ह निर्माण करण्याचा प्रयत्न केला असावा ही फडणवीस यांची प्रतिक्रिया पटण्यासारखेच चित्र दिल्लीच्या निकालांनी स्पष्ट केले आहे. हा लेख वाचकांसमोर येईल, तेव्हा या चित्राचे रंग फारसे बदललेले नसतील. त्यामुळे, दिल्लीतील आम आदमी पार्टीची सद्दी संपवून सत्तेच्या दिशेने कौल मिळालेल्या भाजपाच्या विजयावर काही जुनी प्रश्नचिन्हे पुन्हा उमटविण्याची पूर्वतयारी म्हणूनच ती संयुक्त पत्रकार परिषद झाली असावी, असे मानता येऊ शकते. आता त्याची प्रचीती येण्यास सुरुवातदेखील होईल, म्हणूनच, शिळ्या कढीला ऊत आणून पुन्हा एकदा नव्याने जनतेच्या मनात संभ्रम पसरविण्याच्या या प्रयत्नांचा मागोवा घेणे आणि लोकशाहीतील जनसहभागाच्या उत्स्फूर्त प्रतिसादावर संशय व्यक्त करून व्यवस्थेला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे किती सयुक्तिक ठरते याचीदेखील चर्चा होईल.

महाराष्ट्रातील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतील मतदारयाद्या मिळाव्यात अशी मागणी वारंवार निवडणूक आयोगाकडे करूनही त्याकडे आयोगाने दुर्लक्ष केले, असा राहुल गांधी यांचा आक्षेप होता. या याद्यांवर मतदारांची छायाचित्रे आणि त्यांचे पत्तेही असावेत, असा काँग्रेसचा आग्रह होता, हेही त्यांच्या आक्षेपातून स्पष्ट झाले. नव्या मतदारांची पडताळणी करण्यासाठी ही माहिती काँग्रेसला हवी असून, लोकसभा ते विधानसभा या दोन निवडणुकांदरम्यानच्या जेमतेम पाच महिन्यांत महाराष्ट्रात लाखो मतदार नव्याने कसे समाविष्ट झाले या सवालाचा पुनरुच्चार करून सनसनाटी निर्माण करण्याच्या राहुल गांधी यांच्या प्रयत्नांत या वेळी ठाकरे गट आणि शरद पवार गटदेखील सहभागी झाल्याने, महाराष्ट्राच्या निवडणुकांचा वाद नव्याने केंद्रस्थानी आणणे हाच त्यांचा स्पष्ट उद्देशही उघड झाला.

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांची पूर्वतयारी निवडणूक आयोगाने खऱ्याअर्थाने सप्टेंबर २०२४ मध्ये सुरू केली. निवडणुकांच्या पृष्ठभूमीवर सरकारी अधिकाऱ्यांच्या बदल्या, नियुक्त्यांबाबतचा संपूर्ण तपशील आयोगास कळवावा, अशा सूचना राज्याच्या मुख्य सचिवांना दिल्या. २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणाऱ्या निवडणुकांसाठी २२



ऑक्टोबर २०२४ रोजी अधिसूचनेद्वारे २८८ मतदारसंघांतील निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. त्याआधी जाहीर करण्यात आलेल्या तपशिलानुसार, महाराष्ट्रातील मतदारयाद्यांतील मतदारांची संख्या नऊ कोटी ६४ लाख ८५ हजार ७६५ एवढी होती, आणि १ जानेवारी २०२४ ते १ जुलै २०२४ या कालावधीत राज्यात १८ वर्षांवरील मतदानास पात्र असलेल्या २० लाख ९३ हजार नवमतदारांची नोंदणी झाली होती. विहित वयोमानानुसार १ जुलै २०२४ रोजी मतदानाचा अधिकार प्राप्त होणाऱ्या असलेल्या प्रत्येक मतदाराची मतदारयादीत नाव नोंदणी झाली पाहिजे, यासाठी निवडणूक आयोग आग्रही होता, आणि त्यानुसार मतदार नोंदणीच्या मोहिमादेखील हाती घेण्यात आल्या होत्या. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने तसेच विविध राजकीय पक्षांनीदेखील मतदार नोंदणीचे कार्यक्रम हाती घेतले होते. मतदारयादीत नाव समाविष्ट असलेल्या प्रत्येक मतदारास त्याचे मतदार ओळखपत्र मिळावे यासाठी आयोगाने संपूर्ण यंत्रणा कार्यान्वित केली होती. मतदारयादीतील आपला क्रमांक मिळविण्यास मतदारांना समस्या येऊ नये यासाठी मतदाराचे मतदान केंद्र, मतदानाची तारीख, वेळ इत्यादी तपशील असलेल्या चिठ्ठ्या मतदारांस वितरित करण्याच्या सूचनाही आयोगाने दिल्या होत्या. मतदानाच्या तारखेपूर्वी पाच दिवस अगोदर या चिठ्ठ्या मतदारापर्यंत पोहोचल्या पाहिजेत, अशा सूचनाही आयोगाने दिल्या होत्या. मतदारयादीतील पत्त्यांवर न आढळणाऱ्या मतदारांची माहिती संकलित करून, पत्ता बदलल्याने किंवा हयात नसल्याने ज्यांची नावे मतदारयादीतून वगळली गेलेली नाहीत त्याचा तपशीलही स्वतंत्रपणे तयार करण्याच्या तसेच मतदान केंद्रावर मतदाराची ओळख पटविण्यासाठी आवश्यक पुरावे तपासण्याच्या सूचनाही आयोगाने दिल्या होत्या. २०१९ च्या निवडणुकांकरिता महाराष्ट्रात ९६ हजार ६५३ मतदान केंद्रे स्थापन करण्यात आली होती. २०२४ च्या विधानसभेतील वाढीव मतदारसंख्या लक्षात घेऊन मतदान केंद्रांची संख्यादेखील १ लाख १८६ पर्यंत वाढविण्यात आली होती. मतदान केंद्रावरील प्रत्येक संवेदनशील घडामोडींचे चित्रीकरण करण्याची जबाबदारी आयोगाने जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांवर सोपविली होती. विशेष म्हणजे, निवडणुकीच्या प्रत्येक टप्प्यावरील प्रत्येक प्रक्रिया पारदर्शक राहावी यासाठी यामध्ये राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींचा सहभाग असावा याचीही खबरदारी निवडणूक आयोगाने घेतली होती. राज्यात कोणताही अनुचित प्रकार न घडता ६५.०२ टक्के मतदार लोकशाहीच्या या महोत्सवात शांततेने सहभागी झाल्याबद्दल आयोगाने समाधानही व्यक्त केले आणि २९ नोव्हेंबर २०२४ रोजी काँग्रेसने पत्राद्वारे काही गंभीर मुद्दे उपस्थित करून निवडणूक आयोगाकडे काही आक्षेप नोंदविले.

राहुल गांधी यांनी दोन दिवसांपूर्वी संयुक्त पत्रकार परिषदेत उपस्थित केलेले मुद्दे दोन महिन्यांपूर्वीच आयोगाच्या निदर्शनास आणून दिले गेले होते आणि त्यातील प्रत्येक मुद्यावर आयोगाने पत्राद्वारे तपशीलवार स्पष्टीकरण दिले होते. मतदारयाद्यांमधून मनमानीपणाने मतदारांची नावे वगळली, सायंकाळी पाच वाजल्यानंतर अचानक मतदान केंद्रांवरील मतदानात वाढ होऊन रात्री अकरा वाजेपर्यंत त्याच्या टक्केवारीत अनाकलनीय वाढ झाली, असे आक्षेप त्या पत्रात काँग्रेसने नोंदविले होते. मतदारयाद्या तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे आणि राजकीय पक्षांच्या सहभागानेच पार पाडली जाते व या प्रक्रियेत काँग्रेसचाही सहभाग होता. या याद्यांचा मसुदा राजकीय पक्षांना देण्यात येतो व त्याच्या छाननीच्या प्रत्येक टप्प्यावरील प्रत्येक प्रक्रियेत सर्व राजकीय पक्षांना सहभागी करून घेतले जाते. त्यामुळे आयोगाकडून काँग्रेसच्या आक्षेपांची दखल घेतली जाईल व त्यानुसार तसे कळविले जाईल, असे आयोगाने या उत्तराद्वारे स्पष्ट केले. सायंकाळी पाचनंतर रात्री अकरा वाजेपर्यंतच्या काळात वाढलेल्या मतदानाबाबत आयोगाने अनेकदा जाहीर स्पष्टीकरणे दिली असून काँग्रेसलाही तसे स्पष्टीकरण दिले आहे, असा खुलासाही त्या वेळी आयोगाने केला होता. याबाबत काँग्रेसच्या शिष्टमंडळाशी चर्चा करण्याची आयोगाची तयारी असून ३ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी पाच वाजता शिष्टमंडळाची भेट घेतली जाईल, असेही आयोगाने त्या पत्रोत्तराद्वारे काँग्रेस समितीचे वकील ओमर होडा यांना कळविले होते.

या पत्रानुसार, ३ डिसेंबर रोजी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने आयोगाची भेट घेऊन या आक्षेपांचा पुरुच्चारही केला. मतदारयाद्या शुद्ध, पारदर्शक आणि समावेशक असाव्यात यासाठी राज्यघटना व लोकप्रतिनिधी कायद्याच्या चौकटीचे पुरेपूर पालन आयोगाने केले असून नियमांचे कोठेही उल्लंघन झालेले नाही अशी ग्वाही या भेटीत आयोगाकडून काँग्रेसच्या शिष्टमंडळास देण्यात आली होती. प्रत्येक निवडणुकीदरम्यान होणाऱ्या छाननी प्रक्रियेत सर्व राजकीय पक्षांना संपूर्ण सहभागी करून घेतले जात असते, त्यामुळे या प्रक्रियेबाबत राजकीय पक्ष अनभिज्ञ नाहीत. मतदारयादीतील प्रत्येक नवी नोंद, नावे वगळणे, बदलणे याबाबत पूर्वसूचना जारी केली जाते, त्यावरील आक्षेप असल्यास जनसुनावणी घेतली जाते, असेही आयोगातर्फे स्पष्ट करण्यात आले. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमवेत वेळोवेळी बैठका घेणे, राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना मतदान केंद्रांतील प्रक्रियेत सहभागी करून घेणे, त्यांना वेळोवेळी तेथील घडामोडींची माहिती देणे, प्रत्येक मतदान केंद्रावर बुथ स्तरावर राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची नेमणूक करून प्रक्रिया पारदर्शक राहावी यासाठी दक्षता घेणे, मतदारयाद्यांमधील बदलानुसार त्याचा तपशील दरमहा आयोगाच्या माहिती जालावर प्रसिद्ध करणे, मतदारयादीचा मसुदा व अंतिम यादी आयोगाच्या संबंधित माहिती जालावर आणि सूचना फलकांवरही प्रसृत करणे, मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना विभागशः या याद्या मोफत उपलब्ध करून देणे, त्याबाबत आलेले आक्षेप किंवा दावे दर आठवड्यास राजकीय पक्षांच्या माहितीसाठी उपलब्ध करून देणे आदी अनेक बाबी या शिष्टमंडळासोबतच्या चर्चेत स्पष्ट करण्यात आल्या. मतदारयाद्या तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया आयोगाच्या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आल्याचेही आयोगाने या शिष्टमंडळाच्या निदर्शनास आणून दिले व त्याचे लेखी स्पष्टीकरणही जारी करण्यात आले. ५० विधानसभा मतदारसंघांतील मतदारयाद्यांमध्ये जुलै २०२४ ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत सरासरी ५० हजार नावे समाविष्ट करण्यात आल्याचा काँग्रेसचा आरोप दिशाभूल करणारा व वस्तुस्थितीला धरून नाही, असेही आयोगाने तेव्हा स्पष्ट केले होते.

५० मतदारसंघांत नव्हे, तर केवळ सहा मतदारसंघांतील याद्यांमध्ये ५० हजार नावे समाविष्ट झाली असली तरी त्यामुळे सत्ताधारी पक्षाचा ४७ जागांवर विजय झाल्याचा दावाही आयोगाने खोडून काढला होता. आयोगाच्या महाराष्ट्र शाखेने मतदारयाद्यांचा मसुदा, दावे आणि आक्षेपांचा तपशील आदी सर्व माहिती काँग्रेसला पुरविली असून या प्रक्रियेत काँग्रेसचे प्रतिनिधी सहभागी होते, असेही आयोगाने काँग्रेसचे ओमर होडा यांना लिहिलेल्या या पत्रात स्पष्ट केले होते.

दिल्ली विधानसभेच्या निवडणुका आता पार पडल्या आहेत. या विधानसभेत काँग्रेसचे नेमके स्थान कोठे आहे, हेदेखील स्पष्ट झाले आहे. राहुल गांधी यांनी नव्याने उपस्थित केलेल्या जुन्याच प्रश्नांची उत्तरेही त्यांना अगोदरच दिली गेलेली आहेत. तरीही ठाकरे गट आणि शरद पवार गटाच्या नेत्यांसोबत पत्रकार परिषदेत त्यांनी या मुद्यांचा पुनरुच्चार करून काय साधले, त्याचीही चर्चा तर होणारच आहे. दिल्लीतील पराभवापासून पळ काढण्यासाठी नवा नॅरेटिव्ह निर्माण करण्यापलीकडे त्यांचा फारसा वेगळा हेतू नसावा, या देवेंद्र फडणवीस यांच्या मताशी या चर्चेचा बराचसा निष्कर्ष मिळताजुळता ठरू शकतो.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### विदर्भाच्या चौफेर विकासाचे स्वप्न सत्यात उतरणार

ॲडव्हान्टेज विदर्भ २०२५- खासदार औद्योगिक महोत्सवाचे भव्य व यशस्वी आयोजन विदर्भाच्या विकासाला आता दे डबल धक्का देणार हे नक्की.

कारण अभ्यासू, कार्यतत्पर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विकास कामाचाच ध्यास घेऊन पुढच्या २० वर्षांचा अभ्यास व नियोजन करणारे कार्यनिपुण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि जिंदाल ग्रुप, लॉयड्स ग्रुप, एचसीएलसारख्या मातब्बर उद्योग समूहाचे सज्जन जिंदाल, प्रभाकरन्, नाडर मॅडम व इतरही मोठमोठे उद्योजक जेव्हा जाहीरपणे आपले विदर्भाच्या सर्वांगीण विकासाचे नियोजन सांगतात तेव्हा विदर्भाचा चौफेर विकास हे आता स्वप्न सत्यात उतरणार याची खात्री पटते. वेगवेगळ्या देशांचे राजनीतिक व औद्योगिक क्षेत्रातील अधिकारी, विदर्भातील प्रमुख उद्योगप्रमुख, मंत्रिगण, खासदार यांची मंचावरील उपस्थिती या विधानाला दुजोराच देते. दावोसच्या एमओयूची टवाळी करणारे ॲडव्हान्टेजच्या जाहीर संबोधनाने चांगलेच तोंडावर पडले आहेत. नितीन गडकरींचे मुद्देसूद संबोधन, जिंदाल, प्रभाकरन्, नाडर मॅडमच्या विदर्भाकरिता भविष्यातील योजना, गडचिरोली हा महाराष्ट्राचा शेवटचा जिल्हा नव्हे तर पहिला जिल्हा आहे व भविष्यातील पोलादाचा जागतिक केंद्रबिंदू होणार हे सज्जन जिंदाल यांचे उद्गार बरेच काही सांगून जाते.

ॲडव्हान्टेज विदर्भच्या निमित्ताने सुरू असलेल्या प्रदर्शनात विविध माहितीपर, अभ्यासपूर्ण चर्चासत्रात अनुभवी मान्यवरांचे विचार ऐकण्यासारखे होते. इतर राज्यांप्रमाणे आता ॲडव्हान्टेज विदर्भामुळे ही भूमी सुजलाम सुफलाम होईल, यात शंका नाही.

**रवी वाघमारे**/नागपूर

### अरविंद केजरीवालांना भाजपाचा जोरदार धक्का

दिल्ली विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर झाले असून या निवडणुकीत आम आदमी पार्टीद्वारा सलग तिसऱ्यांदा सत्ता स्थापन करण्याचा दावा व्यक्त केला जात होता. पण या दाव्याला धक्का देत भाजपाने सत्तावीस वर्षांनी दिल्लीची सत्ता आपकडून आपल्याकडे खेचून घेतली आहे. अरविंद केजरीवाल हे समाजसेवक अण्णा हजारे यांच्या इंडिया अगेन्स्ट करप्शन मोहिमेचा भाग होते. या माध्यमातून अरविंद केजरीवाल हे प्रसिद्धीच्या झोतात आले होते. मला राजकारणात बदल घडवायचा आहे त्यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत अशी त्यांनी प्रतिमा तयार करत त्यांनी दिल्लीची सत्ता हस्तगत केली होती. अरविंद केजरीवाल यांचे राजकारण मुख्यतः विकास आणि 'बाकी सर्व पक्ष चोर आहेत' या संकल्पनेवर उभे होते.

दिल्लीसारख्या राज्यात जेथे केंद्राचा पैसा सुद्धा विकास कामांना वापरला जातो, पण या ठिकाणी सुद्धा आम्हीच विकास केला असे केजरीवाल सांगत होते, पण सर्वसामान्यांना कोण विकास करत हे समजत होते. या विधानसभा निवडणुकीत केजरीवाल यांच्याकडे देण्यासारखे आणि सांगण्यासारखे काही नव्हते. मोहल्ला क्लिनिक, सरकारी शाळांमधील सुधारणा आणि वीज तसेच पाणी बिलामध्ये सबसिडी या चार मुद्यांच्या जोरावर आम आदमी पार्टीने गेली दहा वर्षे दिल्लीमध्ये सत्ता उपभोगली. पण आता त्याची पोलखोल झाली होती. राजकारणात उतरताना अरविंद केजरीवाल यांचा मफलर गुंडाळलेला फोटो सर्वसामान्यांना आपला वाटत होता पण त्या मफलरचा त्यांनी नंतर त्याग केला होता. तसा हा बदल क्षुल्लक वाटणारा असला तरी यामुळे सर्वसामान्य मतदारांत एक संदेश गेला की अरविंद केजरीवाल आज पूर्वीचे राहिले नाही. राजकारणात बदल करायला आलो आहे हा संदेश नंतर दहा वर्षांत त्यांच्या सरकारमध्ये दिसला नाही.

अरविंद केजरीवाल यांच्या दिल्ली सरकारने दिल्लीत नवीन मद्य धोरण लागू केले. यामध्ये झालेल्या शंभर कोटींच्या भ्रष्टाचारामध्ये त्यांना झालेली अटक यामुळे त्यांच्या प्रतिमेला, राजकारणाला मोठा धक्का बसला होता. केजरीवाल यांना असे वाटले की भ्रष्टाचारावरून झालेली अटक आपणास राजकीयदृष्ट्या फायदेशीर ठरेल. पण लोकसभा निवडणुकीच्या निकालात त्याचा फायदा दिसून आला नाही. कारण दिल्लीच्या सर्व सात लोकसभा मतदारसंघात भाजपा जिंकली होती.

अरविंद केजरीवाल या निवडणुकीतही आपली सत्ता कायम रहावी म्हणून, आम आदमी पार्टीने अनेक योजनांची खैरात मांडली होती. त्यामध्ये, प्रामुख्याने 'लाडली बहन' या योजनेचा समावेश होता. केजरीवाल यांनी एक नवीन आरोप केला. हरयाणातील भाजपा सरकारने यमुनेच्या माध्यमातून दिल्लीत पुरवठा केल्या जाणाऱ्या पाण्यात विष मिसळले आहे. पण दिल्ली जल बोर्डाच्या अभियंत्यांचे आभार अशासाठी की त्यांनी वेळीच हे रोखले आणि पाणीपुरवठा थांबवला. अन्यथा मोठ्या प्रमाणात नरसंहार झाला असता असा आरोपही त्यांनी केलेला होता. अरविंद केजरीवाल यांचा हा आरोप हास्यास्पद होता.

दिल्लीतील मध्यमवर्गीय मतदार सामान्यतः लोकसभा निवडणुकीत भाजपाला मतदान करतो. केंद्र सरकारने नुकताच जाहीर केलेल्या अर्थसंकल्पात मध्यमवर्गीयांना तसेच वरिष्ठ नागरिकांना मोठा दिलासा दिला आहे. या मध्यमवर्गीयांनी विधानसभेत भाजपाला मतदान केले त्याचा फटका आप पक्षाला बसला आणि भाजपाने सत्तावीस वर्षांनी दिल्ली परत एकदा काबीज केली आहे.

**अविनाश देशपांडे**/९४२२९५०७५०

### प्लॅस्टिक वापराचे दुष्परिणाम

प्लॅस्टिक वस्तू अथवा पिशव्या हा आधुनिक युगात एक अत्यंत महत्त्वाचा घटक बनला आहे. त्याचा वापर आपण दैनंदिन जीवनात अनेक प्रकारे करतो. अनेक सुविधांच्या बाजूने याचा वापर वाढत असल्यामुळे पर्यावरणात अनेक समस्या उद्भवत आहेत.

पूर्वीच्या काळी म्हणजे फार मागे न जाता २५ ते ३० वर्षांपूर्वी देखील प्लॅस्टिक वापराचे प्रमाण अत्यल्प होते. घरची भांडी, प्लेट्स, चमचे, वाटी, फुलपात्र, डबे प्लॅस्टिकची नसत. त्यामुळेच कदाचित कॅन्सरसारखे आजार कमी प्रमाणात होत होते. परंतु पाश्चात्त्य देशातून आलेली ही वावटळ संपूर्ण जगात वेगाने पसरली आणि सोईचे तसेच वापरा आणि फेका या कृतीमुळे सर्रास वापर वाढू लागला. यात प्लॅस्टिक पिशव्यांचा सुळसुळाट झाला. त्याचा पुनर्वापर नसल्याने तसेच विरघळणारी वस्तू नसल्याने त्याचा निचरा होत नाही. त्यामुळे कित्येक घन मेट्रिक कचऱ्याने नदी-नाले तुंबले जाऊ लागले. पशु, पक्षी, प्राणी यांच्या पोटात प्लॅस्टिक गेल्याने त्यांच्या प्रकृतीवर प्रतिकूल परिणाम झालेत. इतकेच काय गाईच्या पोटातून ऑपरेशन दरम्यान प्लॅस्टिक पिशव्या जशाच्या तशा आढळून आल्यात.

त्याच्या अतिरेकाचे दुष्परिणाम ओळखून पाश्चात्त्य देश लगेच सावध झालेत आणि त्यांनी यावर कायद्याने बंदी आणली आणि कागदी पिशव्यांचा वापर सुरू केला. भारत सरकारने देखील कडक पावले उचलली. त्यामुळे वापरावर बऱ्यापैकी आळा बसला. परंतु तोपर्यंत जनता या गोष्टीची गुलाम होऊन बसली. भाजीवाले, किराणा दुकानात छुप्या पद्धतीने प्लॅस्टिक पिशव्या पुरवल्या जातात कारण नाही दिल्या तर त्यांचा व्यवसाय होत नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

आता प्रश्न आपल्यासारख्या सुशिक्षित लोकांचा आहे. याचे दुष्परिणाम माहीत असूनही आपण बाहेर जाताना कापडी पिशवी घेऊन जात नाही. प्लॅस्टिक डब्यांचा, बाटल्यांचा वापर करतोच. सकाळी दुधाच्या पिशवीपासून प्लॅस्टिकचा वापर सुरू होतो. हल्ली लग्न वा इतर छोट्यामोठ्या समारंभात छोट्या प्लॅस्टिकच्या पाण्याच्या बाटल्या ठेवल्या असतात. त्या रिकाम्या बाटल्या मग इकडे तिकडे पडलेल्या दिसतात. कशावरून रस्त्यावरचे प्लॅस्टिक गोळा करणारे कामगार त्याचा पुनर्वापर करत नसतील?

अशा अनेक समस्या आहेत. आरोग्याला अपायकारक असे याचे अनेक गंभीर परिणाम समोर येत आहेत, जे थेट प्राणिमात्रांच्या मृत्यूचे कारण होऊ शकते. प्लॅस्टिक पिशव्या अथवा अन्य जीवनोपयोगी वस्तू याला पर्यायी व्यवस्था आल्याशिवाय संपूर्णपणे याचा वापर नष्ट होऊ शकत नाही. परंतु एक सुजाण नागरिक या नात्याने स्वत:पुरता तरी 'मी हा वापर कमीत कमी करेन' असे ठरवून सतर्क राहिल्यास पुढील संभाव्य धोके काही प्रमाणात नक्कीच टाळू शकतो.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

### मनाची गती ओळखणे आवश्यक

मन हे फार गुंतागुंतीचे व अगाध शक्तीने ओतप्रोत भरले आहे. मनाच्या अवस्थेचा थांगपत्ता लागणे हे कठीणच कार्य आहे. आपले मन हे फार चंचल असते. त्याची गती देखील तीव्र असते. मनोवेग हा सर्वांत जास्त वेग म्हणून मान्य आहे. त्याचप्रमाणे या मनावर षडरिपूचा अंमल असला किंवा यावर नियंत्रण नसले की ते कुठेही कानात वारे शिरल्याप्रमाणे धावू लागते. संत कबीर म्हणतात की, 'मन गया तो जाने दे।' म्हणजे जरी मनावर नियंत्रण शक्य नाही, तरी हरकत नाही परंतु 'मत जाने दे शरीर' म्हणजे प्रत्यक्ष कृती (कर्म) पासून दूर राहणे हेच श्रेयकर आहे. हे वाईट किंवा पापकर्म (निषेध) याबद्दलच अपेक्षित आहे. मनात वेगळे, वाईट, वैचारिक किंवा षडरिपुयुक्त विचार आले असता त्याच्या कृतीनेच त्या विचाराचा भोग पेता येतो. मन वासनामय असले की या प्रकारचे विचार बळावतात व त्यांचा उपभोग घेण्याकरिता मन हे शरीराला निर्देश देऊन ते विचार प्रत्यक्ष कृतीत आणण्यास बाध्य करते. परिणामांचा विचार न करता क्षणिक सुख, भोग किंवा लालसा उपभोग करण्याकरिता देहाकडून प्रत्यक्ष कृती केली जाते आणि नंतरच मन व देह तृप्त होतो. हा मनोवेग वेळीच रोखला नाही तर 'विनाशकाले विपरीत बुद्धी' या न्यायाने विनाशाची मुहूर्तमेढ रोवली जाते. हे क्षणात होत नाही. यामागे त्या विचारांचा पगडा किती कसा प्रबळ आहे त्यावर अवलंबून असते.

काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे प्रधान षडरिपू आहेत. नियंत्रणात असल्यास वैचारिक द्वंद निर्माण न होता मनावर ताबा राहतो. पर्यायाने कृती होत नाही व त्या कृतीच्या परिणामांचा विचार मनावर न होता ते तणावरहित राहून मानसिक अवस्था सामान्य राहते. हेच मन चांगल्या विचारांनी प्रेरित असले तर याच देहाकडून सत्कर्म होते, कृती होते व त्याचा परिणाम म्हणून आनंद प्राप्त होतो. त्याला 'पुण्य' म्हणतात. संत तुकाराम महाराजांनी 'पुण्य पर उपकार, पाप पर पीडा।' असे म्हटले आहे. उपकार म्हणजे मदत, सहकार्य किंवा सहयोग. हे सद्गुण अंगी बाळगून व्यक्ती किंवा समूहाच्या उपयोगी पडले तर त्याचे फल म्हणजे 'पुण्य' आणि षडरिपूंनी युक्त विचार कृतीत उतरविले तर नुकसान, हिंसा, चोरी, हानी, अपमान इ. दुर्गुणामार्फत कृती होऊन पीडा प्राप्त होऊ शकते. हेच पाप होय.

भारत भूमीत आजपर्यंत हजारो संत, योगी, ऋषी, आचार्य, तत्त्वज्ञ, आदींनी जन्म घेऊन महान तत्त्वज्ञानाला खतपाणी घालून जगात आदर्श निर्माण केला. संपूर्ण जीवनभर या तत्त्वज्ञानाचा अंगीकार करून समाजाला दिशादर्शन देणाऱ्यांची ही भारत कर्मभूमी म्हणूनच श्रेष्ठ ठरली आहे.

भारतीय तत्त्वज्ञानात कर्माला अनन्यसाधारण महत्त्व आहे. चांगल्या कर्माशिवाय गती प्राप्त होत नाही, हा धर्माचा उपदेश आहे. चांगले कर्म करण्याकरिता शरीर, मन व बुद्धी यांचा समन्वय असणे महत्त्वपूर्ण आहे. ज्ञानाची लालसा उत्पन्न होऊन अज्ञानाचा नाश केल्याने मनाची स्थिरता उत्पन्न होते व अहित-हित हे द्वंद दूर होऊन विवेकपूर्ण आचरण होते मग चंचल स्वभावाचे मनही अभ्यासाने, काही प्रयत्नाने त्या हिताच्या ठिकाणी एकाग्र करता येते, स्थिर ठेवता येते. संत वचनाप्रमाणे कर्म हे हितकारी असले तरच सज्जनांना संतोष प्राप्त होतो. म्हणून समर्थ रामदास स्वामी म्हणतात की, 'तुझे कारणी देह घडावा' सर्वांच्या कामासाठी शरीर कष्टवीत जावे.

**संजय पाठक**/नागपूर

### शिक्षणातून व्यक्तीचा सर्वांगीण विकास शक्य

शिक्षणातून व्यक्तीचा सर्वांगीण विकास अपेक्षित असतो. या सर्वांगीण विकासात बोधात्मक, क्रियात्मक विकासाचा समावेश करण्यात आलेला आहे. कोणतीही व्यक्ती शारीरिक, भावनिक आणि बौद्धिकदृष्ट्या सक्षम होणे हे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासामध्ये अपेक्षित असते. याचसाठी लहानपणापासून मुलांवर सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने चांगले संस्कार केले जातात. जेवढी सक्षम व सुज्ञ पिढी आपण घडवू तेवढा समाजसुद्धा बलवान होणार असतो. व्यक्ती व्यक्तींनी मिळूनच समाज आकाराला आलेला असतो. म्हणून प्रत्येक व्यक्तीच्या कृतीचा प्रत्यक्ष-प्रत्यक्ष परिणाम समाजहितावर पडत असतो ही बाब लक्षात घेतली पाहिजे. आपल्या एकट्याच्या चुकीच्या वागण्यामुळे एवढा काय फरक पडणार. नियमांनुसार वागावे ते इतरांनीच आपण नाही. अशा प्रकारची विस्मयकारक विधाने आपल्याला ऐकवण्यात येतात. ते स्वतःपासून समाजाची निर्मिती झाली आहे, ही मूळ संकल्पना लक्षात घेत नाहीत. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासातील भावनिक विकासावर अलीकडे विशेष काम करण्याची गरज निर्माण झाली आहे. भावनाशून्य पिढी निर्माण होत आहे की काय, अशी भीती अनेक जण अनेक उदाहरणाद्वारे मांडत असतात. हे सारे नीटपणे अभ्यासले तर असे होण्याचे काही कारण असेल तर आज समाजात व्यापलेले व वेगाने पसरत चाललेले सदोष विचार हेच आहे हे मान्य होण्यासारखे आहे.

अगदी इतिहासकाळापासून सबंध जगात सदोष स्वकेंद्रित विचारप्रणालीचा अतिरेक जेव्हा जेव्हा ज्यांनी केला तेव्हा तेव्हा ते प्रथमतः स्वतः आणि अंतिमतः समाज अडचणीत व संकटात सापडलेली आपल्याला अनेक उदाहरणे पाहावयास मिळतील. बुद्धिवंतांनी लोकांची ही सदोष स्वकेंद्रित विचारसरणी दूर करण्यावर त्या त्या काळात मोलाचे काम केले तेव्हा समाजहिताचे परिवर्तन घडल्याचे आपणास पाहावयास मिळते. जगातील कुठलाही मनुष्य मूलतः चांगला किंवा वाईट असण्याचा किंवा वाईट घडण्याला त्याने बाळगलेले त्याचे विचार कारणीभूत असतात. माहिती तंत्रज्ञानाच्या स्फोटामुळे या माहिती तंत्रज्ञानाच्या फायद्यासह आलेल्या तोट्यांमुळे जनसामान्यांचा जाणारा बळी वेळीच रोखण्यासाठी नेटक्या जनजागृतीची हीच वेळ आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

# सर्वाधिक घरांसाठी महाराष्ट्र गतिमान

'सर्वांसाठी घरे' हे राज्य शासनाचे धोरण आहे. त्यानुसार राज्यातील बेघर तसेच कच्च्या घरात वास्तव्यास असणाऱ्या लाभार्थींना स्वत:चे हक्काचे घर मिळावे असा प्रयत्न आहे. ही महत्त्वपूर्ण योजना मिशन मोडवर राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थींकडे स्वत:ची जागा आहे अशांना २६९ चौरस फूट चटई क्षेत्र घरकूल बांधकामासाठी १ लाख ३० हजार रुपयांपर्यंत अर्थसाहाय्य देण्यात येत आहे. प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेमध्ये नागपूर विभागासाठी ५ लाख ३३ हजार ६२५ घरे मंजूर करण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये हा विभाग राज्यात आघाडीवर आहे.




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र शासनाने महाराष्ट्राला प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेअंतर्गत २० लाख घरे मंजूर केली आहे. या व्यतिरिक्त १३.५ लाख घरे मंजूर केल्यामुळे राज्यातील ग्रामीण भागातील जनतेच्या घराचे स्वप्न साकार होणार आहे. आतापर्यंत सर्वाधिक घरे महाराष्ट्राला मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र शासनाचे आभार मानले आहेत.

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण ही १ एप्रिल २०१६ पासून सुरू झाली आहे. ग्रामीण भागातील सर्व बेघर कुटुंबांना आणि कच्च्या आणि मोडकळीस आलेल्या घरांमध्ये राहणाऱ्यांना मूलभूत सुविधेसह एक पक्के घर देण्याचा यामार्फत संकल्प आहे. स्वच्छ अन्न शिजविण्यासाठी समर्पित क्षेत्रासह २५ चौरस मीटर किमान घरकूल उपलब्ध करून देण्यात येत आहे. या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये केंद्र शासनाचा ६० टक्के तर राज्य शासनाचा ४० टक्के निधी राहणार आहे. आवास २०१८ या सर्वेक्षणाच्या आधारे घरांना मंजुरी दिली जात असून, आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी एकत्रित लक्ष्य ९९ लाख ६६ हजार ७६७ ठरविण्यात आले आहे. त्यामुळे राज्याच्या ग्रामीण भागात २ कोटी पक्की घरे, तर शहरी भागात १ कोटी घरे बांधली जाणार आहेत. राज्याला अतिरिक्त १३.५ लाख घरे मंजूर झाली असून, यासाठी नोंदणीला सुरुवात झाली आहे. राज्यात आतापर्यंत २६ लाख लोकांची नोंदणी ही ऐतिहासिक कामगिरी ठरली आहे.

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण योजनेअंतर्गत नागपूर विभागात ५ लाख ३३ हजार २२५ घरांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. टप्पा एक अंतर्गत २ लाख ८५ हजार ११८ मंजूर झालेल्या घरांच्या बांधकामाला सुरुवात झाली आहे. टप्पा दोनमध्ये ८० हजार ४१४ घरांना मंजुरी देण्यात आली असून, अतिरिक्त १ लाख ६८ हजार ०९३ घरांच्या लाभार्थींच्या नोंदणीला सुरुवात झाली आहे.

विभागात कायम प्रतीक्षायादीत २ लाख ३५ हजार ५५२ कुटुंबांची संख्या असून, यातील १ लाख ६८ हजार ०९३ घरांच्या बांधकामाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. याअंतर्गत १ लाख ४० हजार ६६९ लाभार्थींची नोंदणी पूर्ण झाली आहे. भंडारा, गोंदिया, नागपूर व वर्धा जिल्ह्यात सरासरी शंभर टक्के नोंदणीचे उद्दिष्ट पूर्ण झाले असून, गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील लाभार्थींची नोंदणी लवकरच पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनी दिली.

प्रधानमंत्री आवास योजना टप्पा एकमध्ये विभागाला २ लाख ८५ ११८ घरांच्या बांधकामांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यापैकी २ लाख ७३ हजार ४२८ घरांचे बांधकाम पूर्ण झाले. त्यामुळे विभागाने ९५.९० टक्के काम पूर्ण करून राज्यात उत्कृष्ट अंमलबजावणी केली आहे. गोंदिया जिल्ह्यात उद्दिष्टापैकी ९८.९० टक्के, वर्धा ९५.४६ टक्के, गडचिरोली ९५.४५ टक्के, भंडारा ९५.३ टक्के, चंद्रपूर ९३.४२ टक्के, तर नागपूर जिल्ह्यात ९२.९६ टक्के घरकुले पूर्ण झाली आहेत.

प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेअंतर्गत १६ लाख ८० हजार ९३ घरांचे उद्दिष्ट देण्यात आले असून त्यापैकी १ लाख ४० हजार ६६९ लाभार्थींची नोंदणी पूर्ण झाली आहे. प्रधानमंत्री आवास योजनेत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर, अल्पसंख्यक तसेच अपंगांसाठी घरकूल राखीव आहेत. सामाजिक, आर्थिक आणि जात जनगणना निकष वापरून लाभार्थींची निवड केली जाते आणि निवडलेल्या लाभार्थींची यादी ग्रामसभेद्वारा मंजूर केली जाते. लाभार्थींना घरकूल अनुदान थेट लाभार्थींच्या लिंक केलेल्या बँक खात्यात अथवा पोस्ट ऑफिस खात्यात जमा केले जाते. ग्रामीण भागातील बेघर कुटुंबासाठी हक्काचा निवारा या योजनेमुळे मिळत असल्याने ग्रामीण भागातील नागरिकांचाही सहभाग वाढत आहे.

**अनिल गडेकर**

९४०३६२४४४२

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com

## आनंदाचे डोही


अपर्णा कुळकर्णी / ९४२१२१२४४८

# धर्म संस्कृती पालनाचा आनंद

धर्म जेव्हा शाश्वत सत्याची धारणा प्रबळ करीत मानवतेचे पुष्प फुलवून आनंदाची व्याप्ती वाढवणारा असतो. तेव्हा त्या धर्माची आभा हजारो वर्षांपासून पृथ्वीतलावर मानवाला गुण्यागोविंदाने राहायला शिकवत, वाढतच असते. कितीही आक्रमणे झालीत, टोकाचे संघर्ष झालेत तरी जगाच्या पाठीवर हिंदू धर्माची ध्वज पताका दिमाखाने फडकत राहणार. जनमानसाच्या डगमगत्या श्रद्धेच्या नौकेला विश्वासाचे शिड देण्याचे काम यंदाचा महाकुंभ करीत आहे, असे म्हणूनच जाणवत राहते. धर्म संस्कृतीचा अद्‌भुत संगम म्हणजे महाकुंभ! महाकुंभ आणि सभोवतीच्या त्या वातावरणाशी जेव्हा आपण समरस होतो तेव्हा चोहिकडे आनंदी आनंद, उल्हास, उत्साहाचे श्रद्धापुष्प उमलून गंधाळत आहे, असे वाटत राहते. याचा खोलवर परिणाम भावी पिढीवर निश्चितच होणार. हे मांगल्याचे बीजारोपण पुन्हा वटवृक्षात परिवर्तित होऊन आपल्या शीतल छायेत चैतन्य आनंदाच्या झुल्यावर भावी पिढ्यांना झुलवण्यासाठी असंख्य पारंब्या घट्ट रुजवून दिमाखात उभे राहील.

वरवर व्यक्ती कितीही आधुनिकतेच्या मागे धावत असला तरी आनंद, शांती, समाधानाचाच शोध घेत मानवाची जीवनयात्रा सुरू असते. हे सातत्याने प्रत्ययास येते. याला कारण आपल्या धर्म संस्कृतीची खोलवर रुजलेली पाळेमुळे! हजारो वर्षांपासून या भूमीवर आध्यात्मिक अधिष्ठान मानवी कल्याणाचे कारक बनून ठामपणे अस्तित्वात आहे. आज तर वैज्ञानिक संशोधनही आपल्या धर्मातील अनेक बाबींना सत्याचे प्रमाणपत्र देऊन त्याचे महत्व अधोरेखित करत आहे. आपल्या निसर्गपूजक संस्कृतीत नद्यांना माता, जीवनदायिनी म्हणून पूजले जाते. त्यामागे अर्थात अनेक हेतू आहेत. पण, अगदी स्पष्ट दोन हेतू आहेत जिची आपण पूजा करणार ती शुद्ध, स्वच्छ, अखंड प्रवाहित ठेवण्याची जबाबदारी आपलीच असायला हवी. जेणेकरून प्रत्येक मानवाला आजीवन शुद्ध जल मिळू शकेल. दुसरा विशेष हेतू अध्यात्मिक उन्नती! आता नुकतेच संशोधन समोर आले आहे. कुंभमेळ्यातील अमृत स्नानाच्या वेळी गंगेच्या पाण्यात आध्यात्मिक लहरींची पातळी वाढलेली दिसून आलीये. आपल्या पूर्वजांच्या शास्त्रशुद्ध अभ्यासातून सिद्ध झालेल्या ज्ञानसागरास नाकारण्यात धन्यता मानण्यापेक्षा, त्याचा सुयोग्य स्वीकार केल्यास जीवनात पावलोपावली आनंदाची अनुभूती आल्याशिवाय राहणार नाही.

धर्म म्हणजे तरी काय हो? 'धारयति इति धर्मः' जगताना आपल्या उत्तमाकरीता आपण जे जे धारण करतो किंवा ज्या धारणेतून आपला खरा विकास होत संपूर्ण आनंद स्थितीपर्यंत आपण पोहचणार असतो तो धर्म! धर्म म्हणजे एक सर्वसमावेशक जीवन मार्गदर्शिकाच होय. म्हणून तर मातृधर्म, पितृधर्म, आचार्यधर्म, पुत्रधर्म अगदीच काय तर शेजारधर्म इतक्या साध्यासोप्या जीवन धारणांपर्यंत आपण धर्माला अगदी सोप्पं करून टाकतो. पण, खेदाने म्हणावेसे वाटते की, आजच्या काळात धर्म ही आचरणापेक्षा चर्चा आणि वादविवादाची गोष्ट होऊन बसली आहे. पण, खरंतर धर्मसंस्कृती पालनाचा आनंद आपल्या जाणिवा जागृत, समृद्ध करून नवीन पिढीच्या मनात त्याविषयी औत्सुक्य, आदरभाव निर्माण करतो. आपला धर्म, संस्कृती ही आपली खरी ओळख व जीवन पद्धती असते.



त्याविषयीचे अज्ञान आपल्याला आपल्याच धर्म पालनास परावृत्त करते. याउलट, आपल्या धर्माचे शास्त्रोक्त ज्ञान घेऊन ती शुद्ध ज्ञानधारा अखंड प्रवाहित ठेवण्याचे, शिवधनुष्य पेलून आनंदाच्या डोही आनंद तरंगांचा अनुभव खऱ्या अर्थाने घेता यायला हवा आहे.

सध्या तर सगळीकडे एकच गोष्ट कानावर येतेय, आम्ही प्रयागराजला जाऊन आलोत अन् जाणार आहोत. काय मस्त उल्हासित वातावरण आहे ना! अखिल विश्वाला भारून टाकणारी एक वेगळीच सकारात्मक उर्जा यंदाच्या महाकुंभामुळे निर्माण झाली आहे. महाकुंभात जाऊन स्नान करून, तेथील मंदिरात दर्शन घेऊन त्या वातावरणातल्या चैतन्याने उजळून आलेल्यांच्या, आनंदी अत्तराने इतरांनाही या महाआनंदाची लागण न होणे अशक्यच! त्यांच्या अंतरंगातील प्रसन्नतेच्या सूरांची आळवणी आजूबाजूच्या लोकांच्या मनात त्या आनंदी अनुभवांच्या गीतांची मैफल सजवतात.

'बोलो हर हर गंगे'सह लाखो मुखातून गुंजणाऱ्या मंत्र लहरी परीसर, आसमंत आणि मन दणाणून सोडतात तेव्हा वैश्विक उर्जा उच्च पातळी गाठते. आपण त्या क्षणाचा, धर्म संस्कृतीचाच एक भाग आहोत ही अनुभूती अवर्णनीयच! कुंभ मेळ्यात त्रिवेणी संगमावर गंगास्नानाचा अनुभव मनात पावित्र्याचा आनंदी ओलावा झिरपत ठेवण्याचे कार्य करीत राहणारच. पाप-पुण्य हा भाग सोडून दिला तरी गंगेच्या पाण्याचा तो गारेगार स्पर्श तनामनात जी शिरशिरी निर्माण करतो तो एक वेगळाच आनंदानुभव असतो. संध्याकाळची गंगा आरती म्हणजे एक दिव्य अनुभवच! तो असंख्य ज्योतींचा अननुभूत केशरी प्रकाश, शंखनाद, नदीपात्रातील दीप आणि चोहीकडे माणसांचाच सागर! जातपात, गरीब-श्रीमंत सारे भेदाभेद विसरून आनंदयात्रेत सहभागी सारेच एकरूप भासतात. तेव्हा मानवता धर्म सहजतेने रुजून जातो. तेथील उत्साही सळसळ मनाला हर्षोत्सवी झळाळी देत आहे, या अनुभवात प्रत्येक जण रंगून जातो. याशिवाय, कित्येक आश्चर्यकारक आणि अविश्वसनीय गोष्टी बघायला मिळणे हीसुद्धा कुंभमेळ्यातील पर्वणी असते. आपल्या धर्म संस्कृतीतील माहिती नसलेल्या अनेक अद्‌भुत, विस्मयकारी गोष्टी तिथे प्रत्ययास येतात. काही आखाडे, साधू जे आपल्या आसपास कधीही, कोठेही दिसत नाहीत. पण, इथे त्यांचे अवचित दर्शन घडते. त्यांच्या जीवनशैलीविषयीचे कुतूहल, उत्सुकता काहींच्या अभ्यासाचा विषय होतो. आखाड्यांच्या भव्य मिरवणुका तर विशेष आकर्षणाचा महाकुंभाचा केंद्रबिंदू होऊ बघतोय. विश्वविक्रमी उपस्थितीचे सर्व उच्चांक मोडीत काढणाऱ्या या महाकुंभमेळ्याचा साक्षीदार होण्याचे भाग्य ज्याला लाभले त्या प्रत्येकाला धर्म संस्कृती पालनाच्या आनंदाचा परिसस्पर्श निश्चितच झाला आहे. या आनंदरथावर स्वार झालेले पवित्र गंगा जलाच्या तुषारांनी पावन झालेले मन एकच मागणे मागत राहील...

***सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामया ।***
***सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखभाग् भवेत् ॥***

---

# वीरांगना रामप्यारी गुर्जर

शुभांगी गान/८६५७४२४०७१

**जिसकी बहादुरी, पराक्रम सब लोगो की जुबानी थी।**
**उत्तर प्रदेश की बेटी राम प्यारी गुर्जरी मर्दानी थी ॥**
**ललकार रही, लहरा रही, हवा मे खड्ग और भाला ।**
**रणचंडिका बन उतरी थी, भभक उठी थी ज्वाला ॥**

कवी दीपक नारंग यांनी तिच्या व्यक्तिमत्वाचं वर्णन या शब्दात केलंय. इतिहासात अशी अनेक रत्नं आहेत ज्यांचा इतिहास अज्ञात आहे. पण, त्या त्या काळात त्यांनी दाखवलेलं शौर्य आणि पराक्रम यांनी एक इतिहास रचलाय, हेही तेवढंच खरं! कोण होती ही रामप्यारी गुर्जर?

ना ती कुठली राणी होती, ना कुठली शासक! वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी तिच्या नेतृत्वात ४० हजार महिला



योद्धांनी आक्रांता तैमूरलंगशी दिलेला लढा आश्चर्यचकित करणारा होता. उत्तर प्रदेशातील सहारनपूर, या चव्हाण गुर्जर कुटुंबात जन्मलेली ही मुलगी असामान्य आणि निडर होती. आपण कुस्तीगीर बनावं ,आखाडा गाजवावा ही तिची मनापासूनची इच्छा होती. आपला भाऊ आणि वडील यांच्या समवेत कुस्ती बघायला जाणं, ही तिची आवड होती. सकाळ-संध्याकाळ व्यायाम करून आणि उत्तम जीवनशैलीचं आचरण करून तिने स्वतःला इतकं बहादूर आणि सक्षम बनवलं होतं की, कोणत्याही संघर्षाला तोंड देण्यास ती सक्षम होती. पुरुषी कपडे घालणं तिला मनापासून आवडत असे. १३९८ मध्ये भारत तुघलक शासकांच्या आधीन होता पण, कोणत्याही राजाने त्याचं आधिपत्य मान्य केलं नव्हतं. नासिरुद्दीन तुघलक हा उत्तर प्रदेशातील दुर्बल शासक! समरकंद येथे राज्य करणाऱ्या तैमूर लंगला भारतात प्रवेश करायचा होता आणि त्याच्यासाठी ही उत्तम संधी होती. नासिरुद्दीन तुघलकला हरवून त्याने दिल्ली काबीज केली. त्याला भारतात इस्लामचा प्रसार करायचा होता. असंख्य हिंदू त्याने मारले होते. दिल्ली त्याच्या दहशतीने भयभीत होती. दिल्लीनंतर अनेक तीर्थस्थळांकडे त्याने मोर्चा वळवला. भारतातील सनातन धर्म नष्ट करून इस्लामचं वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या ध्येयाने तो पछाडला होता.

त्याच्या या भयंकर अत्याचाराच्या वार्ता हरियाणा आणि आजूबाजूच्या जाट क्षेत्रापर्यंत पसरल्या. जाटक्षेत्र प्रमुख देवपाल यांनी या अत्याचाराचा बीमोड करण्यासाठी महापंचायत बोलावली. यात गुर्जर, जाट, राजपूत, ब्राह्मण, वाल्मिकी, अहिर असे विभिन्न समुदाय एकत्र आले. तैमूर विरुद्ध लढायचं, हे एकच ध्येय त्यांच्यासमोर होतं. त्यासाठी गुरीला नीतीचा प्रयोग, ही त्यांची रणनीती होती. त्यांनी सव्वा लाखावार सेना तयार केली. त्यापैकी चाळीस हजार महिला सेनेची कमांडर होती रामप्यारी गुर्जर आणि पुरुष योद्ध्यांचं नेतृत्व महाबली जोगराजसिंह गुर्जर आणि हरविर सिंह गुलिया यांनी केलं. गुरीला नीतीनुसार ते रात्री आक्रमण करीत आणि पहाटेपूर्वी तिथून पलायन करीत. रामप्यारी ने स्वतःची स्वतंत्र रणनीती तयार केली. त्यानुसार तिने आपल्या सैन्याच्या तीन तुकड्या बनवल्या. एक तुकडी त्यांच्या सैन्याला शस्त्र आणि अन्नधान्य पुरवठा करीत असे. दुसरी तुकडी शत्रूचं जेवण नष्ट करायची तर तिसरी रात्रीच्या बेसावध क्षणी अचानक तैमुरच्या सैन्यावर हल्ला करून त्यांना परास्त करीत असे. या महिला लढवय्यांना तिने शस्त्र-अस्त्र आणि युद्धनीतीचे संपूर्ण ज्ञान दिलं. शिवाय पाचशे घोडेस्वार तैमूर विरुद्ध गुप्तहेरीसाठी तैनात केले.

तैमूरलंग दिल्लीवर दहशत पसरवून मेरठकडे येण्यासाठी निघाला. लूटपाट, कत्तली आणि देवस्थळं उध्वस्त करीत त्याने मेरठमध्ये प्रवेश केला. पण, तो चकित झाला. संपूर्ण गाव रिकामं करण्यात आलं होतं. अत्याचार करायला किंवा लूटपाट करायला गावात काहीच नव्हतं. तो हरिद्वारकडे वळला. पण, रस्त्यात रामप्यारी गुर्जर आणि तिच्या साथीदारांनी तैमूरच्या सैन्याला प्रचंड मनस्ताप दिला. परिणामी, त्यांच्यातला लढण्याचा उत्साहच संपला होता. रात्री छापे पडत असल्यामुळे झोप पूर्ण होत नव्हती. त्यात रामप्यारीची एक तुकडी त्यांच्या अन्नधान्याची नासाडी करीत असे. ना जेवण ना झोप! सैन्य थकलं होतं. रामप्यारी गुर्जर आणि जोगराज सिंह गुर्जर यांनी केलेल्या जबरदस्त आक्रमणाने तैमूरची असंख्य सेना मारली गेली. हरिद्वारमध्ये तर तैमूरच्या सेनेचा त्यांनी प्रचंड पराभव केला. पलायन करणाऱ्या तैमुरच्या छातीवर हरवीर सिंह गुलियाने केलेला भाल्याचा वार इतका जबरदस्त होता की, जखमी तैमूर त्यातून वाचू शकला नाही. जखम चिघळली आणि त्यातच १४०५ मध्ये त्याचा मृत्यू झाला. तैमूरसारख्या अत्यंत क्रूर शासकाला महिलांच्या एका सेनेने आणि त्यांची सेनापती रामप्यारी गुर्जरने दिलेला लढा खरंच अभूतपूर्व असाच होता.

---

# खुलला रंग मेंदीचा...

भारती सावंत/ ९६५३४४५८३५

***मेंदीच्या पानावर, मन अजून झुलते गं...***
***जाईच्या पाकळ्यांस, दव अजून सलते गं...***

गोऱ्या तळहातांवर मेंदी लावायला न आवडणारी यौवना विरळीच! भारतीय संस्कृतीत परंपरांचा खूप सन्मान होतो. वधू-वरांच्या हातावरील मेंदीही याला अपवाद नाही. स्त्रिया-मुली सणासुदीला आपल्या हातांवर मेंदीची सुंदर डिझाईन काढतात. हातावरील मेंदीची नजाकत तरी वाखाणणीयच! सुंदर कलाकुसर केलेले ते मेंदीने रंगलेले हात आपल्या भावी पतीराजाच्या हातात देताना, नववधू किंचित थरथरते. परंतु, त्यातही नवरोबावरील विश्वास आणि प्रेम सामावलेले असते. सुंदर नाजूक फूलवेलींची कलाकुसर करून वधूच्या हातावर रेखाटली जाते. ४-५ तास चालणारा हा कार्यक्रम कंटाळवाणा असला तरी, दुसऱ्या दिवशी त्या हातांचे सौंदर्य पाहण्याजोगे असते. ते पाहताना सारेच थक्क होतात. पण, मेंदीच्या डिझाईन आणि त्या हातांवर स्तुतिसुमने उधळतात.

***लावा गं सयांनो साऱ्या, मेंदी सखीच्या हाताला***
***सखा साजण पाहिल गं, तिच्या तळहाती स्वतःला***

'फुलले रे क्षण माझे फुलले रे'... तळहातावरील मेंदी पाहत प्रत्येक यौवनेच्या मनात हेच तर तरळते. हाताला लावताना ओलसर हिरवी सुंदर नक्षी गुरफटलेली ही मेंदी दुसऱ्या दिवशी तळहाताचे सौंदर्य कित्येक पटींनी वाढवते अन् तरूणी 'खुलविते मेंदी माझा रंग गोरापान' असे गुणगुणत आपला तळहात वारंवार न्याहाळते.

स्त्रियांना सोनेहिऱ्याच्या अलंकाराप्रमाणे मेंदीही खूप आवडते. म्हणूनच सणावाराला, कार्यक्रमाला त्या आपल्या हातावर सुंदर मेंदी रेखाटतात. विवाहप्रसंगी संपूर्ण हात भरून नक्षी असलेली मेंदी नववधूचा सौंदर्यात भरच घालते. म्हणूनच छायाचित्रकार मेंदी काढलेल्या दोन्ही तळव्यांचे छायाचित्रण मुद्दाम करतात. मेंदी तळहातांची नजाकत वाढवतेच पण, तिची लालीही गालावर उमटवते.

मेंदी शरीराला थंडावा देते नि मनाला उभारा! आमच्या लहानपणी असे तयार कोन उपलब्ध नव्हते. प्लास्टिकच्या पाकिटात मिळणारी मेंदी पावडर चहाच्या पाण्यात किंवा कात घालून आणि लिंबू पिळून दिवसभर भिजवली जायची. रात्री जेवून झाल्यावर ती आगपेटीच्या काडीने हलक्यानेच हातावर काढली जायची. डाव्या हाताला मेंदी जरा जास्तच मनापासून लावली जायची. उजवा हात कामाचा म्हणून कधीकधी गोल ठिपके किंवा सारवल्यासारखी ओली मेंदी हातावर पसरली जायची. सकाळी लवकर उठून आपला मेंदीने रंगलेला हात पाहताना कोण आनंद व्हायचा! त्याही आधी मेंदीची पानं तोडून आणून पाट्यावर वाटली जायची. ती नैसर्गिक मेंदी वाटता वाटताच हात लाल होऊन जात. मैत्रिणी, बहिणी एकत्र मेंदीची पाने वाटून हातावर नक्षी काढत. जिची मेंदी जास्त रंगायची ती भाव खाऊन जायची. मग इतर जण तिला 'नवरा खूप प्रेम करणारा मिळणार बरं का' असे म्हणून चिडवत. हाताला मेंदी लागली की, घरातील जाणत्या बायका दोन दिवसात हिचा विवाह होऊन ही आपल्याला सोडून जाणार म्हणून हळव्या होत. वधू मात्र कधी येणार स्वप्नातील राजकुमार आणि मला घेऊन जाणार दूर त्याच्या गावी? अशी तिची स्थिती होई.

***चढली मेंदीची ही लाली, वर वधूच्या हातांवरती***
***गुलाब फुलुनीच गाली, प्रेमीच्या ओढीने झुरती***

लग्नाच्या वेळी वधूपक्षाकडून वधूकडे मेंदी पाठवली जाते. तीच मेंदी वधूच्या हाताला लावली जाते. त्यावेळी नक्षीच्या आत वराचे नावही रेखाटले जाते.आपल्या भावी नवऱ्याला आपले मेंदीने रंगलेले हात दाखवण्यासाठी ती उतावीळ असते. तिचे मन फुलपाखरू होऊन हवेत तरंगते. आपले आरस्पानी सौंदर्य पाहून आपला साजण किती आनंदेल. आपल्यावर कौतुकाचा वर्षाव होईल आणि आपणही त्या विश्वात रमून जाऊ. किती सुंदर असतील ते क्षण!

***मनमयुर हा लागला नाचू, येईल सखा हा राजकुमार***
***जाईल हरखून हे तनमन, घोड्यावरती असे तो स्वार***

---

## अभिजात अमृत

प्रा. सुनंदा पाटील/ ८४२२०८९६६६

# डोईचा पदर आला खांधावरी...


संत साहित्य हा भक्तिमार्गीयांचा शाब्द आविष्कार आहे. भारताच्या सांस्कृतिक इतिहासाचा फार मोठा कालखंड भक्तिमार्गाने दुमदुमला. या काळात विविध धर्मपंथ, संप्रदाय होते. एवढेच नाही तर उपास्यदेवताही विविध होत्या आणि उपासना मार्गही! परंतु, त्यांचे प्राणतत्व एकच आणि ते म्हणजे भक्तिभाव!

या परंपरेत दक्षिणोत्तर किंवा पूर्वपश्चिम भारताचा विचार केला तरी, महाराष्ट?ात स्थापित असलेला वारकरी संप्रदाय हा खूप महत्त्वाचा ठरतो. इथल्या संतांची भूमिकाही महत्त्वाची आहे. सर्व भक्तिसंप्रदायांच्या या पसाऱ्यात महाराष्ट?ाचं स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. भौगोलिकदृष्ट्या महाराष्ट? हा भारताच्या मध्यावर आहे. भाषिकदृष्ट्या आर्यभाषिक प्रदेशांच्या सीमा आणि द्रविड भाषिक प्रदेशांच्या सीमा असलेले शेजारी चारही बाजूंनी आहेत. त्यामुळे उत्तर-दक्षिण, आर्य-द्रविड सर्वांना सामावून घेण्याचं सांस्कृतिक कार्य महाराष्ट? प्राचीन काळापासून करीत आला आहे. व्यापक अर्थाने महाराष्ट? हे भारतीय संस्कृतीचे संगमतीर्थ आहे.

स्थूलमानाने इसवीसनाचे बारावे ते सतरावे शतक हा ५ ते ६ शतकांचा काळ भक्तिमार्गाचा कालखंड मानता येईल. स्वातंत्र्योत्तर काळात काही साहित्यप्रकारांनी जो 'आवाज' दिला, तेच काम भक्तीचळवळींनी मध्ययुगातच केले. समाजातील प्रस्थापितांनी धर्मक्षेत्रात जे मापदंड निर्माण केले होते ते भक्तीमार्ग यांनी झुगारून दिले. कृत्रिमता, पाखंड उघडे पाडले. न्यूनगंडातून उपेक्षितांची मुक्ती केली, त्यांचा आत्मविश्वास जागवत आत्मप्रतिष्ठेचा मार्ग प्रशस्त केला.

वरील हेतू सिद्धीस नेण्यासाठी संत साहित्य निर्माण करावे लागले नाही तर, ते निर्माण झाले. अखिल भारतात काश्मिर ते कन्याकुमारी आणि बंगाल ते आसाम इथपर्यंत अनेक संत झाले. त्यातही स्त्रीसंतांनीसुद्धा साहित्यात खूपच मोलाची भर घातली. विस्तारभयास्तव इथे सगळी नावे घेता येणार नाहीत. महाराष्ट?ातील वारकरी संप्रदाय तर जात, धर्म, स्त्री, पुरुष हा भेद न करता,'आम्ही आनंदे नाचू गाऊ' म्हणणाऱ्या संतांमधे अनेक स्त्री संत झाल्या.

मुक्ताई! ज्या कुळकर्णी भावंडांना संन्याशाची मुले म्हणून यज्ञोपवित संस्कार करण्यास नकार दिला. निवृत्तीनाथ त्यावेळी दहा वर्षांचे तर मुक्ताई फक्त चार वर्षांची! दादाच तिचे पालक आणि गुरू झाले. त्यात मुक्ताई, तिचा विवाह हे तर दूरदूरपर्यंत शक्य नव्हतं. पण, त्यामुळे मुक्ताईचे साहित्य, तिचे अभंग कम अस्सल ठरत नाहीत. त्यांची काव्यरचना ही अतिशय मौलिक आहे. त्यातही 'ज्ञानदेव तुकाराम' या मध्यमपदलोपी समासात जी वारकरी संत मंडळी आहे, त्या स्त्री संतांमधे संत मुक्ताई, संत जनाबाईचे नाव महत्वाचे आहे. निर्मळा, नागी, कान्होपात्रा, बहिणाबाई, सोयराबाई, लिंबाई, विठाबाई अशा आणखी अनेक स्त्रीसंत आहेत.



मुक्ताबाईंना अतिशय अल्पायुष्य मिळालं. अतिशय विचित्र आयुष्य या चारही भावंडांच्या वाट्याला आलं. त्यात मुक्ताई सर्वात धाकटी असूनही सर्वांची आई झाली. समाजात मिळणारी वागणूक बघून, ज्ञानेश्वर महाराज अतिशय दुःखी झाले आणि झोपडीची ताटी (दरवाजा) बंद करून घेतला. सर्व भावंडांनी त्यांना बाहेर येण्याची विनंती केली. तर, मुक्ताईने आपल्या अभंगांमधून त्यांचे मन वळवले. तेच अभंग पुढे ताटीचे अभंग म्हणून प्रसिद्ध झाले.

***चिंता क्रोध मागे सारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥***
***विश्व रागे झाले वन्ही । संती सुखे व्हावे पाणी ॥***
***शब्दशस्त्रे व्हावे क्लेश । संती मानावा उपदेश ॥***
***विश्वपट ब्रह्म दोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥***
***संत तोची जाणा जगी । दया क्षमा ज्याचे अंगी ॥***
***लोभ अहंता न ये मना । जगी विरक्त तोची जाणा ॥***
***मिथ्या कल्पना मागे सारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥***

चिमुकल्या बहिणीने केलेली ही विनवणी माऊलींना टाळता आली नाही आणि ते बाहेर आले. संत कसा असावा? याचं अतिशय सुंदर विवेचन यात आहे. या शिवायही मुक्ताईच्या अनेक अभंग रचना प्रसिद्ध आहेत. तशीच कान्होपात्रा! ती कोण होती?काय? यावर विवेचन नको. ती फक्त विठ्ठलभक्त होती, स्त्रीसंत होती.

***नको देवराया अंत अता पाहू***
***प्राण हा सर्वथा जाऊ पाहे ॥***
***हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले***
***मजलागी जाहले तैसे देवा ॥***
***मोकलोनी आस जाहले उदास***
***घेई कान्होपात्रेस हृदयात ॥***

हा तिचा अभंग सर्वश्रुत आहे. संत बहिणाबाई! सांसारिक सुख तिला फारसं लाभलं नाही. जरठ नवयाशी संसार करावा लागला. त्यांचाही अभंग बघा.

***विरक्तीचे मूळ । प्रपंचाचा त्याग ॥***
***पाहताचि एक । गृह शैल ॥***

स्त्री ही मोक्षमार्गातली धोंड, ही आजवरची धारणा ! पण, घर हा परमार्थ मार्गातला स्त्रीच्या दृष्टीने फार मोठा टप्पा असल्याचे ती बोलून दाखवते. अशा अनेक स्त्रीसंत आहेत. त्यांचं साहित्यही विपुल आहे. मात्र, त्यात संत जनाबाई यांचं स्थान वेगळं आणि मोठं आहे.

संत जनाबाईंच्या अभंगात विठ्ठलाचं वर्णन आहेच. पण, त्यासोबतच स्त्रीचं वागणं, जगणं, तिची अगतिकता याचं खूप छान वर्णन आहे. त्यात स्त्रीच्या मुक्तीसाठी असलेल्या रचना तर आपल्याला अंतर्मुख करून जातात.'डोईचा पदर आला खांद्यावरी' हा अभंग हे त्यावरचं उत्तम उदाहरण आहे. आपल्या विपुल रचनेत 'नामयाची दासी जनी' ही साममुद्रा धारण करणारी जनाबाई सर्व वारकरी स्त्री संतांमध्ये अतिशय लोकप्रिय आहे. ती महाराष्ट?ाच्या लोकजीवनाचा विशेषतः स्त्रीजीवनाचा एक भाग कायमचा बळकावून बसली आहे. विठ्ठलाने सगुणरूपाने तिच्याबरोबर दळणकांडण, धुणीभांडी, झाडलोट, शेणगोठा ही ग्रामीण कष्टकरी स्त्रीची नित्य कामे करीत राहणे, तिच्या फाटक्या गोधडीत झोपणे, तिच्यासोबत ताककण्या खाणे, तिची वेणीफणी करणे या प्रकारच्या वर्णनाच्या शेकडो ओव्या आजही ग्रामीण स्त्रीच्या मुखी गुंजत आहेत. महत्वाचे म्हणजे ही वर्णने जनाबाईंच्या अभंगांतूनही आली आहेत.

***तुळशीचे वनी, जनी उकलिते वेणी***
***हाती घेऊनिया लोणी, सेवा करी चक्रपाणी***

किंवा

***जनी बैसली न्हायाला, पाणी नाही विसणाला***
***हाती घेऊनी घागरी, देव निघाले तातडी***

ही लोकपरंपरेतील जात्यावरची एक ओवी! इथे आशय आणि रचनेत सारखेपणा आढळतो. गोदाकाठच्या गंगाखेड येथील दमा आणि करूंड या शूद्र भगवतभक्त दांपत्यांची जनी ही नवसाची लेक! पांडुरंगाच्या दृष्टांतानुसार ती पाच वर्षांची होताच तिला दामा शिंप्याच्या स्वाधीन केले. पुढे त्यांचा लेक नामा म्हणजेच संत नामदेव महाराज जे मोठे विठ्ठल भक्त झाले. त्याची दासी म्हणवून घेत जनाई जगली. जनाईचा जन्ममृत्यू काळ याबद्दल नेमके संदर्भ उपलब्ध नाहीत. पण, नामदेवांच्या बारशाला प्रत्यक्ष पांडुरंग रुक्मिणी, बाळंतविडा घेऊन आल्याचे ती वर्णन करते. म्हणजे, नामदेव महाराजांपेक्षा ती खचितच ५-७ वर्षांनी तरी मोठी असावी. पुढे इ.स.१३५० मध्ये संत नामदेव महाराजांसोबतच ती पायरीच्या चिऱ्यात अंतर्धान पावली, अशी लोकश्रद्धा आहे.'पंढरी पंढरी, विठुरायाची नगरी' म्हणून साद घालणाऱ्या ग्रामीण स्त्रीला पंढरपूर, विठ्ठल, रखुमाई, संतजन हा सर्व गोतावळा आपल्या जीवीचा माहेरचा जिव्हाळा वाटतो.

***रुक्मिणी कालविते, निरशा दुधामधी केळं***
***देवाला आवडतं, जनाचं ताक शिळं***

अशा ओवीतून विठ्ठल आणि जनाबाई यांच्या नात्याचे सूचन होते.

***आषाढीला मी नाही गेले, कर्तिकीला गं जाईन***
***देव पंढरीचा गं विठू, विटे उभा मी पाहीन***
***गोपाळपूरा जाया, जनाईला गं झालं ऊन***
***देवा या विठ्ठलानं, यानं लाविलं गं चिंचबन***

किंवा

***इठ्ठलाच्या गं देवळात, मी होईन पारवा***
***देवाच्या नावाचा मी गं वेचीन सरवा***

अशा ओव्यांबरोबर जनाबाईच्या निमित्ताने, उपेक्षित श्रमकरी स्त्री आपल्या मानसविश्वात विठ्ठलाबरोबरच एक वेगळा प्रपंच थाटून, त्यात रंगून बसली असावी असे वाटते. अनेक स्त्रियांच्या मनात घर करून राहणारी जनाई, वास्तवात मात्र बेघर होती. तिचं वास्तव जीवन अत्यंत खडतर आणि उपेक्षित होतं.

दामाशेटकडे आल्यानंतर लगेचच तिचे आईबाप गेले. ही घटनाही जनाईच्या अभंगातून येते.

***माय मेली बाप मेला, आता सांभाळी विठ्ठला***
***मी तुझे गा लेकरू, नको मजसी अव्हेरू***

जनाईला संत नामदेव महाराजांबद्दल असलेला आदर आणि भक्तिभाव तिने परोपरीने वर्णन केलाच आहे. तेवढीच ज्ञानदेवांविषयी असलेली ओढ तिने व्यक्त केली आहे. ते तिच्या अभंगांमधून जाणवते. दासी शब्दाविषयी बोलायचे तर जनी किंवा नागी (नामदेवांची पुतणी) तिचाही उल्लेख दासी असाच आहे. दासीचा अर्थ शिष्या असा घ्यायला हरकत नाही कारण, खुद्द ज्ञानेश्वरांनी,'म्हणे निवृत्तीदासु' म्हणत आपले शिष्यत्व विनम्रभावे अधोरेखित केलेले आहे.

विठ्ठलाच्या लेकुरवाळेपणाचे खूप सुरेख वर्णन जनाबाई करतात.

***विठु माझा लेकुरवाळा, संगे गोपाळांचा मेळा ॥***
***निवृत्ती हा खांद्यावरी, चोखा जीवा बरोबरी ॥***
***बंका कडियेवरी, नामा करांगुली ही घरी ॥***

***जनी म्हणे गोपाळा, करी भक्तांचा सोहळा ॥***

जनाई संत नामदेवांच्या घरी त्यांची शिष्या म्हणून राहत असे.

'दळीता कांडिता...तुज गाईन अनंता' म्हणणारी जनाई आपल्याला कळते. जनाईला तिच्या प्रत्येक कार्यात विठ्ठलाने मदत केली. तोही अभंग फारच सुरेख आहे.

*माळ पदक विठ्ठल, विसरला भक्ताघरी*
*झाली पदकाची चोरी, आला आळ जनीवरी'*

संतसहवासाने तिला जो थोडाफार आधार मिळाला त्यात ती धन्यता मानते.

स्त्रीजन्म म्हणवूनी न व्हावे उदास,
साधुसंती ऐसे मज केले

'विदुर सात्विक माझिये कुळीचा' असा ती उल्लेख करतेच. तसेच चोखामेळा, रोहिदास यांच्याविषयी तिला अभिमान वाटतो. संत आणि देव ती एकरूप मानते. जनाईचे देवाशी एवढे एकरूपत्व आहे की,

***'देव खाते, देव पिते,***
***देवावरी मी निजते,***

देवाविण नाही रिते।। याचा साक्षात अनुभव ती घेते. जनाबाईला संतांनी आधार दिला असला तरी, जनसामान्यांनी तिच्या चारित्र्यावर आक्षेप घेतले असणारच. म्हणून अखेर निर्धाराने तिला सांगावेसे वाटते,

***डोईचा पदर आला खांद्यावरी,***
***भरल्या बाजारी जाईन मी***
***हाती घेईन टाळ खांद्यावर विना,***
***आता मज मना कोण करी***
***पंढरीच्या वाटे मांडियेले पाल,***
***मनगटावर तेल घाला तुम्ही***
***जनी म्हणे देवा मी झाले वेसवा,***
***रिघाले केशवा घर तुझे***

असं म्हणणारी जनाबाई ही मीराबाईचीच सखी वाटते. जननिंदेच्या भयापासून स्वतःला मुक्त करणारी जनाई! देहाची सुरक्षितता आणि त्यासाठी पाळावी लागणारी जनमर्यादा तिने कस्पटासमान मानली. ती जीवन्मुक्तच होती.

स्त्री ही विवाहित असली काय, अविवाहित किंवा विधवा असली काय? देहसंबद्ध असे तिचे चारित्र्य, लोकनिर्बंध, लोकसमज आणि लोकेच्छा हा एकूणच स्त्री जीवनातील एक मोठा अडसर होता, आहे आणि राहणार आहे. याच्या आधारे समाज स्त्रीला जीवनातून उठवू शकतो. हे लोकापवादाचे दडपण स्त्रीमनावर सतत टांगते असते. ते एक शस्त्र असते. सीता, द्रौपदीसह अनेक स्त्रिया याच मापदंडाने दंडिल्या गेल्यात. स्त्री संतांचेही तेच झाले. मुख्य म्हणजे त्यांचे संतत्व सिद्ध होईपर्यंतच्या वाटचालीचे काय? नंतर, याच समाजाने त्यांचा उदोउदो केला. म्हणूनच जनाई म्हणते, 'स्त्री जन्म म्हणवूनी न व्हावे उदास!'

अतिशय परखड पण मौलिक काव्यरचना करणारी संत जनाबाई म्हणूनच मला आवडते. भारतीय संत साहित्यात स्त्री मुक्तीच्या साहित्याची भर घालणारी ही संत स्त्री, तिचे काव्य, अभंग आणि विचारधन आजच्या काळालाही लागू आहेत.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## जुगार अड्डयावर पोलीसांचा छापा; तीन आरोपी ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ फेब्रुवारी -**

धाराशिव शहर पोलिसांनी ८ फेब्रुवारी रोजी जुगार विरोधी मोहिमेअंतर्गत शहरातील तीन ठिकाणी छापे टाकून कारवाई केली. या दरम्यान, तीन आरोपींना अटक करून त्यांच्याकडून जुगाराचे साहित्य व रोख रक्कम जप्त करण्यात आली.

पहिल्या कारवाईत मोहीते गल्ली येथील आनंद बबन खळदकर (वय ५०) याला नाझ हॉटेलच्या बाजूला मोकळ्या जागेत मिलन नाईट मटका जुगार खेळताना रंगेहात पकडले. त्याच्याकडून ९०० रुपये रोख जप्त करण्यात आले. दुसऱ्या कारवाईत शहबाज नदीम पठाण (वय ३१) याला देशपांडे भाजी मंडईजवळील कोकाटे शॉपिंग सेंटरमधील गाळा क्रमांक ३ येथे फन टार्गेट चक्री जुगार खेळताना आढळून आला. त्याच्याकडून २०,८५० रुपये जप्त करण्यात आले. तिसऱ्या कारवाईत उंबरे कोठा येथील बालाजी चव्हाण (वय ३०) याला बार्शी रोडवरील पानटपरीजवळ मिलन नाईट मटका जुगार खेळताना पकडले. त्याच्याकडून ८६० रुपये हस्तगत करण्यात आले.

या प्रकरणी महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) अंतर्गत तीन स्वतंत्र गुन्हे नोंदवण्यात आले असून, पुढील तपास धाराशिव शहर पोलीस करत आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### निकिता हिची मुंबई पोलीस दलात निवड

**जळकोट, दि.९ फेब्रुवारी -**

येथून जवळच असलेल्या होर्टी येथील दुसऱ्यांच्या शेतात मोलमजुरी करणाऱ्या शेतमजूर कुटुंबाची मुलगी आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करून मुंबई पोलीस दलात दाखल झाली आहे. गावातून पहिल्यांदाच मुलगी पोलीस झाली आहे. मुंबई शहर पोलीस दलात निकिता सतिश भोसले ही भरती झाल्याबद्दल होर्टी ग्रामस्थांच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी ज्ञानेश्वर भोसले, संजय गुंजिटे, दत्ता राजमाने, गणेश खराडे, दत्ता भोसले, भागवत भाळशंकर, विलास गायकवाड, धनराज भोसले, गावातील विविध पदांवर कार्यरत असलेले नागरिक, ग्रामस्थ उपस्थित होते.



### न्यू व्हिजन स्कूलचे रंगोत्सव स्पर्धेत यश

**लोहारा, दि.९ फेब्रुवारी -**

रंगोत्सव संस्था मुंबई यांच्यावतीने आयोजित राष्ट्रिय स्तरावरील रंगोत्सव चित्रकला स्पर्धा हि ऑक्टोबर २०२४ मध्ये घेण्यात आली होती. यामध्ये न्यू व्हिजन इंग्लिश स्कुलमधील नर्सरी ते आठवी वर्गातील एकूण २६० विद्यार्थ्यानी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धे चा निकाल नुकताच लागलेला असून त्यामध्ये स्कूलचे ३५ विद्यार्थी सुवर्णपदक, २६ विद्यार्थी रजतपदक, १० विद्यार्थी कांस्यपदक, ०५ विद्यार्थ्यांना विशेष प्रविण्यासह स्मृतिचिन्ह, १० विद्यार्थ्यांना विशेष भेटवस्तू आणि सहभागी सर्व २६० विद्यार्थ्यांना तसेच त्यांना मार्गदर्शन केलेल्या वर्गशिक्षक यानांही प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह प्राप्त झाले आहे. स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिस वितरण कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून अँड. मल्लिनाथ वचने पाटील, प्राचार्य शहाजी जाधव, संचालिका सविता जाधव आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.



### १० वीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**जळकोट, दि.९ फेब्रुवारी -**

होर्टी येथील इंदिरा गांधी प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेत १० वी वर्गाच्या विद्यार्थ्यांचा स्वयंशासन दिन व निरोप समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रकाश चव्हाण हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक विनायक राठोड, शिवाजी चव्हाण, शिवाजी कवठे, उमाकांत माळी उपस्थित होते. स्वंयशासन दिनाचे मुख्याध्यापक विक्रम राठोड, मुख्याध्यापक म्हणून समृध्दी राजमाने यांनी काम पाहिले. यावेळी इतर विद्यार्थी शिक्षकांनी पहिली ते ९ वीपर्यंतच्या वर्गाचे अध्यापन केले. कार्यक्रमास बिराजदार एस.एस. बनसगोळे, सचिन दाटे शिवशंकर, नससुडे, भिमराव, घोडके, लिमये, हब्बु आदिजण उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रावण राठोड यांनी केले आभार सपना चव्हाण यांनी मानले.



### श्रीयुष चव्हाण याची निवड

**जळकोट, दि.९ फेब्रुवारी -**

येथून जवळच असलेल्या आलियाबाद येथील सुपुत्र श्रीयुष सुनिता संजय चव्हाण याची १४ वर्षाखालील महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड झाली आहे. श्रीयुषने निवड सामन्यांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आणि निवडकर्त्यांना आकर्षित केले. निवड सामन्यांमध्ये त्याने नाबाद १५४ नाबाद १०८ तसेच ९५ आणि ९१ धावा ठोकल्या होत्या. या निवडीबद्दल माजी पं.स.सभापती प्रकाश चव्हाण, माणिकराव चव्हाण, सरपंच सुर्यकांत चव्हाण, उपसरपंच अमृता चव्हाण, सुभाष नाईक, विनायक चव्हाण, पांडुरंग चव्हाण, सुर्यकांत राठोड, माणिक राठोड, यशवंत राठोड, सिद्राम पवार, शिवाजी चव्हाण, हरीदास राठोड, बाबु राठोड, देविदास चव्हाण, हरीदास चव्हाण यांच्यासह ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

### शहराध्यक्षपदी गणेश शेवते यांची निवड

**कळंब, दि.९ फेब्रुवारी -**

कळंब शहरातील शासकीय विश्रामगृह येथे दि.८ फेब्रुवारी रोजी धाराशिव जिल्हा तेली समाज सेवाभावी संघ धाराशिवची कळंब शहराची नवीन कार्यकारणी बैठक घेऊन निवड करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष रवी कोरे, जिल्हा उपाध्यक्ष राजाभाऊ घोडके, जिल्हा कोषाध्यक्ष महादेव मेंगले, जिल्हा युवक अध्यक्ष शशिकांत बेगमपुरे यांची होती. कळंब शहराध्यक्ष गणेश शेवते, शहर उपाध्यक्ष सोमनाथ क्षीरसागर, उपाध्यक्षपदी संदीप शेवते, कार्याध्यक्षपदी किरण फल्ले, सचिव रोहित किरवे, संघटक बालाजी वांकर, कोषाध्यक्ष ओंकार कलशेट्टी, सहसचिव बबलू दळवे, सहसंघटक विजय देशमाने यांना निवडीचे पत्र देवून त्यांच्या सत्कार करण्यात आला.

पोलीस आणि नगरपरिषदेचा आंधळेपणा चव्हाट्यावर...

# तुळजापूरात तुटक्या फुटक्या पोलीस चौकीचेच अतिक्रमण

**दिपक चौक बनला अतिक्रमण चौक... अनेक वर्षापासून पडून असलेल्या मोडक्या पोलीस चौकीकडे नगरपरिषद आणि पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष...**



**तभा वृत्तसेवा / सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.९ फेब्रुवारी -**

दीपक चौकात अनेक वर्षापासून मोडकळीस आलेली जुनी पोलीस चौकी विनाकारण रोडच्या बाजूस ठेवून पोलीस प्रशासनानेच रोडवर अतिक्रमण केले आहे. या पोलीस चौकीमुळे तुळजाभवानी मंदिराकडे दर्शनास जाणाऱ्या भाविकांना विनानाकारण अडथळा निर्माण झाला आहे.

अनेक वर्षापासून तुटलेली गंजलेली लोखंडी पोलीस चौकी रोडच्या बाजूस पडून आहे. त्याकडे नगरपरिषद प्रशासनाचे देखील दुर्लक्ष आहे. अनेक वेळा अतिक्रमण कारवाई करणारे पथक आले आणि गेले. पण नगरपालिकेने देखील ही तुटलेली पोलीस चौकी उचलली नाही. तुळजाभवानी मंदिर संस्थांनी दीपक चौकात नवीन आधुनिक फायबरची पोलीस चौकी बसवली आहे. नवीन पोलीस चौकी बसवली पण तुटलेली. चौकी अजून तशीच जागेवर आहे. या चौकीचा सहारा घेऊन आजूबाजूस सर्वत्र अतिक्रमण वाढले आहे.

ही चौकी काढून टाकल्यास फुटपाथ रिकामे होऊन भरपूर प्रमाणात जागा उपलब्ध होऊ शकते.

दीपक चौकातून मंदिराकडे जाणाऱ्या भाविकांना देखील सुटसुटीत रस्ता होऊ शकतो. ही तुटलेली पोलीस चौकीचा लोखंडी खराब चिरलेला पत्रा भाविकांसाठी धोकादायक झाला आहे. भाविकांचे लहान मुले वृद्ध भाविक यांना या चिरलेल्या पत्र्याचा धोका संभावतो.

या पोलीस चौकीच्या अवतीभवती टू व्हीलर पार्किंग देखील केली जाते. तसेच दीपक चौकात असणारे रिक्षा स्टॅन्डचे रिक्षे देखील अस्ताव्यस्त पद्धतीने लावले जातात.

आणि फोर व्हीलर वाहने देखील मोडकळीस आलेल्या चौकीच्या अवतीभवती अस्ताव्यस्त पद्धतीने लावली जातात. तुळजाभवानी देवीच्या दर्शनात जाणाऱ्या भाविकांना सुरळीत आणि अडथळा निर्माण होणार नाही म्हणून प्रशासनाने खबरदारी घेणे आवश्यक असताना पोलीस आणि नगरपरिषदेच्या आंधळेपणाचे जिवंत उदाहरण या दीपक चौकात असणाऱ्या तुटक्या फुटक्या पोलीस चौकीकडे बघितल्यानंतर लक्षात येते.

ही तुटकी फुटकी पोलीस चौकी काढल्यानंतर मोठ्या संख्येने भाविक विनाअडथळा तुळजाभवानी मंदिराकडे जाऊ शकतात. सध्याची परिस्थिती अशी आहे, की टू व्हीलर वाहन आल्यानंतर भाविकांना थोड्यावेळ थांबून नंतर या तुटक्या फुटक्या पोलीस चौकी समोरून जावे लागते.

प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे भाविक भक्तांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

### चालत जाणाऱ्या व्यक्तींसाठी गेटला रखाने करणे आवश्यक

तुळजाभवानी मंदिराकडे टू व्हीलर आणि फोर व्हीलर गाड्या जाऊ नये म्हणून प्रशासनाच्या वतीने भवानी रोड, आर्य चौक आणि किसान चौकीमध्ये रोडवर भले मोठे गेट बसवण्यात आले आहेत. या सर्व रोडला असणाऱ्या गेटला व्यक्ती जाण्यासारखी रखाने केल्यास मोठ्या संख्येने भाविक बंद गेटमधून सुध्दा मंदिराकडे जाऊ शकतात. या सर्व रोडला असणाऱ्या दोन दोन भल्या मोठ्या गेटची डिझाईन बदलून त्याला चालत जाणाऱ्या व्यक्तींसाठी रखाने केल्यास बंद गेट मधून देखील भाविक मोठ्या संख्येने महाद्वार आणि भवानी रोडने जाऊ शकतात. हे रखाने केवळ चालत जाणाऱ्या व्यक्तीसाठी केल्यास वाहने गेट उघडल्यावरच जातील आणि पदचालक भाविक गेट बंद असताना देखील जाऊ शकतील. सध्याची परिस्थिती मध्ये दोन्ही गेटच्या साईडने भाविकांना गर्दीमध्ये लाईन लावून जावावे लागते. गर्दीमध्ये स्थानिक नागरिकांच्या टू व्हीलर गाड्यांची गर्दी आणि भाविकांची गर्दी यामुळे गेटच्या दोन्ही बाजूस विनानाकारण भाविकांची मोठी गर्दी होते. त्यामुळे या भल्या मोठ्या गेटला चालत जाणाऱ्या भाविकांसाठी रखाने करण्याची मागणी भाविकांसह शहरवासीयांमधून होत आहे.

## साडी वाकॅथॉनला महिलांचा प्रतिसाद




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ फेब्रुवारी -**

संस्कृती, शक्ती व एकतेसाठी.. चार पावलं स्वत:साठी हे ब्रीद घेऊन येथील महिला संघटनांनी साडी वाकॅथॉनचे आयोजन धाराशिव शहरांमध्ये केले होते. शहरातील भव्य अशा स्टेडियमवर सकाळी सुरू झालेल्या या साडी वाकॅथॉनची सांगता लकी ड्रॉ च्या भरघोस बक्षीसाच्या माध्यमातून झाली.

साडी वाकॅथॉनच्या उद्घाटनासाठी रोटरीचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर डॉ. सुरेश साबू, विश्व विजेत्या खो-खो संघाची अश्विनी शिंदे, रोटरीचे अध्यक्ष डॉ. श्रीराम जितुरकर, ओस्लाच्या अध्यक्षा किरण देशमाने, डॉ. अनार साळुंखे, डॉ. रेखा ढगे, डॉ. स्मिता गवळी, डॉ. सुलभा देशमुख, डॉ कौशाली राजगुरू, डॉ. श्रद्धा मुळे, सुप्रिया दूधभाते, डॉ. अस्मिता बुरगुटे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

श्रावणी व्यास यांच्या ग्रुपने महिला सक्षमीकरणावर नृत्य सादर केले. यानंतर कार्यक्रमाचे मुख्य अतिथी सुरेश साबू आणि श्रीराम जितूरकर यांनी वाकॅथॉन साठी सज्ज असलेल्या महिलांना हिरवा झेंडा दाखवून सुरुवात केली. पाच किलोमीटर आणि तीन किलोमीटर या अंतरावर असलेल्या या साडी वाकॅथॉनसाठी महिलांनी सकाळच्या प्रसन्न वातावरणात चालून आनंद घेतला. यावेळी संपूर्ण शहरभर भारावलेल्या वातावरणात महिला चालत होत्या. उपस्थित इतर महिलांनीही याचा आनंद घेतला.

ठरवून दिलेल्या किलोमीटर मध्ये वाकॅथॉन पूर्ण करणाऱ्या सर्व महिलांना मेडल घालून आणि फल आहाराची किट भेट देवून स्वागत करण्यात आले. यानंतर जवळपास २५ प्रायोजक लाभलेल्या भेटवस्तू लकी ड्रॉ च्या माध्यमातून उपस्थितांना देण्यात आल्या. संयोजनी ओमप्रकाश राजेनिंबाळकर आणि शुभांगी कैलास पाटील यांच्या हस्ते लकी ड्रॉ मधील विजेत्यांना बक्षीस देण्यात आली. सदरील कार्यक्रम यशस्वीतेसाठी कमल नालावडे, नीता कठारे, डॉ. मीना जिंतूरकर, मेधा चोराखळीकर, स्नेहलता झरकर, शर्मिष्ठा डांगे, वर्षा हंबीरे, शितल कोठारी, डॉ. दीपाली रामढवे, दमयंती साळवी, प्रा.डॉ. पूनम तापडिया, आरती अजमेरा यांचाही यथोचित सन्मान झाला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुनिता गुंजाळ आणि डॉ. श्रद्धा मुळे यांनी केले.

## नॅचरलच्या सेंद्रीय खताच्या माध्यमातून वाढणार मातीची गुणवत्ता

**बी.बी. ठोंबरे यांची माहिती...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ फेब्रुवारी -**



नॅचरल शुगर मध्ये नवनवीन प्रकल्प उभारणी सुरू असून नॅचरलचे प्रेसमड व नेपियर डायजेस्टर मधून उत्पादीत होणाऱ्या स्लरी पासून 'फर्मेंटेड ऑरगॅनिक मॅन्युअर' या सेंद्रीय खताची निर्मिती सुरू केली असून त्याचे वितरण राष्ट्रीय केमिकल्स् अॅण्ड फर्टिलायझर या राष्ट्रीयकृत कंपनीस विक्रीचा शुभारंभ आज धाराशिव आणि लातूर जिल्हयाचे आरसीएफचे वरिष्ठ विपनण अधिकारी यांचे प्रमुख उपस्थितीत करण्यात आल्याचे नॅचरल उद्योग समुहाचे संस्थापक अध्यक्ष बी.बी. ठोंबरे यांनी सांगितले.

या एफओएफ विक्री शुभारंभ कार्यक्रमात पुढे बोलताना बी.बी. ठोंबरे म्हणाले की, आरसीएफ कंपनी मार्फत 'पीएम-प्रणाम' या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात यापुढे सेंद्रीय शेतील प्रोत्साहन देणेसाठी फार मोठया प्रमाणात रासायनीक खत कंपन्यांना सेंद्रीय खत शेतकऱ्यांना पूरवण्याची सक्ती केली असल्याने त्याचाच एक भाग म्हणून नॅचरलचे उत्पादीत 'एफओएम' खत आम्ही आरसीएफ कंपनीस करार करून योग्य व माफक दरात एफओएम हे सेंद्रीय खत पुरवण्याचा संकल्प केला आणि तो आज पूर्ततेस नेल्याचे आवर्जून सांगितले.

पीएम-प्रणाम या उपक्रमाचे उद्दीष्ट म्हणजेच खतांचा शास्वत आणि संतूलीत वापर, पर्यायी खतांचा अवलंब, सेंद्रीय आणि नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देवून पृथ्वी मातेचे आरोग्य वाचवण्यासाठी सेंद्रीय स्लरीचा वापर करून पिकाऊ जमीन उपजाऊ करणे आणि पुढील पिढीस सकस व आरोग्यदायी अन्न धान्य उपलब्ध होईल हा उदात्त हेतू डोळयासमोर ठेवून नॅचर शुगरने सेंद्रीय खत निर्मितीमध्ये पाऊल टाकले असल्याचे ठोंबरे यांनी आवर्जून नमूद केले.

आरसीएफ कंपनीचे धाराशिवचे वरिष्ठ विपनण अधिकारी गणेश खाडे यांनी रासायनिक खता बरोबर सेंद्रीय खतांचा वापर करून जमिनीचा पोत वाढला नाही तरी टिकवून ठेवण्यासाठी तरी सेंद्रीय खत वापर करण्याचे उपस्थितांना आवाहन केले.

## युवकाला मारहाण; भुममध्ये गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ फेब्रुवारी -**

अग्नीशामक कार्यालयासमोर किरकोळ वादातून झालेल्या हाणामारीत एका व्यक्तीला गंभीर मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी भुम पोलीस ठाण्यात विक्की गौतम जावळे (रा. भुम) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि.८ फेब्रुवारी रोजी दुपारी १.१५ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी जितेंद्र महादेव शिंदे (वय ४०, रा. भिमनगर, भुम) हे अग्नीशामक कार्यालयासमोरून जात असताना आरोपी विक्की जावळे याने त्यांच्या मोटरसायकलबाबत वाद घातला. त्यानंतर शिवीगाळ करत मोटरसायकलच्या चैनने त्यांना मारहाण केली. या मारहाणीत जितेंद्र शिंदे जखमी झाले.

या घटनेची माहिती मिळताच भुम पोलिसांनी फिर्यादीच्या तक्रारीवरून भारतीय दंड संहिता कलम ११८(१) आणि ३५२ नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास भुम पोलीस करत आहेत.



### आश्रम शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.९ फेब्रुवारी -**

येथील जय तुळजाभवानी माता केंद्रीय प्रशाला आश्रम शाळेत सामाजिक कार्यकर्ते जयकुमार पांढरे यांच्या वतीने विजय गंगणे यांच्या वाढदिवसाच्या औचित्य साधून पत्रकार संघाचे अध्यक्ष सचिन ताकमोघे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आला.

मोलमजुरी करून उपजीविका भागवणाऱ्या पालकांचे पाल्य आणि अनाथ मुलांना शैक्षणिक मदत व्हावी म्हणून पांढरे यांनी वाढदिवसाचा अतिरिक्त खर्च टाळून हा कौतुकास्पद उपक्रम राबवला. यावेळी जयकुमार पांढरे, विशाल शिंदे, चेतन खंडागळे, अमित मोरे, अनुप लोखंडे, यश धाकतोंडे, बालाजी पानढवळे, गोविंद गायकवाड यांच्यासह वंदे मातरम मित्र मंडळ आणि विजय गंगणे मित्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. तर यावेळी शाळेचे मुख्याध्यापक एस.एस. गरड, वाय.एम. सोमवारे, जी.एच. पवार, एल.व्ही. जाधव, एम.एस. लोखंडे, व्ही.एस. शीलवंत, बी.जे. डोलारे, पाटील मामा, राठोड मामा आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# नळदुर्ग-अक्कलकोट रस्त्याच्या दुरुस्ती कामास अखेर सुरुवात

**आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नांना यश**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.९ फेब्रुवारी -**



अपप्रवृत्तीमुळे अनेक वर्षांपासून प्रलंबीत राहिलेल्या नळदुर्ग-अक्कलकोट रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाचा शुक्रवारी दि.७ फेब्रुवारी रोजी शुभारंभ झाला. अनेक वर्षापासून रखडलेला हा विषय आता मार्गी लागला असून या रस्त्यावर ये-जा करणारे गावातील नागरिक, अक्कलकोटला जाणारे भाविक व नळदुर्गला भेट देणाऱ्या पर्यटकांना त्यामुळे मोठा दिलासा मिळणार असल्याचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी देवीचे दर्शन घेऊन तुळजापूरहुन नळदुर्ग-अक्कलकोट महामार्गावरून अक्कलकोटकडे स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी भाविक या रस्त्याचा वापर प्राधान्याने करतात. पर्यटक देखील नळदुर्गचा ऐतिहासिक किल्ला पाहण्यासाठी याच मार्गाने ये-जा करतात. या भागातील गुजनुर, दहिटना, शहापूर, गुळहळी, निलेगाव, वागदरी, देवसिंगा (नळ), पाटील तांडा, खुदावाडी, येडोळा येथील विद्यार्थी, व्यापारी, शेतकरी, राज्य व परराज्यातील भाविक भक्तासह या परिसरातील नागरिकांना नळदुर्गला जाण्यासाठी हाच मार्ग वापरावा लागतो. या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने प्रवासी वर्गांना रस्त्यावरून ये-जा करताना मोठी कसरत करावी लागत असून दिवसेंदिवस अपघाताचे प्रमाणही वाढले आहे.

कांही अपप्रवृत्तीचे लोक शेतकऱ्यांची दिशाभूल करून नळदुर्ग-अक्कलकोट रस्ता दुरुस्तीच्या कामात जाणीवपूर्वक वारंवार अडथळे आणण्याचा प्रयत्न करत आहे. सदर प्रकरण अनेक वर्षे न्यायालयीन प्रकियेत अडकल्याने रस्त्याची दुरुस्ती होऊ शकली नाही. परिणामी या रस्त्यावर प्रवास करणाऱ्या ग्रामस्थांना व प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. हा विषय मार्गी लावण्यासाठी न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सध्या अस्तित्वात व वापरात असलेल्या रस्ता दुरुस्तीचा मार्ग आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी सुचविला होता. अधिकची जागा व त्यांचा मोबदला हा विषय स्वतंत्र ठेवून अनेक वर्षांपासून वापरात असलेल्या रस्त्याची उपलब्ध रुंदी कायम करून दुरुस्तीचे काम हाती घेण्यास उच्च न्यायालयानेही मान्यता दिली होती. त्या अनुषंगाने आपण केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नातून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी रुपये ४ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला.

सुमारे १०.८० किमी. लांबीच्या रस्त्यासाठी निविदा प्रक्रिया पुर्ण करुन ७ मार्च २०२४ मार्चला कामाचा कार्यरंभ आदेशही निर्गमीत करून दुरुस्तीला सुरुवात केली होती. मात्र ठराविक व्यक्तींच्या विरोधामुळे पुन्हा दुरुस्तीचे काम थांबवण्यात आले होते. ते आता पुन्हा वेगात सुरू करण्यात आले असल्याचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## आधुनिक शेती व यांत्रिकीकरण जोपासणे गरजेचे : कांबळे

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.९ फेब्रुवारी -**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तिसरे राज्यस्तरीय कृषिप्रदर्शन ळलातूर येथील मारवाडी राजस्थान प्रांगण येथे सुरू असून या ठिकाणी दररोज शेतकऱ्यांना विविध विषयांवर तज्ञांचे मार्गदर्शन होत आहे. त्याअंतर्गत आज दुसऱ्या दिवशी नीतीन कांबळे, तालुका कृषी अधिकारी रेणापूर यांनी शेतकऱ्यांनी पारंपारिक



शेतीपद्धती सोडून आधुनिक शेती व नवनवीन तंत्रज्ञान वापरणे गरजेचे असल्याचे प्रदीपदन केले. यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सरचिटणीस व शेतकरी सेनेचे प्रदेशाध्यक्ष संतोष नागरगोजे, जिल्हासंसाधन व्यक्ती धनंजय पवार, जिल्हाध्यक्ष डॉ. नरसिंह भिकाने, शेतीतंत्रज्ञान तज्ञ संदीप हाराळे, मनोज अभंगे, भागवत कांदे, रोजगार स्वयंरोजगार राज्य सचिव सचिन सिरसाट, मनवीसे जिल्हाध्यक्ष किरण चौहान, प्रीती भगत, शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष पांडुरंग कदम, बाळासाहेब मुंडे, रणवीर उमाटे आदी उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...



### हणमंतराव पाटील यांचा सेवापूर्तीनिमित्त गौरव

**दैठणा, दि.९ फेब्रुवारी -**

दैठणा (ता. शिरूर अनंतपाळ) येथील रहिवासी हणमंतराव विश्वनाथराव पाटील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक हे मुंबईच्या आर्थिक गुन्हे शाखेतून ३३ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्याबद्दल पाटील परिवारातर्फे साई भवन मंगल कार्यालय शिरूर अनंतपाळ येथे त्यांचा गौरात्मक सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास अण्णाराव पाटील, गणेश पाटील, ॲड. केशव पाटील, विठ्ठलराव पाटील, शीला पाटील, मंगलबाई पाटील व सत्कारमूर्ती हणमंतराव पाटील, पुष्पा पाटील यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती. पाटील परिवारातील ॲड. विनयकुमार नकाते, वर्षा पाटील, पंकज पाटील, वीना पाटील, श्रीनिवास पाटील यांनी हणमंतराव पाटील यांच्या कार्याचा आपल्या मनोगतातून आढावा घेऊन भावना व्यक्त केल्या. सूत्रसंचालन देवदत्त मुंढे यांनी केले. तर आभार अमोल पाटील यांनी मानले.



### शारदा स्कूलमध्ये रमाई आंबेडकर जयंती साजरी

**लातूर, दि.९ फेब्रुवारी -**

रॉयल एज्युकेशन सोसायटी संचलित शारदा सेमी इंग्लिश स्कूलमध्ये संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एम.आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी माता रमाई आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रारंभी माता रमाई यांच्या प्रतिमचे पूजन करण्यात आले. स्कूलचे प्राचार्य लक्ष्मण पुरी व माध्यमिक विभागाचे शिक्षक महेश सोनवणे यांनी रमाई आंबेडकर यांच्या जीवन कार्यालया उजाळा दिला. पूर्व प्राथमिक विभागाच्या शिक्षिका वर्षा कांबळे यांनी रमाई यांच्या जीवनाविषयी गीत सादर केले. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख दर्शना बोराडे यांनी तर प्रास्ताविक लिंबराज गायकवाड यांनी केले. आभार रोहिणी कदम यांनी मानले. यावेळी मुख्य समन्वयक अनघा पाटील, मानसी पाटील, अश्विनी पवार, रेणुका समुद्रे, समन्वयक रोहित जाधव आदी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



### संगमेश्वर विद्यामंदिरचे स्नेहसंमेलन उत्साहात

**लातूर, दि.९ फेब्रुवारी -**

शहरापासून जवळच असलेल्या आर्वीच्या सोमवंशीनगरातील संगमेश्वर युवक मंडळ संचलित संगमेश्वर प्राथमिक विद्यामंदिरचे 'जल्लोष-२०२५' वार्षिक स्नेहसंमेलन बुधवारी उत्साहात पार पडले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी अधिकारी एन. एम. जाधव उपस्थित होते. अध्यक्षस्थानी राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी.एन. केंद्रे होते. मंचावर राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, संस्थेचे सहसचिव प्राचार्य राजेंद्र जायेभाये व संस्थेच्या कोषाध्यक्ष मुख्याध्यापिका कविता केंद्रे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक मुख्याध्यापक ए.बी. पवार यांनी तर सूत्रसंचालन ए.व्ही. माने यांनी केले. यशस्वितेसाठी जी.बी. मोरे, जे.जी. कावळे, डी.पी. दिवटे, एन.आर. मुंडे, आर.व्ही. डुकरे, डी.एस. भदभदे आदींनी परिश्रम घेतले.

# पुण्यातील विश्व मराठी संमेलनात लातूरच्या बालकलाकारांचा बोलबाला

## बालरंगभूमी परिषद लातूर शाखेच्या माध्यमातून ज्ञानप्रकाश संगीत विद्यालयाचा उपक्रम...

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.९ फेब्रुवारी -**

महाराष्ट्र शासनाच्यावतीने ३रे विश्व मराठी संमेलन पुणे येथे आयोजित करण्यात आले होते. यात जगभरातून मराठी माणसे सहभागी झाली होती. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, खासदार, आमदारांसह अनेक विशेष निमंत्रित मान्यवर साहित्यिक, कलाकार, युट्युबर्स व भाषाप्रेमी विविध सत्रामध्ये मंचावर सहभागी होते.

तीन दिवस चाललेल्या या संमेलनात एक सत्र बालरंगभूमी परिषदेसाठी देण्यात आले होते. त्यात वरील दिग्गजांच्या रांगेत लातूरचे २५ बाल तबलावादक सहभागी झाले होते.

असा सामूहिक तबला वादनाचा अनोखा अनुभव पुणेकरांनी पहिल्यांदाच घेतला. ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्प द्वारा संचलित, ज्ञानप्रकाश संगीत विद्यालयाचा हा उपक्रम होता. मयूर येणगे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या त्यांच्या शिष्यानी पुण्यात विश्व



मराठी संमेलनात लातूरचा झेंडा दिमाखात रोवला आहे.

लातूरच्या या कलाकारांना बालरंगभूमी परिषदेच्या महाराष्ट्राच्या अध्यक्षा ॲड. निलम शिर्के व उपाध्यक्ष ॲड. शैलेश गोजमगुंडे यांच्या प्रयत्नातून ही संधी मिळाली. आणि मिळालेल्या संधीचं मुलांनी सोनं केले. या प्रसंगी सिने अभिनेते प्रविण तरडे, भाषा विभागाचे संचालक डॉ. शंकांत देवरे यांनी तबला वादनानंतर स्वतः हून मुलांशी संवाद साधला. त्यांचं कौतुक केले. या उपक्रमासाठी येणगे यांना सागर कोळी, अतुल जाधव, जीवन पांचाळ, अमोल शिंदे यांनी सहकार्य केले.

या उपक्रमाचे सर्वदूर कौतुक होत असून ज्ञानप्रकाशचे सतीश नरहरे, मुख्याध्यापिका सविता नरहरे, अशोक गुरधाळे, वनिता गोजमगुंडे, बालरंगभूमी परिषद लातूर शाखेच्या अध्यक्षा सुमती सोमवंशी, मयूर राजापूरे, प्रा. नवलाजी जाधव, हिरा वेदपाठक, सुवर्णा बुरांडे, रवी आघाव, श्री रणजित आचार्य, ॲड. बालाजी म्हेत्रे यांनी अभिनंदन केले आहे.

## स्वयंम शिक्षण प्रयोग संस्थेमार्फत महिलांची सेंद्रिय शेतीस भेट



**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.९ फेब्रुवारी -**

स्वयंम शिक्षण प्रयोग संस्था लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने व एक्सीस बँक फाऊंडेशनच्या अंतर्गत तालुक्यातील शेती संलग्न महीलांना व्यावसायिक बनवण्यासाठी महीलांना घडविण्यासाठी महिला स्वावलंबी बनवण्यासाठी सहा दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येत आहेत.


प्रशिक्षणाच्या सातव्या दिवशी रविवार दि.९ फेब्रुवारी रोजी देवणी तालुक्यातील जवळगा, धनगरवाडी, बोळेगाव आदी गावातील प्रशिक्षणार्थी महीलांना सेंद्रिय शेती करणारे तालुक्यातील महादेववाडी येथील शेतकरी ओमकार मसकल्ले यांच्या शेतीस भेट देण्यात आली. या उपस्थित महीलांना मार्गदर्शन कृषी भुषण पुरस्कार प्राप्त ओंमकार मसकल्ले यांनी मत्स्य व्यवसाय, बायोगॅस, गांडुळ खत, जिवामृत, अग्नी अस्त्र, ब्रम्हास्त्र, अंडासंजिवन आदींची सखोल माहीती दिली.

यावेळी अक्रम शेख, अहेमद पठाण, महेंद्र काळे, अजमत पठाण, विष्णू चामले, ज्योत्सना पोलकर व प्रशिक्षणार्थी महिला उपस्थित होते.

## संस्काराचा पहिला वर्ग आई : डॉ. रामकृष्ण बदने

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.९ फेब्रुवारी -**

आई वात्सल्याचा सागर आहे. आई वडिलांच्या सेवेत खऱ्या अर्थाने स्वर्ग आहे.



सामान्य माणसाबरोबरचं संत व महापुरुषांच्या जडणघडणीत आईचा सिंहाचा वाटा राहिलेला आहे. शाळेतून आपण शिक्षण घेत असलो, तरी लहानपणी शिस्त लावण्याचे काम आई वडील करीत असतात. एका अर्थाने संस्काराचा पहिला वर्ग आईचं आहे, हे विसरून चालणार नाही असे विचार प्रमुख वक्ते डॉ. रामकृष्ण बदने यांनी व्यक्त केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने बामणी ता उदगीर येथे बहि:शाल व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच राजकुमार बिरादार तर मंचावर ग्रामीण महाविद्यालय वसंतनगर येथील हिंदी विभागातील प्रा.डॉ. रामकृष्ण बदने, प्रमुख डॉ. दत्ताहरी होनराव उपस्थित होते. समाजात मूल्य विचार रूजावेत. महामानवांच्या विचाराचा जागर व्हावा, या उद्देशाने सदरील व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रास्ताविकात डॉ. दत्ताहरी होनराव यांनी सांगितले. प्रमुख मार्गदर्शकांचा परिचय प्रा. शिवकुमार उस्तुरर्गे यांनी करून दिला. पुढे बोलताना डॉ. बदने म्हणाले, आईसमोर नतमस्तक झाल्यास कधीच अपयश येणार नाही. उपनिषदापासून तर अलीकडच्या एकविसाव्या शतकातील सगळ्यात साहित्यिकांनी आईविषयी भरभरून लिहिलेले आहे, असे सांगत त्यांनी संत ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा तसेच प्रासंगिकता लक्षात घेऊन अनेक उदाहरणे देत श्रोत्यांना अंतर्मुख केले.

यावेळी डॉ. मनोहर भंडारे, डॉ. विठ्ठल गोरे, डॉ. अमित कवठाळे, ग्रंथपाल प्रा. अजित रंगदळ, गावातील ग्रामपंचायत सदस्य नागरिक व महिला उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. वीरभद्र बिरादर तर आभार डॉ.म.ई. तंगावार यांनी मानले.

### युवा स्वयंसेवक पदासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर, दि.९ फेब्रुवारी -** केंद्र शासन व राज्य शासन संयुक्त विद्यमाने राज्यात ग्रीस्टॅक संकल्पनेच्या अंतर्गत डिजिटल क्रॉप सर्वे करण्यात येणार आहे. या कार्यासाठी नेहरू युवा केंद्र मार्फत कमीत कमी १५ दिवस व जास्तीत जास्त ३ महिने कालावाधीसाठी प्रति महिना रुपये ५ हजार मानधन तत्वावर राष्ट्रीय युवा स्वयंसेवकाची नियुक्ती करण्यात येणार आहे.

## उदगीर येथे विश्व मराठी साहित्य संमेलन घेणार : संजय बनसोडे



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.९ फेब्रुवारी -**

आपले उदगीर हे शिक्षणाच्याभुमी बरोबरच आता साहित्य व सांस्कृतिक नगरी म्हणुन संबंध महाराष्ट्रात ओळख निर्माण झाली आहे. गेल्या ५ वर्षात विविध साहित्य संमेलने ही उदगीरला झाली. यामध्ये या नगरीमध्ये मराठवाडा साहित्य संमेलन, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यशस्वीपणे संपन्न झाले. भविष्यामध्ये उदगीर येथे विश्व मराठी साहित्य संमेलन घेणार असल्याची घोषणा माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनी केली आहे.

यावेळी संमेलन अध्यक्ष इंद्रजीत भालेराव म्हणाले की, मराठवाड्यात माजी मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख यांच्यानंतर सर्वस्तराचा विकास करण्यामध्ये कल्पक बुद्धिमत्तेचा राजकीय नेता म्हणून आमदार संजय बनसोडे यांचे कार्य दिसून येत आहे. बौद्धिक विकासाबरोबरच शैक्षणिक व साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्राला बळ देण्याचे त्यांचे काम हे जाणीवेच्या पुढचे असुन नेहमी साहित्याला पाठबळ देणारे आ. बनसोडे आहेत.

### संस्कृती मंडळ व रंगकर्मीच्या साहित्य संमेलनाचे उद्घाटन संपन्न

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व रंगकर्मी साहित्य, कला, क्रीडा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी महाविद्यालयात आयोजित तिसरे लोकसंस्कृती साहित्य संमेलनाच्या उद्घाटन समारंभात ते उद्घाटक म्हणून बोलत होते. प्रसिद्ध साहित्यिक प्रा. इंद्रजीत भालेराव अध्यक्षस्थानी होते. यावेळी सिने अभिनेत्री अदिती सारंगधर, उर्मिला डांगे, अभिनेते चंद्रशेखर सांडवे, स्वागताध्यक्ष बस्वराज पाटील नागराळकर, कार्यवाह रामचंद्र तिरुके, साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य मार्तंड कुलकर्णी, भारत सातपुते, विलास सिंदगीकर, सतीश उस्तुरे, प्राचार्य रामकिशन मांजरे, रमेश अंबरखाने, बाळासाहेब पाटोदे, अनिल मुदाळे, जॉनीमीया सय्यद, फैयाज शेख, ॲड. वर्षा कांबळे आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.

वृंदावनातील तुलसीला जल अर्पण करून या साहित्य संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. या साहित्य संमेलनासाठी सकाळी आठ वाजता अण्णाभाऊ साठे चौकातून भव्य ग्रंथ दिंडी काढण्यात आली. त्यानंतर भव्य चित्र प्रदर्शन, पुस्तक विक्रीच्या स्टॉलचे उद्घाटन,फॅशन डिझाईन कलाकृतीच्या स्टॉलचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या संमेलनाच्या यशस्वितेसाठी रंगकर्मी साहित्य, कला, क्रीडा प्रतिष्ठाणचे अध्यक्ष प्रा.बिभीषण मद्देवाड, सचिव प्रा.ज्योती मद्देवाड, उपाध्यक्ष सिध्दार्थ सुर्यवंशी, रामदास केदार, रसुल पठाण, लक्ष्मण बेंबडे, महादेव खळुरे, मारोती भोसले, बाबासाहेब मादळे, सचिन शिवशेट्टे, संदीप निडवदे, नागनाथ गुट्टे, हणमंत केंद्रे, आकाश कवडेकर, ज्ञानेश्वर बडगे, चंद्रदीप नादरगे, जहाँगीर पटेल, ॲड. महेश मळगे, निवृत्ती जवळे, प्रल्हाद येवरीकर, अंजली स्वामी, निता मोरे, विवेक होळसंबरे, विक्रम हलकीकर आदींनी परिश्रम घेतले.

यावेळी चित्रप्रदर्शन, हस्तकला प्रदर्शन, ग्रंथाचे विविध स्टॉल उभारण्यात आले होते.

## पानगावात विविध स्टॉलच्या माध्यमातून बालविकासाचे धडे

### बाल विकासासाठी आकर्षण ठरले २२ स्टॉल

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.९ फेब्रुवारी -**

प्रत्येक बालकांची जन्मतः वाढ व विकासाची क्षमता ही आगळीवेगळी आसते म्हणून बालकांच्या सर्वांगीण विकासात पालकांचा सहभाग अत्यंत महत्वाचा असतो म्हणून पानगाव येथे एकात्मिक बाल विकास सेवा योजना रेणापूर वतीने दि.८ फेब्रुवारी रोजी एक आगळा वेगळा पालक मेळावा घेऊन पालकांना विविध सस्टॉल मधुन बालकांच्या विकासाचे धडे देण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने उप सरपंच प्रेमाला वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी



प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामपंचायत सदस्या रंजना गालफाडे, अंगणवाडी पर्यवक्षिका उज्वला देशपांडे, ग्राम बाल संरक्षण समितीचे बाबा हलकुडे, कलापंढरी संस्थेचे मधुकर गालफाडे, ए.बी. सुर्यवंशी, एस.आर. बनसोडे, के.डी. नागीमे आदींची उपस्थिती होती.

आयोजीत पालक मेळाव्यात पालकांना बालकांच्या विकासाच्या दृष्टीकोणातून काय आणि कोणत्या साहीत्याची गरज महत्वाचे आहे. कोणती साधने बालकांच्या विकासाला पोषक ठरतात, कोणती क्र ती बालकांच्या विकासाला चालना देते आदी विषयाचे एकूण २२ स्टॉलची मांडणी करण्यात आली होती. आणि या स्टॉलला माता पालकांनी भेट देतात प्रत्येक अंगणवाडी कार्यकर्ती प्रत्येक स्टॉल बालकांच्या विकासाला कसे पोषक आहेत. यातून बालकांचा कसा विकास होते. या विषयी सविस्तर माहिती सांगितली जात होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सुनिता आरडले यांनी केले. तर आभार ग्रामबाल संरक्षण समितीच्या सचिव कालींदा आचार्य यांनी मानले.

# लातूर जिल्ह्यातील १५०० विद्यार्थ्यांचा 'महाआकाश दर्शन'मध्ये सहभाग

## अबब...चंद्रावर माझे वजन एवढे कमी! विद्यार्थ्यांना वाटले कुतूहल



**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.९ फेब्रुवारी -**

आकाशामध्ये एकूण पाच ग्रह एका रेषेत येत आहेत, ही ऐतिहासिक खगोलीय घटना विद्यार्थ्यांना पाहता यावी, यासाठी जिल्हा परिषदेचा प्राथमिक शिक्षण विभाग आणि लातूर स्टीम एज्यूकेशन सेंटरच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी राजस्थान विद्यालाच्या प्रांगणामध्ये 'महाआकाश दर्शन २०२५' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आकाशातील विविध ग्रह, तारे यांची माहिती घेताना आपल्या मनात डोकावलेले प्रश्न विचारून त्याबाबत माहिती जाणून घेतली. एका विद्यार्थ्याने चंद्राविषयी माहिती जाणून घेतला 'अबब...चंद्रावर माझे वजन एवढे कमी!' असे म्हणत त्याला वाटलेल्या कुतूहलातून चंद्राविषयी अधिक माहिती जाणून घेतली. शालेय विद्यार्थ्यांसाठी खगोलशास्त्र आणि आकाश निरीक्षणाच्या मूलभूत संकल्पनांची ओळख व्हावी, या हेतूने 'महाआकाश दर्शन २०२५' उपक्रमांतर्गत आकाश निरीक्षण आणि खगोलशास्त्रीय व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. विश्वाची निर्मिती कशी झाली, विश्वात कोणकोणते घटक आहेत, विश्वातील आपले स्थान काय, पृथ्वीबाहेर जीवसृष्टी असण्याची शक्यता किती आहे, याबाबत स्लाईड शोच्या माध्यमातून माहिती कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात देण्यात आली. त्यानंतर लेझरच्या सहाय्याने तारकासमूहांची ओळख आणि टेलिस्कोपच्या सहाय्याने विविध ग्रह आणि चंद्र दाखवण्यात आले. अत्याधुनिक प्लॅनेटोरियम डोम (तारांगण) सोबत, विविध ग्रहावरील मानवीय वजन पाहणे यासह वैज्ञानिकांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करण्यात आले.

या उपक्रमात जिल्हाभरातून सुमारे १५०० विद्यार्थ्यांसह पाच ते सात हजार नागरिकांनी 'महाआकाश दर्शन २०२५' उपक्रमाला भेट दिली. प्रारंभी जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. राजस्थान विद्यालय शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष लक्ष्मीकांत कर्वा, प्रा. शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, मा. शिक्षणाधिकारी नागेश मापारी, स्टीम एज्युकेशन सेंटरचे अध्यक्ष ओमप्रकाश झुरूळे, खगोलशास्त्रज्ञ मयुरेश प्रभूणे, राम स्वामी, अमोल चव्हाण, प्रमोद भोयेरेकर, विजय सहदेव, स्टीम एज्यूकेशन सेंटरच्या प्राचार्य उमा माने, रूपा सिरसेकर, राजस्थान मुख्याधापक खरोसेकर यावेळी उपस्थित होते. महाकुंभ पर्वामध्ये पाच ग्रह एकाच रेषेत येण्याचा ऐतिहासिक क्षण जिल्हा परिषद शाळेच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दाखवण्यासाठी आयोजित या उपक्रमाचे जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी सागर यांनी कौतुक केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अंगद महानुरे, सुनिल राजुरे, दत्तात्रय माळकर, चंद्रकांत ठाकरे, स्टीम एज्यूकेश सेंटरचे कर्मचारी, माउंट कार्मेल इंटरनॅशनल स्कूलचे कर्मचारी, मारवाडी राजस्थान विद्यालयाचे सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com




नांदेड-नांदेड ते देगलूर ट्रान्सपोर्टचे साहित्य घेऊन जात असलेल्या एका ट्रकला धनेगाव येथे आग लागल्याची घटना आज दि. ९ फेब्रुवारी रोजी पहाटे ३ च्या सुमारास घडली. या आगीत ट्रकमधील फ्रीज, बॅटरी, इन्वर्टर, ड्राय फ्रुट, खाद्य तेल, स्टेशनरी साहित्य, औषधी आदी साहित्य जळून खाक झाले. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेत आग विझवली.

# इंस्टाग्रामवर पोस्ट केल्याने अल्पवयीन मुलांकडून अपहरण करून मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ फेब्रुवारी**

इन्स्टाग्रामवर पोस्ट का टाकला असे म्हणत पत्रकार शेख याहीया यांच्या मुलाचे अपहरण करून त्यास मारहाण करण्यात आल्याची घटना दि. ८ फेब्रुवारी रोजी उघडकीस आली. या प्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



शहरातील फारूखनगर येथिल फैज-उलुम हायस्कुमध्ये शिकणारा शेख इम्रान शेख याहिया याने इन्स्टाग्रामवर शहरातील पिर बुऱ्हान येथिल युसूफिया हायस्कूलमधील दहावीत शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याच्या इंस्टाग्राम पेजवर पोस्ट केली होती. या पोस्टचा राग मनात धरून युसूफिया हायस्कूलमधील मुलाने आपल्या तीन साथीदारांसह फारूखनगर येथून शेख इम्रान याचे अपहरण केले. नवी आबादी, लेबर कॉलनी या ठिकाणी नेऊन त्यास थापड बुक्याने मारहाण करण्यात आली. याच दरम्यान शेख इम्रान यांने प्रसंगावधान दाखवत भावाच्या मोबाईलवर इंस्टाग्राम आयडी असल्याचे सांगत त्यांच्याकडून मोबाईल घेतला व आपल्या भावाला संपर्क केला. भावाला संपर्क केल्यानंतर त्याचा भाऊ शेख अजहर व त्याचे वडील शेख याहिया यांनी शहरात विविध ठिकाणी त्याचा शोध घेतला. शेवटी स्नेहनगर येथील पोलीस पेट्रोल पंपाजवळ त्यांना तीन अल्पवयीन मुलांच्या तावडीत त्यांचा मुलगा शेख इम्रान आढळून आला. याप्रकरणी शेख अजहर शेख याहिया यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विमानतळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेख इम्रानचे अपहरण करून मारहाण करणारे तिन्ही अल्पवयीन मुले युसूफिया शाळेत इयत्ता दहावीत शिकणारे विद्यार्थी आहेत तर त्यापैकी एकाच्या इंस्टाग्राम प्रोफाइल आयीडीवर ३०२ असे लिहिण्यात आलेले आहे.

दरम्यान शहरात अल्पवयीन मुलांकडून हाणामारीच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत आहेत. नुकतेच शहरातील आनंदनगर चौकातील राज मॉल येथे अल्पवयीन मुलांनी एकाचा खून केला होता. ही घटना ताजी असतानाच पुन्हा अपहरणाचा प्रयत्न करून मारहाण करण्यात आल्याची घटना घडल्याने खळबळ उडाली आहे.

## संक्षिप्त वृत्त



### जिल्हा स्काऊट गाईड मेळाव्यात श्री संत गाडगे महाराज प्राथमिक शाळेचा जिल्ह्यात प्रथम

**लोहा-**भारत स्काउट्स आणि गाईडस जिल्हा कार्यालय नांदेड व जिल्हा परिषद शिक्षण विभाग नांदेड यांच्या वतीने जिल्हास्तरीय ५० वा जिल्हा मेळावा ४ ते ७ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा वाघाळा, नांदेड येथे आयोजित करण्यात आला होता. यांमध्ये विद्यार्थ्यांना निसर्ग सानिध्याचा अनुभव, स्वयंशिस्त व स्वावलंबन अशा गुणांचा विकास होण्यासाठी मेळाव्यात श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटी कंधारचे , श्री संत गाडगे महाराज प्राथमिक शाळा,लोहा चे स्काऊट व गाईड पथक सहभागी झाले होते.या शाळेने शोभा यात्रा व लेझीम स्पर्धेतून जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.या जिल्हा मेळाव्यात तंबू उभारणी, तंबू सजावट,संचलन, लेझीम,बँड स्पर्धा, चित्रकला, योगासने,शोभा यात्रा,बिन भांड्याचा स्वयंपाक, स्किल ओ रामा, असे विविध उपक्रम घेण्यात आले होते. स्काऊट्स आणि गाईडसच्या या यशाबद्दल श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटी कंधारचे अध्यक्ष प्रा. डॉ. पुरुषोत्त धोंडगे , सचिव भाई गुरुनाथरावजी कुरुडे , सहसचिव ड.मुक्तेश्वररावजी धोंडगे ,शाळेचे अध्यक्ष भाई किशनराव पाटील ढगे , उपाध्यक्षा सौ.जयक्रांतीताई अशोकराव गवते, मुख्याध्यापक एस.आर. लुंगारे सह शाळेतील सर्व शिक्षकवृंदानी यशाबद्दल अभिनंदन केले.

### माता रमाई आंबेडकर यांना सामाजिक राजकीय संघटनेकडून विनम्र अभिवादन

**उमरी-**राजकीय सामाजिक रंजल्या गांजल्याचे उद्धारक राजकीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी त्यागमुर्ती रमाई माता आंबेडकर यांच्या जयंती निमित दि ७ फेबुवारी २०२५ रोजी विविध ठिकाणी जयंती साजरी करून विनम्र अभिवादन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे आयोजक संजीव विठ्ठलराव सवई , नगरसेवक ईश्वर सवई या समाज बांधवाने केली आहे. दि.७ फ्रेबुवारी रोजी सकाळी नगर परिषद जवळील आंबेडकर चौक येथे मुख्यधिकारी डॉ निलम कांबळे , माजी रेल्वे स्टेश मास्तर पवार, वरिष्ट न .पा . लिपीक गणेश मदणे , सुरेश हानवते पळसगावकर, गौतम सोनफळे , अंकुश सवई . आकाश खंदारे, श्रीकांबळे , आदी नगरपरिषद कर्मचारी व सामाजिक कार्यकर्ते यांच्या वतीने माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून अभिवादन करण्यात आले त्या नंतर नगरसेवक ईश्वर सवई , नगरसेवक रतन खंदारे, नगरसेक प्र सोनू वाघमारे , माजी उपनगराध्यक्ष अनिल सोनकांबळे , माजी नगरसेक राजेश सवई यांच्या हस्ते पंचशिल ध्वजारोहन करण्यात आले आणि त्रिवार वंदन करण्यात आले आहे. यावेळी उपस्थित माता रमाई आंबेडकर जयंती निमित्त जमलेल्या उपस्थित मान्यवर व चाहत्यांना अल्पहार देण्यात आले आहे. उमरी पेट्रोल पंप भोकर - उमरी रोड वर आंबेडकर चौकात माता रमाई जयंती निमित नगरसेवक ईश्वर सवई यांच्या उपस्थित सामाजिक जळवळीचे नेते डी जी तुपसाखरे यांच्या हस्ते पंचशिल ध्वजारो करण्यात आले आहे . या कार्यक्रमास माहिती अधिकार तालुकाधक्ष संदिप गोवंदे , भिमटागर जिल्हाध्यक्ष स्वप्नील भोसीकर , वंचितचे संदेश गायकवाड सिंधीकर , बालाजी देवके, संदिप लांडगे, राहूला खंदारे, निर्भीड कैलास सोनकांबळे, पत्रकार प्रशांत जोंधळे , अशोक झडते ,मोकंपले . किशोर कवडीकर, बापुराव रिठ्ठेकर , पांडूरंग सोनकांळे , ईश्वर रणनवरे ,प्रदिप जोधंळे , राहुल सोनकांबळे , प्रकाश कार्लेकर , त्रिरत्न सवई , वसंत सवई, साहेबराव तुरेराव, आनंदा पवार, आदी सह समाज बांध मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### पंढरी भद्रे यांची सब इन्स्पेक्टर पदी पदोन्नती

**नायगाव-**भारतीय देशाच्या भुदला वरील सुरक्षा विभागातील सीआरपीएफ मध्ये समाविष्ट होऊन देशसेवेत अहोरात्र योगदान देणारे, तालुक्यातील



बेटकबिलोली येथील नामवंत किर्तीवंत पंढरी शिवलिंग भद्रे ३२ वर्ष सेवा पुर्ण करुन नुकतीच पदोन्नती होऊन सब- इंस्पेक्टर पदी नियुक्ती झाली आहे, त्याअनुषंगाने बेटक बिलोलीतील अशोक गायकवाड , मंगेश हानवटे , यशवंत डूमणे , नागोराव डूमणे, संजय भद्रे, विनोद डुमणे, रवि थोरात, दिलीप मोरे, जगदीश वंजारे, सतिष कांबळे,बाबुराव झगडे, रमेश भद्रे,प्रकाश सोनकांबळे, राहूल झगडे, बालाजी हानवटे, राहुल इंगळे, सुनील पोटफोडे, कामाजी झगडे, राजेंद्र वाघमारे, राजरत्न जोंधळे, प्रमोद घंटेवाड, प्रदिप राक्षेसमारे,रूपेश गायकवाड, सिद्धार्थ गायकवाड, अजय डुमणे सह आदि प्रतिष्ठित नागरिकांच्या वतीने सन्मान व सत्कार करुन देशाच्या रक्षणासाठी निस्वार्थ पणे कर्तव्य बजावल्याबद्दल मनस्वी अभिनंदन करुन पुढील कार्यास यावेळी शुभेच्छा देण्यात आल्या.

### दत्तराम पाटील जाधव यांचे निधन

**उमरी-**उमरी तालुक्यातील बितनाळ येथिल जेष्ट शेतकरी नागरीक दत्तराम रामजी पाटील जाधव यांचे दि ७ फ्रेबुवारी २०२५ रोजी सायंकाळी



६ वाजता वृद्धपकाळाने निधन झाले मृत्यू समयी त्यांचे वय ८० वर्ष होते. त्यांच्या पश्च्यात एक मुलगा एक मुलगी नांतवड असा मोठा परिवार आहे. त्यांचा अंत्यसंस्कार दि ८ फेब्रवारी रोजी दुपारी एक वाजता मराठा स्मशान भुमित करण्यात आला आहे प्रसिद्ध पहेलवान बाबू उर्फ रामजी जाधव यांचे वडिल तर माधव पहेलवान यांचे अजोबा आणि मारोती जाधव, शिवाजी जाधव , चेअरमन भुजंग जाधव यांचे ते चुलते होत.

# शिंदीची विक्री करणाऱ्या एकास अटक

**तभा वृत्तसेवा**
**कुंडलवाडी,दि. ०९ फेब्रुवारी**

कुंडलवाडी पोलिसांनी शिंदीचे पाकिटे नेत असताना एका इसमास पकडून गुन्हा दाखल केला आहे.



या बाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार कुंडलवाडी शहरातील नरागल्ली पाण्याचा टाकी जवळ गंगाधर मोगलाजी मोक्क मवार रा.नरागल्ली कुंडलवाडी यांच्या जवळ दोन नायलॉन पिशवी मध्ये शिंदीचे १०० पाकिटे २५रू.प्रमाणे २५००रुपये किमतीचे शिंदी चे पाकिटे मिळाल्याने सदर इसमा वर कुंडलवाडी पोलिसांनी कुंडलवाडी पोलीस स्टेशन मद्ये गु. र.न.१९/२०२५ कलम६५(इ)महाराष्ट्र दारूबंदी कायदा नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दुचाकी चोरटा आठ तासात जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**कुंडलवाडी,दि. ०९ फेब्रुवारी**

कुंडलवाडी पोलिसांनी अवघ्या ८ तासात आरोपीला अटक करून चोरीला गेलेली मोटर सायकल आरोपी कडून हस्तगत केले आहे.



पोलीस सुत्रा कडून मिळालेल्या माहतीनुसार कुंडलवाडी शहरातील इरेश गंगाधर गंगोने यांची मोटर सायकल (टह २६ ला५७१३,) लूना काराल रोड वरील मलकापूर शिवारात गाडी रोड वर लावून गांगोने यानी रात्री ९ वाजता पाणी देण्यासाठी शेतात गेले पाणी देऊन रात्री १ वाजता आल्यावर पाहिले असता गाडी दिसली नाही त्या नंतर त्याने शोध घेतला असता न मिळाल्याने त्याने कुंडलवाडी पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दिली त्या नुसार गुन्हा नोंद करून स.पो. नि. ज्ञानेश्वर शिंदे,पो. हे. कॉ. शेख गफूर, पो. हे. कॉ. माधव पाटिल, पो. हे. कॉ. नागेंद्र कांबळे, रघुवीर चौहान यांनी गुप्त माहितीच्या आधारे चक्रे फिरवून चोरीला गेलेली कुणाचा शोध लावून अटक केले असल्याची माहिती स.पो. नि.यांनी दिली आहे.

# मुख्याध्यापकांचे अर्जित रजा रोखीकरणाचा प्रश्न मार्गी लावणार : आ. काळे, आ.चव्हाण यांचे आश्वासन

**तभा वृत्तसेवा**
**बिलोली,दि. ०९ फेब्रुवारी**

खाजगी प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांचे अर्जित रजा अनुज्ञेय असताना अर्जित रजा रोखीकरण अनुज्ञेय नाही असे शिक्षण संचालक (प्रा.) पुणे यांने आदेशित केले. पुर्वी लक्ष प्रभावाणे देयक अर्जित रजा रोखीकरण देण्यात यावे यासाठी निवेदन कुंडलवाडी येथे शिक्षक आमदार विक्रम काळे व पदवीधर आमदार सतीश चव्हाण यांची भेट महासंघाच्या शिष्टमंडळाने घेऊन निवेदन दिले.



दि. २३ जानेवारी २०१३ अप्पर सचिव महाराष्ट्र शासन प्र.सु.प्रधान यांचे पत्र क्र. २०१२/स.क्रं.३२८/१२/माशि-२ शाले शिक्षण क्रिडा मंत्रालय, मुंबई व दि. १५/०२/२०१३ शिक्षक संचालक प्राथमिक महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांचे पत्रान्वये दि. ०९/०४/२००१ अन्वये रजा रोखीकरणा संदर्भातील आदेश खाजगी प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांनाही लागू आहे असे आदेश असताना दि. ०१ मे २०२४ पर्यंत खाजगी प्राथमीक शाळेतील मुख्याध्यापकांचे अर्जि रजा अनुज्ञेय माणून अनेक मुख्याध्यापकांचे रजा रोखीकरण करण्यात आले. परंतु दि.३० मे २०२४ च्या मा.शिक्षण संचालक प्राथमिक महाराष्ट्र राज्य पुणे शरद गोसावी यांनी खाजगी माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांनाच अर्जित रजा रोखीकरण अनुदेय आहे.

प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांना अर्जित रजा रोखीकरण अनुदेय नाही. असे स्पष्ट लेखी पत्र दिल्यामुळे दोन भाऊ असलेल्या मुख्याध्यापकांत गैरसमज निर्माण करून दिला. यामुळे प्राथमिक शिक्षणाधिकारी रोखीकरणाचे बिले स्वीकारत नाहीत तर माध्यमिकचे शिक्षणाधिकारी रोखीकरणाची बिले आनंदात स्वीकारत आहेत. ज्याचे स्वीकारले आहेत त्यांना शिक्षणाधिकारी प्रा.जि.प. नांदेड यांचे दि.२४ जानेवारी २०२५ जा.क्रं. ५८३ पत्रान्वये अर्जित रजा रोखीकरण अनुज्ञेय नाही. करीता आपला प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे. असे लेखी कळविले असून विनंती की. खाजगी प्राथमिक मुख्याध्यापकांना अर्जित रजा रोखीकरणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुढाकार घ्यावे अशी विनंती मागणी द्वारे करण्यात आली.

कुंडलवाडी येथे सबन्नवार उच्च मा.विद्यालयातील प्रा.शंकरराव पवार यांच्या सेवानिवृती कार्यक्रमास शिक्षक आमदार विक्रम काळे व पदवीधर आमदार सतीश चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी महाराष्ट्र राज्य मान्य खाजगी शिक्षक महासंघाच्या वतीने निवेदन देण्यात आले. महासंघ प्रांत उपाध्यक्ष हरीहर चिवडे,नांदेड जिल्हा सचिव,हनमंतराव डाकोरे,जिल्हा उपाध्यक्ष तथा पत्रकार अशोक दगडे कंधार तालुकाध्यक्ष भास्कर पाटील कळकेकर,शिक्षक नेते राजहंस शहापुरे,जिल्हा संघटनमंत्री दिगांबर वाघमारे,सुभाष मुंडे,पाटील, देशमुख,देगावकर, टिपराळे,शरीफ, काळेकर,सूर्यवंशी,कापसे या सर्व उपस्थित मंडळींनी दोन्ही आमदारांना भेट देऊन मुख्याध्यापकांना रजा रोखीकरणाचे देयक नाकारल्यामुळे यांना निवेदन देण्यात आले.

# राष्ट्रीय चर्मकार महासंघाची शोभा यात्रा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ फेब्रुवारी**

संत रविदास महाराज यांच्या ६४८ व्या जयंतीनिमित्त दिनांक १२ फेब्रुवारी रोजी भव्य शोभा यात्रा काढण्यात येणार असल्याचे एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष माधव गायकवाड यांनी कळविले आहे. सदरहू भव्य शोभा यात्रा ही बुधवार दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता महात्मा फुले पुतळा,आयटीआय येथून निघेल व ती शक्तीनगर येथे पोहोचेल. प्रमुख पाहुणे म्हणून आ. बालाजी कल्याणकर , आ. आनंद बोंढारकर, आ. बाबुराव कदम कोहळीकर , आ. किशनराव वानखेडे , माजी आ. मोहन अण्णा हंबर्डे, उमेश मुंडे , तुलजेश यादव यांची उपस्थिती राहणार आहे. या शोभायात्रेत समाज बांधवांनी जयंतीदिनी आपली दुकानें व प्रतिष्ठाने बंद ठेवून सहभागी होऊन कार्यक्रमाची शोभा वाढविण्याचे आवाहन शंकर धडके, उपाध्यक्ष आनंद वाघमारे, अजय गंधारे, सचिव विजय गोरे, कोषाध्यक्ष शशिराव असोरे, शंकर वाघमारे, प्रमुख चंद्रकांत सोनटक्के यांच्यासह आदींनी केले आहे.

# लोह्यात रमाई जन्मोत्सव उत्साहात साजरा ; शोभायात्रेने वेधले शहर वासियांचे लक्ष



**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. ०९ फेब्रुवारी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रत्येक जडण घडणीत मोलाची साथ देणारी माता रमाई यांच्या १२७ व्या जयंती निमित्त माता रमाई महिला मंडळाच्या पुढाकारातून रमाई यांच्या प्रतिमेची लोहा शहरातील मुख्य मार्गावरून भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत मोठ्या संख्येने आंबेडकरी अनुयायांची उपस्थिती होती. सदरील मिरवणुकीने शहर वशियांचे लक्ष वेधले होते.

शहरातील रमाई महिला मंडळाच्या वतीने यंदा पहिल्यांदाच लोहा शहरात माता रमाई यांची भव्य जयंती उत्सव सोहळा दि. ७ रोजी सायंकाळी साजरा करण्यात आला. शहरातील डॉ. आंबेडकर नगरातील क्रांतीसुर्य बुद्ध विहारात भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने बुद्ध पूजापाठ घेण्यात आला. तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी माजी अध्यक्ष ई. जे. बनसोडे, व्ही. के. कांबळे, वाय. बी. महाबळे, माजी नगराध्यक्षा त्रिशलाबाई कांबळे, नगरसेविका राहीबई खिल्लारे, नगरसेविका शारदाताई निर्मले, माजी उपनगराध्यक्ष छत्रपती धुतमल, माजी नगरसेवक बबन निर्मले, बालाजी खिल्लारे, गंगाधर महाबळे, रिपाईचे तालुकाध्यक्ष सुरेश महाबळे, लक्ष्मण महाबळे, बौद्ध महासभेचे पर्यटन जिल्हा सचिव रत्नाकर महाबळे, केंद्रीय शिक्षक धोंडीबा यानभुरे, तालुकाध्यक्ष बापूसाहेब कापुरे, केतन खिल्लारे आदींसह बहुसंख्य उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी माता रमाई महिला मंडळाच्या अध्यक्षा सुशिलाबाई महाबळे, राजश्री हटकर, सीमा कांबळे, मनीषा ढगे, सरिता महाबळे, रोहिणी जयमाला महाबळे, पुष्पा महाबळे, पूनम महाबळे, नंदाबई खाडे, रेखाबाई कांबळे आदींनी परिश्रम घेतले. उपस्थिती होती.

# सरदार वल्लभभाई पटेल शाळेच्या वतीने पोलिस दलात निवड झालेल्यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. ०९ फेब्रुवारी**

दि. ८ फेब्रुवारी रोजी सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल येथे माजी विद्यार्थी सतीश पोतलिंग गुंठे, व शेख मेहफूस शेख नूर,शिवाजी दत्तात्रय येगुर्ले यांचा मुंबई येथे पोलीस दलात निवड झाल्याबद्दल सरदार वल्लभभाई पटेल शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

या विद्यार्थ्यांच्या यशामुळे शाळेच्या इतिहासामध्ये अजून एका यशाची भर पडली आहे. सत्कार कार्यक्रम झाल्यानंतर शाळेचे मुख्याध्यापक विजयकुमार धोंडीराम बेंबडे यांनी सांगितले की या दोन्ही विद्यार्थ्यांनी अत्यंत हलाकीच्या परिस्थितीवर मात देऊन व बऱ्याच समस्यांचा सामना करून यश मिळविले आहे. यावेळी संस्थेचे अध्यक्ष केशवराव कदम व सर्व संचालक मंडळाने या दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. यानंतर या दोन्ही विद्यार्थ्यांनी २०२४-२५ च्या दहावी बॅचच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व शाळेचे वरिष्ठ शिक्षक बायस सर,गाडेगावकर सर, नहनाळे सर, पोगरे सर, धनगरे सर, पवार सर, गुजरवाड सर, दुडकिकर व चाळणेवाड यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले असे आपल्या मनोगतात त्यांनी सांगितले. शाळेच्या वतीने सत्कार केल्याबद्दल शाळेचे आभार व्यक्त केले.

# विद्यापीठातील शिक्षण शास्त्र संकुलामार्फत अध्ययन-अध्यापन कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. ०९ फेब्रुवारी**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील शिक्षणशास्त्र संकुलाच्या वतीने दिनांक ३,४ फेब्रुवारी रोजी नाविन्यपूर्ण तांत्रिक कौशल्ये आणि दिनांक ५, ६ फेब्रुवारी रोजी अभ्यासक्रम रचना दोन विषयावर राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या अनुषंगाने संशोधक विद्यार्थ्यांना विविध विषयावर वेगवेगळ्या व्याख्यात्यांनी व्याख्याने दिली. स्वारातीम विद्यापीठातील शिक्षण शास्त्र संकुलामार्फत घेण्यात आलेली कार्यशाळा येथे सर्वप्रथम स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे



पूजन अधिष्ठाता एम. के. पाटील, यांच्या हस्ते करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी डॉ. चंद्रकांत बाविस्कर, डॉ. डी. एम. खंदारे, डॉ. प्रभाकर रेड्डी, डॉ. कैलास पाळणे, डॉ. शिवाजी सूर्यवंशी व संकुलाचे संचालक डॉ. सिंकुकुमार सिंह यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी या कार्यशाळेत अध्ययन - अध्यापन पद्धतीमध्ये कालानुरूप बदल होत गेले पाहिजे , व त्यानुसार विद्यार्थी व शिक्षक ह्या दोन्ही घटकांनी आपल्या मध्ये त्या बदलांचे अवलोकन केले पाहिजे या उद्देशाने सदरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते. या अनुषंगाने विविध विषयावर वेगवेगळ्या व्याख्यात्यांनी व्याख्याने दिली. या दोन्ही कार्यशाळेसाठी विद्यापीठ परिसरातील व संलग्नित महाविद्यालयातील तसेच राज्यातील व देशातील विविध प्राध्यापक संशोधक विद्यार्थी यांनी सहभाग घेतला होता. सदरील कार्यशाळेचे आयोजन करण्यासाठी शिक्षण शास्त्र संकुलातील प्रा. डॉ. वैजयंता पाटील , डॉ. सुनीता पाटील, डॉ. महेश जोशी, डॉ. भीमा केंगले, डॉ. अशोक गिनगिने तसेच सर्व संशोधक विद्यार्थी यांनी सदरील कार्यशाळा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.

**लग्नासाठी मुलगी पाहिजे**

**नाव**: धम्मदिप पिराजी गायकवाड
**वय** : ४२
**स्थिती** : घटस्फोटीत
**जात**: बौद्ध
**धंदा** : व्हिडीओ मिक्सिंग
**वार्षिक उत्पन्न** : ७ ते ८ लाख
**पत्ता : गोकुळ नगर, नांदेड**
**मो. ९९२१२१०३५८**

**अपेक्षा**

**वय वर्ष** : ३० ते ३५
जातीची अट नाही
दिसण्यास सुंदर,
विवाहित, अविवाहित, घटस्फोटीत
(मागील नवऱ्याचे आपत्य नसल्यास प्राधान्य)